मार्च २०२०/पाने ६०/किंमत ₹१०

लोकराज्य

स्त्री ते सुपर वुमन

शिवजन्मोत्सव

सनई-चौघड्यांचे मंजूळ स्वर, तुतारींच्या गगनभेदी गर्जना, ढोल-ताशांचा निनाद, भगव्या पताका, 'जय भवानी, जय शिवाजी', 'छत्रपती शिवाजी महाराज की जय'चा जयघोष अशा आनंदमयी वातावरणात आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत शिवजन्मोत्सव सोहळा किल्ले शिवनेरीवर उत्साहात साजरा झाला.

अंतरंग

‘ती’चे सक्षमीकरण ६

समाज सक्षम बनवायचा असेल तर समाजातील महिलांचे सबलीकरण होणे आवश्यक आहे. राज्य शासन महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील आहे. महिलांमधील उद्यमशीलतेला वाव देऊन त्यांची उन्नती साधण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. महिलांच्या समस्या सोडवण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे.

प्रेरणेचा आदर्श ! १५

महिलांनी प्रत्येक क्षेत्रात उंच भरारी घ्यावी यासाठी शासन प्रयत्न करत असतेच. मात्र उंच भरारी घेण्याची वृत्ती काही स्त्रियांमध्ये उपजतच असते. काहीजणी जिद्द आणि परिश्रमाच्या जोरावर स्वत:ची ओळख निर्माण करून सामान्य महिलांसमोर एक आदर्श निर्माण करतात.

महाजालावरची सावधगिरी ३१

इंटरनेट अर्थात महाजालावर समाजकंटक आपल्या विकृतीसह वावरत असतात. या माध्यमांचा वापर करून महिलांचे शोषण करणाऱ्या सायबर गुन्ह्यांची व्याप्ती घाबरवून सोडणारी आहे, त्यासाठी हे माध्यम अधिक जागरूकतेने वापरणे आवश्यक आहे.

हक्क आणि अधिकार २४

महिलांमधील कायदेविषयक जाणीव जागृतीसाठी शासन, विविध सामाजिक संघटना, व्यक्ती विशेष कार्य करीत असल्या तरी महिलांना त्यांचे हक्क आणि अधिकार मिळवून देण्यासाठी समाजानेच स्वयंस्फूर्तीने पुढाकार घेणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राचा अभिमानबिंदू रायगड ५४

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा साक्षीदार असलेला रायगड महाराष्ट्राच्या देदीप्यमान इतिहासाची साक्ष देत आहे. रायगड केवळ गड नाही तर तो महाराष्ट्राच्या अस्मितेचा आणि अभिमानाचा मानबिंदू आहे. शिवकाळातील अनेक चढउतार अनुभवलेला, बांधकामाचा उत्कृष्ट नमुना असलेला हा गड शिवप्रेमी, दुर्गप्रेमींसाठी तीर्थस्थळच आहे.

‘ती’चे सक्षमीकरण	६
शिक्षण, संस्कृती आणि संस्कार	१०
निराधारांना आधार	१२
सक्षम माता, सुदृढ बालक...	१३
अल्पसंख्याक महिलांची उन्नती	१४
प्रेरणेचा आदर्श!	१५
तिच्या हिमतीला शासनाची साथ	१७
महिला विकासात अग्रेसर	१८
कौशल्याला नवे पंख	२२
हक्क आणि अधिकार	२४
बचत आणि गुंतवणूक	२८
महाजालावरची सावधगिरी	३१
दिल्लीतील ‘मराठी नारीशक्ती’	३४
निरोगी महिला, निरोगी समाज	३६
जिद्दीला यशाची किनार	३८
शेतकरी हितासाठी	४०
मंत्रिमंडळात ठरले !	४२
दृष्टिक्षेप	४५-४९
कुटुंबप्रमुखाचे सुखद दर्शन!	५०
कोकणासह नवा महाराष्ट्र घडवू या	५२
महाराष्ट्राचा अभिमानबिंदू रायगड	५४
कर्ज फिटलं साहेब, आता लेकीच्या लग्नाला या..!	५८

वर्ष ७१ वे | अंक ९ | मार्च २०२०

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — डॉ. दिलीप पांढरपट्टे
- प्रबंध संपादक — अजय अंबेकर, सुरेश वांदिले
- संपादक — अनिल आलूरकर
- उपसंपादक — प्रवीण कुलकर्णी, गजानन पाटील, राजाराम देवकर
- वितरण अधिकारी — मंगेश वरकड
- वितरण साहाय्य — अश्विनी पुजारी
- साहाय्य — भारती वाघ
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — मे. मुद्रण प्रिंट एन पॅक प्रा.लि., कोपरखैरणे, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारण: ९३७२२३०३२०
(सकाळी १०.३० ते ५.३० कार्यालयीन कामकाजा दिवशी)

ई – लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमतच असेल असे नाही.

‘गो गर्ल गो’

क्रीडा संस्कृतीची जोपासना व्हावी, स्पर्धांना प्रोत्साहन मिळावे, व्यायाम करावा व स्वास्थ्य राखावे या उद्देशाने केंद्र शासनाने ‘फिट इंडिया मूव्हमेंट’ या उपक्रमाची सुरुवात २९ ऑगस्ट २०१९ पासून केली. त्या अंतर्गत राज्य शासनाने ‘गो-गर्ल-गो’ या उपक्रमास प्रारंभ केला. ‘बेटी बचाओ, बेटी पढाओ, बेटी खिलाओ’ हे सूत्र ठेवून शासनाने मुलींच्या स्वास्थ्यासाठी जनजागृतिपर कार्यक्रम सुरू केला. मुलींना अधिकाधिक क्रीडा सुविधा, मोकळे वातावरण व कौशल्य विकसित करण्याची संधी देण्याचा हा उपक्रम आहे. त्यांच्यातील सहा ते अठरा वयोगटातील मुलींना स्वच्छता, पोषण, योग्य सवयी व आरोग्याबाबत माहिती दिल्यास निकोप कुटुंबाचा पाया रचण्याचे उद्दिष्ट पुर्णत्वास जाऊ शकते.

राज्यातील क्रीडा संस्कृती समृद्ध व्हावी आणि त्यातून देश आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील क्रीडापटू तयार व्हावेत, यासाठी शासन विविध योजना आखत असून नुकत्याच झालेल्या गुवाहाटी येथील खेलो इंडियाच्या स्पर्धेत महाराष्ट्रातील युवा खेळाडूंनी सर्वसाधारण विजेतेपद पटकावून शासनाच्या या योजना फलदायी ठरत असल्याचे अधोरेखित केले आहे. याचाच पुढील टप्पा म्हणून मुलींमधील तंदुरुस्ती वाढावी, त्यांच्यात खेळाची आवड निर्माण व्हावी आणि यातून भविष्यात नवे खेळाडू तयार व्हावेत

यासाठी ‘गो गर्ल गो’ ही योजना राबवण्यात येत आहे. या योजनेचा विस्तार राज्यभर असला तरी त्यात प्रामुख्याने ग्रामीण आणि राज्यातील दुर्गम भागातील मुलींपर्यंत क्रीडा संस्कृती पोहोचावी आणि त्यातून नवे खेळाडू निर्माण व्हावेत, हा उद्देश आहे. यामुळे राज्यात खेळाबाबत जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. राज्य शासन मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील असून त्यांची शारीरिक आणि मानसिक वाढ योग्य व्हावी, यासाठी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. यानिमित्ताने राज्यातील एक कोटी चार लाखांहून अधिक मुली या स्पर्धेत सहभागी होणार असून त्याद्वारे एक नवी क्रीडा संस्कृती उदयास येणार आहे.

सन्मान, संधी आणि अधिकारांचे रक्षण

ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)
मंत्री, महिला व बालविकास

ज्या समाजात स्त्रियांचा सन्मान होतो, तोच समाज सबल आणि निरोगी मानला पाहिजे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेद्वारेच भारतीय स्त्रियांना समान हक्क आणि अधिकार प्रदान केले आहेत. भारतीय स्त्रियांच्या हक्कांच्या रक्षणासाठी आणि त्यांच्या सुरक्षिततेसाठी वेळोवेळी कायदेमंडळांनी कायदे केले असले तरी एक समाज म्हणून त्यांच्या हक्कांचे आणि अधिकाराचे रक्षण करण्याचे दायित्व सर्वांवर आहे. राज्याची महिला व बालविकास मंत्री म्हणून महिलांच्या सक्षमीकरणाकडे माझे विशेषत्वाने लक्ष आहे. या विभागाच्या विविध योजना समाजातील सर्वात शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवून त्याद्वारे महिलांचा सर्वांगीण विकास साधण्याला आमचे प्राधान्य आहे.

आज महिला सर्व आघाड्यांवर पुढे आहेत. दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे निकाल बघितले तर सर्वात अधिक गुण मिळवून मुली पुढे येताना दिसत आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या नुकत्याच निकालानुसार आता सैन्यदलात महिला अधिकाऱ्यांना कायम कमिशन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. संधी मिळताच राजकारण, शिक्षण, विज्ञान, आरोग्य, क्रीडा अशा विविध क्षेत्रांत सर्वोत्कृष्ट कामगिरी करीत महिलांनी आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे. एका बाजूला प्रगतीच्या नव्या शिखरावर महिला पोहोचताना समाजातील दुसरी बाजू अतिशय चिंता करण्यासारखी आहे. महिलांवर होणारे अत्याचार, त्यांना त्यांच्या हक्कांपासून वंचित ठेवणारी मनोवृत्ती आणि त्यांचा होणारा लैंगिक आणि शारीरिक छळ अतिशय दुर्दैवी आहे. शासन अनेक पातळ्यांवर महिलांच्या सुरक्षिततेची काळजी घेत असते. महिलांचा कामाच्या ठिकाणी कोणताही लैंगिक छळ होऊ नये यासाठी कडक कायदे करून त्यांच्या अंमलबजावणीकडे शासन विशेष लक्ष देतेच, त्याशिवाय मुलींच्या शिक्षणासाठी व त्यांना रोजगार, स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यासाठी विविध योजनाही राबवत आहे. महाराष्ट्र हे महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना राबवणारे अग्रेसर राज्य आहे.

महात्मा जोतिराव फुले, सावित्रीबाई फुले, न्या. महादेव गोविंद रानडे, गोपाळ गणेश आगरकर, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्यासारख्या समाजसुधारकांचा वारसा लाभलेल्या महाराष्ट्राने मुलींच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले आहे. कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता मुलींना प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण मोफत दिले जात आहे. मुलींच्या शिक्षणाबरोबरच त्यांच्यातील उद्यमशीलतेलाही वाव मिळवून देण्यात येत आहे. राज्य शासनाच्या या प्रयत्नांतूनच ग्रामीण महाराष्ट्रात बचतगटाची मोठी चळवळ उभी राहिली आहे. आज ग्रामीण अर्थव्यवस्थेत एक महत्त्वाचा घटक म्हणून या चळवळीकडे बघायला हवे. या चळवळीच्या माध्यमातून महिला आत्मनिर्भर बनल्या आहेत.

समाजरथाची महिला आणि पुरुष ही दोन चाके आहेत. त्यातील कोणतेही चाक कमकुवत राहणे आपल्याला परवडणारे नाही. परंपरांचे जोखड महिलांच्या मानेवर ठेवून समाजाला विकासाच्या मार्गावर पुढे जाता येणार नाही. त्यामुळे एक समाज म्हणून आपण महिलांचा सन्मान केला पाहिजेच त्याचबरोबर त्यांच्या समान संधी आणि सन्मानाने जगण्याच्या अधिकारांचे रक्षण केले पाहिजे. महिलांमध्ये प्रचंड सर्जनशील ऊर्जा असते. त्याला सुयोग्य दिशा देण्याची गरज आहे. आपण ८ मार्चला जागतिक महिला दिन साजरा करतो. त्या औचित्याने 'लोकराज्य'चा हा महिला विशेषांक प्रकाशित होत आहे. या अंकात महिला सबलीकरणासंदर्भात विविध मंत्र्यांचे विचार आणि शासनाची महिलांच्या सर्वांगीण विकासाबाबतची धोरणे समाविष्ट केली आहेत. त्यासोबतच महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणारे आणि त्यांना कायदे, आरोग्य आणि बचतीविषयी माहिती देणारे लेखही समाविष्ट करण्यात आले आहेत. हा विशेषांक आपल्याला आवडेल, अशी खात्री आहे.

ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)
(अतिथी संपादक)

‘ती’चे सक्षमीकरण

समाज सक्षम बनवायचा असेल तर समाजातील महिलांचे सबलीकरण होणे आवश्यक आहे. राज्य शासन महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील आहे. महिलांमधील उद्यमशीलतेला वाव देऊन त्यांची उन्नती साधण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. महिलांच्या समस्या सोडवण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे.

ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)
मंत्री, महिला व बालविकास

महिला या मुळातच संवेदनशील असतात. कोणत्याही परिस्थितीला धैर्याने सामोरे जाण्याची अपरिमित शक्ती त्यांच्यामध्ये असते. एक महिला म्हणून स्वानुभवातून मी हे अधिकारवाणीने सांगू शकते. कठीण परिस्थितीत स्वत:ला तसेच कुटुंबाला जोडून ठेवण्याची महिलांची शक्ती सामाजिक संरचनेतील महत्त्वाचा घटक आहे.

स्त्री मग ती नोकरी, व्यवसाय करणारी असो किंवा गृहिणी असो; शहरी भागातील असो किंवा गावांमध्ये राहणारी असो कुटुंबाच्या उन्नतीसाठी ती सतत कष्ट करत असते. शहरी आणि ग्रामीण स्त्रीच्या परिस्थितीमध्ये बदल असला तरी काही बाबतीत त्यांच्यापुढील समस्या सारख्याच आहेत. नोकरी करणाऱ्या स्त्रियांना लहान बालकांना पाळणाघरांमध्ये सोडून जावे

लागते. तसेच ग्रामीण भागात कुटुंबात वयस्क महिला नसल्यास महिलांना शेतामध्ये काम करण्यासाठी जाताना बालकांना बरोबर घेऊन जावे लागते. म्हणजे ग्रामीण आणि शहरी स्त्रियांच्या समस्यांमध्ये काही अंशी साम्य आहे.

महिलांच्या सामाजिक, आर्थिक उन्नतीसाठी तसेच संरक्षणासाठी योजना राबवणे हे आमचे काम आहे. ही जबाबदारी आम्ही पुढील काळात गांभीर्याने पार पाडू. असामाजिक घटकांच्या चुकीच्या मानसिकतेमुळे महिला संरक्षणाची समस्या गेल्या काही काळात समोर येत आहे. स्त्रीकडे सर्वप्रथम माता, बहीण या दृष्टीतून पाहण्याची आपले आदर्श असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांची शिकवण आज अंगी बाणवण्याची गरज आहे. शाळा, महाविद्यालयांमध्ये त्या दृष्टीने मूल्यशिक्षणांतर्गत महिलांचा आदर करण्याची शिकवण देण्यासाठी प्रयत्न केला जाईल.

आर्थिक सक्षमीकरण

महिलांचे आर्थिक सक्षमीकरण हे शासनाचे सर्वकालीन ध्येय असते. नोकरी, व्यवसाय करणारी स्त्री स्वत:च्या पायावर उभी असते. मात्र ग्रामीण महिला तसेच गृहिणींना आर्थिक समस्या भेडसावतात. अशा वेळी त्यांना उभारी देण्याची गरज असते. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या (माविम) माध्यमातून उभी राहिलेली बचत गटांची चळवळ निश्चितच महिलांना संघटित होऊन एकमेकींच्या आर्थिक समस्या सोडवण्यासाठी उपयुक्त ठरत आहे. या माध्यमातून महिलांची क्षमताबांधणी करून त्यांना छोटे-मोठे व्यवसाय उभे करण्यासाठी आत्मविश्वास आणि प्रेरणा देण्याचे काम केले जाते. यातून महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. ग्रामीण महिला आता आत्मविश्वासाने पुढे येऊन आपल्या बचतगटांच्या स्टॉलच्या माध्यमातून उत्पादनांची विक्री करत आहेत. तसेच त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठाही उपलब्ध होत आहेत.

माझी कन्या भाग्यश्री

वंशाला दिवा म्हणून मुलगाच पाहिजे हा हट्ट सोडण्याची गरज आहे. संधी दिल्यास मुलांच्या बरोबरीनेच नव्हे तर त्यांच्यापेक्षा चांगले शिक्षण घेऊन मुली नोकरी व्यवसायात पुढे जात असल्याचे चित्र दिसून येते. मुलींचा जन्मदर वाढवणे व स्त्री-भ्रूणहत्या रोखण्यासाठी राज्यात 'माझी कन्या भाग्यश्री' योजना राबवण्यात येत आहे. या योजनेचा लाभ केवळ एक मुलगी व दोन मुलींच्या जन्मावर नसबंदी शस्त्रक्रिया करून घेतलेल्या कुटुंबाला घेता येतो. मुलींच्या नावे शासनाच्यावतीने मुदत ठेव ठेवण्यात येते.

बालकांमधील लिंग गुणोत्तराचे प्रमाण लक्षात घेऊन केंद्र शासनाचे 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' अभियान राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये राबवण्यात येत आहे. महिला व बालविकास, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, शालेय शिक्षण, ग्रामविकास, गृह तसेच अन्य विभागांच्या समन्वयातून ही योजना राबवण्यात येत आहे. स्त्री-भ्रूणहत्या रोखण्यासाठी केलेल्या गर्भधारणापूर्व आणि प्रसूतीपूर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे या अभियानाचे उद्दिष्ट आहे.

बालकांमधील लिंग गुणोत्तर कमी असलेल्या जिल्ह्यांवर विशेष लक्ष देण्यात येत आहे. शेजारच्या राज्यात जाऊन गर्भाची लिंग तपासणी करण्याच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी सार्वजनिक आरोग्य आणि गृह विभागांच्या समन्वयातून कठोर कारवाईचे निर्देश देण्यात आले असून गर्भलिंग तपासणीचे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत.

शिक्षण, आरोग्याकडे लक्ष

मुलींच्या जन्माचे स्वागत करणे एवढेच आपले कर्तव्य नाही, तर मुलींना मुलांच्या बरोबरीने शिक्षण व सुविधा पुरवल्या पाहिजेत. त्यांचे आरोग्य, संरक्षण, सक्षमीकरण याकडे लक्ष दिले पाहिजे. जेणेकरून मुली स्वत:च्या पायावर उभ्या राहून कुटुंबाचे नाव मोठे करतील. मुलींना 'नकोशा' ऐवजी 'हव्याशा' जेव्हा मानले जाईल तेव्हा खऱ्या अर्थाने सामाजिक बदल घडतील. या बदलांना सुरुवात

बचतगट

महिला बचतगट चळवळीमुळे महिलांचे एक जाळे (नेटवर्क) निर्माण होत असून त्यातून अनेक विधायक कामे उभी राहत आहेत. त्यांच्यातील आत्मविश्वासामुळे कुटुंबात त्यांच्या मताला मान दिला जातो. बचतगटांमध्ये सक्रिय असलेल्या महिला आपल्या समस्यांच्या सोडवणुकीसाठी शासकीय कार्यालयात सहजपणे जातात. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला नेतृत्व पुढे येत आहेत. या बचतगटांना अधिक सक्षम करण्यासाठी व प्रोत्साहन देण्यासाठी मी महत्त्वाचे निर्णय घेत आहे. त्याअंतर्गतच 'घरपोच आहार' आणि 'गरम ताजा आहार' पुरवठ्यासाठी अधिकाधिक महिला बचतगट, संस्थांना निविदा प्रक्रियेत भाग घेता यावा म्हणून वार्षिक सरासरी शिलकीची मर्यादा २५ हजार रुपयांवरून १० हजार रुपये इतकी कमी करण्यात आली आहे. त्यामुळे जास्तीत जास्त महिला बचतगटांना या निविदा प्रक्रियेत भाग घेणे शक्य होत आहे.

झाली असून सक्षम आणि सशक्त समाजनिर्मितीकडे आपली वाटचाल सुरू आहे, असे मला वाटते.

सूचनांचे स्वागतच

समाजामध्ये सकारात्मक बाबी घडत असतानाच काही विकृतीदेखील दिसून येतात. बलात्कार, लैंगिक शोषण, मानसिक छळ, ॲसिड हल्ला, पेट्रोल टाकून आग लावणे, बालकांवरील लैंगिक अत्याचारासारख्या क्रूर घटना गेल्या काही काळात प्रकर्षाने घडताना दिसत आहेत. अशा घटनांना आळा घालण्यासाठी पोलीस दल नेहमी तत्पर असते. मात्र, समाज म्हणून आपण सर्वांनी अशा घटनांबाबत चिंतन केले पाहिजे. या विकृत मनोवृत्तींना अटकाव करण्याच्या दृष्टीने शासन सदैव प्रयत्नशील आहेच. परंतु, याबाबत सामूहिकपणे काय उपाययोजना करता येतील, यासाठीच्या सूचनांचे आम्ही स्वागत करू.

पोलीस दलाने शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात सीसीटीव्ही प्रकल्प राबवले आहेत. त्यामुळे छेडछाडीच्या घटनांतील आरोपींची ओळख पटणे शक्य झाले आहे. अशा घटनांतील आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी यासाठी कायद्यात बदल, आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबतही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीही सूतोवाच केले आहे.

मातृत्वाची काळजी

ज्यांना दोन वेळच्या जेवणासाठी रोजंदारी करावी लागते अशा महिलांना गर्भधारणेच्या काळात तसेच स्तनपान काळात रोजगारावर न जाता आल्याने कठीण परिस्थिती उद्‌भवते. हे लक्षात घेऊन अमरावती व बुलडाणा जिल्ह्यात 'इंदिरा गांधी मातृत्व सहयोग' योजना राबवली जाते. या योजनेत गर्भवती आणि स्तनपान कालावधीत महिलांना वेतन नुकसानभरपाई म्हणून रोख रक्कम देणे तसेच त्यांना पोषक आहार उपलब्ध करून देण्यात येतो. अशा महिलांना प्रथम प्रसूतीच्या वेळी तीन हजार रुपये आणि बालक सहा महिन्यांचे झाल्यावर तीन हजार रुपये असे एकूण सहा हजार रुपये देण्यात येतात.

खऱ्या वंचित, पीडितांपर्यंत या योजनांच्या माध्यमातून मदत पोहोचवणे हे आमचे उद्दिष्ट असून त्यासाठी काही महत्त्वपूर्ण पाऊले उचलण्यात येत आहेत. या योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता आणण्याच्या दृष्टिकोनातून आवश्यक ते निर्णय पुढील काळात घेण्यात येतील.

मनोधैर्य

अत्याचारांना बळी पडलेल्या महिला व बालकांना मानसिक आघातातून सावरणे तसेच त्यांचे पुनर्वसन करणे ही अत्यंत महत्त्वाची बाब ठरते. त्यासाठी शासन 'मनोधैर्य योजना' राबवत आहे. या योजनेतून पीडितांना १ ते १० लाख रुपयांपर्यंत मदत देण्यात येते. पीडितांना मानसिक धक्क्यातून सावरण्यासाठी समुपदेशन, वैद्यकीय मदत, कायदेशीर मदत, निवारा, शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते. पण पीडितांना फक्त आर्थिक मदत न करता त्यांना सन्मानाने जगता यावे, यासाठी प्रयत्न करणे हे शासनाचे लक्ष्य आहे.

कल्याणकारी योजना

वंचित, पीडित महिलांच्या साहाय्यासाठी महिला आणि बालविकास विभागामार्फत विविध योजना राबवण्यात येत आहेत. यामध्ये विविध प्रकारच्या निवारा योजना, राज्य महिला गृहे, आधारगृहे, अनाथालय, महिला स्वीकृती केंद्रे आणि संरक्षित गृहे यामधील निराधार आणि परित्यक्ता विधवांच्या मुलींच्या विवाहाकरिता अनुदान, देवदासींना निर्वाहाकरिता आणि त्यांना व त्यांच्या मुलींना विवाहाकरिता अनुदान देण्याची 'देवदासी कल्याण योजना', महिला समुपदेशन केंद्र, अत्याचारग्रस्त पीडित महिलांसाठी सावित्रीबाई फुले बहुउद्देशीय महिला केंद्र आदी योजना राबवण्यात येतात.

किशोरी शक्ती

किशोर वयातील मुलींमध्ये बालविवाहाचे आणि वारंवार मुलांना जन्म देण्याने आरोग्यावर होणारे दुष्परिणाम, सक्षम मातृत्वाचे महत्त्व आदींबाबत जागरूक करण्यासाठी २३ जिल्ह्यांमध्ये 'किशोरी शक्ती योजना' राबवण्यात येत आहे. या मुलींना संतुलित आहार, योग्य पोषण आहार, आरोग्य तसेच व्यक्तिगत स्वच्छता, परिसर स्वच्छता आदींबाबत शिक्षण तसेच प्रशिक्षण दिले जाते.

सुरक्षित पाळणाघर

काम करणाऱ्या महिलांना आपली मुले पाळणाघरात सोडून जाताना काळजावर दगड ठेवून जावे लागते. अशा वेळी सुरक्षित पाळणाघरांची गरज लक्षात येते. यातूनच केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार राजीव गांधी राष्ट्रीय पाळणाघर योजना राज्यात प्रायोगिक तत्त्वावर राबवण्यात येत आहे. सध्या ठाणे, नाशिक,

नंदुरबार, अमरावती, गडचिरोली आणि चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये ६०० पाळणाघरे सुरू केली आहेत. ही पाळणाघरे कामकरी महिलांसाठी मोठा आधार ठरली आहेत.

सक्षम अंगणवाड्या

अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका या कुपोषणमुक्तीसाठी मोलाची कामगिरी बजावतात. त्यांना वेळच्या वेळी मानधन मिळेल याची काळजी शासन घेईल. अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांची साडेपाच हजार रिक्त पदे भरण्यास आम्ही मान्यता दिली आहे. राज्यातील खासगी इमारतीत भरणाऱ्या अंगणवाड्यांच्या जागाभाड्यात भरीव वाढ करण्यास मान्यता देण्यात आली आहे. ग्रामीण व आदिवासी क्षेत्रासाठी एक हजार रुपये, नागरी क्षेत्रासाठी चार हजार तर महानगर क्षेत्रामध्ये सहा हजार रुपये इतके नवीन भाडे असणार आहे. त्यामुळे भाड्याच्या जागेत भरणाऱ्या अंगणवाड्यांना अधिक चांगल्या सोयीसुविधायुक्त इमारती मिळणे शक्य होणार आहे.

येणाऱ्या आर्थिक वर्षात अंगणवाड्यांसाठी सुमारे चार हजार नवीन खोल्या बांधण्याचे उद्दिष्ट आम्ही ठेवले आहे. त्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून, महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना तसेच ग्रामपंचायत विकास आराखड्यातून निधी उपलब्ध करण्यात येणार आहे. कॉर्पोरेट कंपन्यांनी सीएसआर निधी आणि विविध अशासकीय स्वयंसेवी संस्थांनीही (एनजीओ) एक सामाजिक जबाबदारी म्हणून योगदान देणे गरजेचे आहे.

बालसंस्थांमधील मुलांचे शिक्षण, आरोग्य आदींसाठी राज्य शासन संवेदनशील आहे. या मुलांच्या पुनर्वसनाकरिता 'बाल न्याय निधी' साठी दोन कोटी रुपयांची तरतूद करण्याचा निर्णय घेत त्या दृष्टीने खंबीर पाऊल उचलण्यात आले आहे. बाल न्याय निधीतून मुलांचे कल्याण व पुनर्वसनासाठी केंद्र किंवा राज्य शासनाच्या इतर कोणत्याही योजनेत समाविष्ट नाहीत अशा कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. तसेच बालकांच्या मोठ्या आजारांकरिता वैद्यकीय साहाय्य किंवा शस्त्रक्रियांसाठी तरतूद करण्यात येईल. बालकांचे कौशल्य विकास प्रशिक्षण, उद्योजकता विषयक साहाय्य, व्यवसाय प्रशिक्षण यासाठी देखील या निधीतून तरतूद केली जाईल.

माता व बालकांना पोषण आहार पुरवठा, महिलांना शिवणकला, हस्तकला आदी विविध कौशल्यांचे प्रशिक्षण, महिला व बालकांची आरोग्य तपासणी, मानसिक आरोग्य या क्षेत्रात राज्यात काही चांगले काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था आहेत.

टाटा ट्रस्ट, रिलायन्स फाऊंडेशन, इंडियन लॉ सोसायटी, व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन फाऊंडेशन, स्नेहा, युनायटेड नेशन्स फाऊंडेशन, रेमंड आदी विश्वस्त संस्था आणि सामाजिक संस्थांच्या मदतीने महिला, बालके, यूथ फॉर जॉब्ज तसेच अन्य घटकांच्या कल्याणासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत.

समाजाचा पुढाकार

महिलांच्या सक्षमीकरणासाठी शासन आपल्या बाजूने अनेक पातळ्यांवर प्रयत्न करत आहे. मात्र समाज म्हणून योगदान देण्याची आपणा सर्वांचीही जबाबदारी आहे. स्त्री-भ्रूणहत्येसारख्या निंदनीय प्रथा या सामाजिक समतोलाला घातक ठरणाऱ्या आहेत. हे रोखण्यासाठी शासन कायद्याची अंमलबजावणी करत आहे. तथापि, समाजाने याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. राज्यात एक हजार मुलांमागे कमी असलेला मुलींचा जन्मदर ही चिंतेची बाब आहे. २०१७ मध्ये दरहजारी मुलांमागील मुलींचा जन्मदर ९०० पेक्षा कमी राहिलेले नऊ जिल्हे आहेत. सर्व यंत्रणांच्या समन्वयातून पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे तसेच 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' योजनेच्या माध्यमातून या आव्हानावर मात करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

'मुलगा म्हणजेच वंशाचा दिवा' या पारंपरिक समजातून बाहेर येणे आवश्यक आहे. त्यातूनही अनेक कुटुंबे केवळ मुलीच झाल्यावर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करत आहेत, ही आशेची बाब आहे.

मुली आणि महिला शिक्षण, क्रीडा, साहित्य, कला, अभिनय, उद्योग आदी क्षेत्रात नाव कमावत आहेत. कुटुंबाचे आणि देशाचेही नाव उज्ज्वल करण्यात अनेक महिला मोलाची भूमिका बजावत आहेत. त्यामुळे मुलींना दुय्यम न समजता समान वागणूक देणे, आपले सर्वांचेच कर्तव्य आहे.

शब्दांकन : सचिन गाढवे,
विभागीय संपर्क अधिकारी

शाळा केवळ औपचारिक शिक्षण देत नाहीत तर भविष्यातील समाज घडवण्याचे महत्त्वाचे कार्य करीत असतात. आजच्या काळात चांगला समाज घडवण्यासाठी योग्य शिक्षणाबरोबरच संस्कृती व संस्काराचे धडे देणेही आवश्यक आहे. विशेषतः मुलींच्या शिक्षणानेच समाज सक्षम होणार आहे, त्याकडे शासनाचे विशेषत्वाने लक्ष आहे.

शिक्षण, संस्कृती आणि संस्कार

प्रा. वर्षा गायकवाड
मंत्री, शालेय शिक्षण

ग्रामीण भागात मुलींचे शिक्षण असो किंवा महिलांचे सक्षमीकरण याबाबत शासनासोबतच आपण सर्वांनीच पुढाकार घेणे आवश्यक आहे. महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी मुलींच्या शिक्षणासाठी घेतलेल्या कष्टाची आठवण ठेवून मुलींच्या शिक्षणासाठी विशेषत्वाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. अतिदुर्गम आणि ग्रामीण भागात राहणाऱ्या मुलींनाही दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी शासन विशेष प्रयत्न करत आहे पण समाजानेही ती आपली जबाबदारी मानली पाहिजे. शालेय शिक्षण मंत्री म्हणून मी जेव्हा ग्रामीण भागाच्या दौऱ्यावर जाते तेव्हा तेथील मुलींना चांगले शिक्षण मिळते का याची चाचपणी करते, काही कमतरता असतील तर त्या दूर करण्यावर भर असतो. मुलींच्या शिक्षणाबाबात पालकांमध्ये जागरुकता वाढवण्याची गरज आहे, त्यासाठी आवश्यक ते सर्व उपाय केले जातील.

हिंगणघाट येथे घडलेल्या घटनेनंतर महाराष्ट्र पूर्णपणे हादरून गेला आहे. अशा घटना भविष्यात घडू नये यासाठी विद्यार्थ्यांना पायाभूत शिक्षणाबरोबरच सजग नागरिक घडावा, यासाठी शिक्षण देणे आवश्यक आहे. मुलींना शिक्षण घेताना सुरक्षित असल्याची भावना निर्माण होणे आवश्यक आहे, त्यासाठी मुलींना गुड टच, बॅड टच सांगणे आवश्यक आहे तर मुलांना 'नाही' ऐकायला शिकणे आवश्यक आहे हे सांगण्याची गरज आहे.

संस्कृती व संस्कार

विद्यार्थी हे राष्ट्राचे आणि समाजाचे भवितव्य असल्याने केवळ शिक्षणमंत्री म्हणून नव्हे तर शिक्षिका म्हणून विद्यार्थ्यांना सर्व आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा माझा प्रयत्न आहे. मुलांना शिक्षणाबरोबरच त्यांच्या कलागुणांना वाव देणे गरजेचे आहे. पण केवळ पुस्तकी शिक्षण न देता कृतिशील पद्धतीने विद्यार्थ्यांना शिकवता आले पाहिजे. सक्षम पिढी घडवण्यासाठी प्राथमिक शिक्षण महत्त्वाचे आहे. मुलांना प्राथमिक शिक्षण देते वेळीच चांगले संस्कार देणे गरजेचे आहे. आर्थिक परिस्थितीमुळे कोणी शाळाबाह्य राहू नये, याकडे विशेषत्वाने लक्ष देणे गरजेचे आहे. महाराष्ट्र शिक्षण क्षेत्रात आघाडीवर असून ही आघाडी टिकून ठेवण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

विद्यावाहिनी

शालेय विद्यार्थ्यांना थेट घरामध्येच शैक्षणिक मार्गदर्शन मिळावे, यासाठी शालेय शिक्षण विभाग दूरचित्रवाणीवर (डीटीएच) विद्यावाहिनी सुरू करणार आहे. बदलत्या तंत्रज्ञानानुसार महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती महामंडळ अर्थात बालभारतीही आता कात टाकत आहे. बालभारती ई-लर्निंग साहित्य निर्मितीबरोबरच ई-बालभारती प्रकल्पांतर्गत राज्यातील ७२५ शाळांमध्ये व्हर्च्युअल क्लासरूम ही योजना कार्यान्वित करत येत आहे. याचा दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना मोठा फायदा होणार आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी व्हॅल्युअॅबल ग्रुप या व्ही-सॅटवर आधारित तंत्रज्ञानाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. व्हर्च्युअल क्लासरूम उपक्रमामुळे कोणत्याही एका विषयावर नाही तर सर्वच विषयावर मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

शैक्षणिक योजना

शासनाने मुलींच्या शिक्षणाचा प्रचार व प्रसार व्हावा, यासाठी उपस्थिती भत्ता, सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना, मोफत गणवेश, मोफत पुस्तके, सावित्रीबाई फुले मागासवर्गीय शिष्यवृत्ती योजना, विद्यावेतन, शाळेला ये-जा करण्यासाठी राजमाता जिजाऊ मोफत सायकल योजना, एसटीने मोफत प्रवास करण्यासाठी अहिल्याबाई होळकर योजना, कस्तुरबा गांधी बालिका निवास विद्यालय, मानव विकास योजना तसेच लेक वाचवा लेक शिकवा यांसारख्या अनेक योजना कार्यान्वित केल्या आहेत.

- **बारावीपर्यंत मोफत शिक्षण** : या योजनेचा लाभ १२वीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या मुलींना मिळतो. अनुदानित तसेच विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या सर्व गटातील मुलींना ही योजना लागू आहे.
- **मोफत पास योजना** : ग्रामीण भागातील ज्या मुली गावात शाळा नसल्यामुळे शिक्षण घेऊ शकत नाहीत त्यांना शिक्षण पूर्ण करण्यासाठी जवळच्या गावातील शाळांमध्ये जाण्यासाठी इयत्ता पाचवी ते १२वीपर्यंत एसटीने मोफत प्रवास करण्याची सवलत देण्यात येते.
- **सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना** : इयत्ता पाचवी ते सातवीमधील इतर मागास, विमुक्त जाती, भटक्या

जमाती, विशेष मागास प्रवर्ग विद्यार्थिनींसाठी ही योजना आहे. विद्यार्थीनी इयत्ता पाचवी ते सातवीमध्ये शाळेत नियमित शिकलेली असणे आवश्यक असून प्रतिविद्यार्थिनीस दरमहा ६० रुपये प्रमाणे दहा महिन्यांकरिता ६०० रूपये दिले जातात.

■ **गळती रोखण्यासाठी उपाययोजना** : माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या इतर मागास वर्ग, विजाभज व विमाप्रच्या मुलींचे गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी आठवी ते दहावीपर्यंत वर्गात नियमित शिकणाऱ्या मुलींना दरमहा १०० रुपये याप्रमाणे दहा महिन्यांसाठी १००० एवढी शिष्यवृत्ती देण्यात येते.

■ **इयत्ता पाचवी ते दहावी विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती** : इयत्ता पाचवी ते सातवी मधील दोन गुणवत्ताधारक मागासवर्गीय विद्यार्थ्यांना तसेच इयत्ता आठवी ते दहावीमध्ये शिक्षण घेणाऱ्या पहिल्या दोन मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. ही शिष्यवृत्ती मागील वार्षिक परीक्षेत कमीत कमी ५० टक्के व त्याहून अधिक गुण मिळवून मागासवर्गीय विद्यार्थ्यांमधून पहिल्या व दुसऱ्या क्रमांकात उत्तीर्ण झालेल्या गुणवत्ता प्रदान विद्यार्थ्यांना मंजूर करण्यात येते. या शिष्यवृत्तीसाठी उत्पन्नाची अट नाही. इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना दरमहा ५० रुपये (५०० रुपये दहा महिन्यांसाठी), इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना दरमहा १०० रुपये (१००० रुपये दहा महिन्यांसाठी) दिले जाते.

■ **नववी ते दहावी मधील मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती** : अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे शाळेतील गळतीचे प्रमाण कमी व्हावे, यासाठी केंद्र शासनाने इयत्ता नववी व दहावीमध्ये शिकत असणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना सुरू केली आहे. या शिष्यवृत्तीसाठी पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा दोन लाख रुपये आहे. यामध्ये विद्यार्थ्यांच्या गुणांची अट नाही. योजनेचा लाभ केंद्राच्या इतर माध्यमिक पूर्व शिष्यवृत्तीच्या लाभार्थ्यांना लागू राहणार नाही. राज्य शासनाची अनुसूचित जाती प्रवर्गातील इयत्ता आठवी ते दहावीच्या सर्व मुलींसाठी सध्या सुरू आहे. यामध्ये पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा नाही. मात्र केंद्र शासनाच्या इयत्ता नववी व दहावी मध्ये शिकत असणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनेमध्ये दोन लाख रुपये इतके वार्षिक उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या इयत्ता नववी व दहावीच्या मुलींचा समावेश होणार आहे. त्यामुळे अनुसूचित जाती प्रवर्गातील इयत्ता आठवीच्या मुली आणि दोन लाखापेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या इयत्ता नववी व दहावीच्या मुलींकरिता सध्याची सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना यापुढेही चालू राहील. मात्र एकाच लाभार्थ्यास दोन्ही योजनेचा लाभ घेता येणार नाही.

वसतिगृहात राहणारे दरमहा ३५० रुपये (दहा महिन्यांसाठी), पुस्तके व तदर्थ अनुदान वार्षिक १००० रुपये, वसतिगृहात न राहणारे दरमहा १५० रुपये (दहा महिन्यांसाठी), पुस्तके व तदर्थ अनुदान वार्षिक ७५० रुपये, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी दरमहा १६० रुपये, मतिमंद विद्यार्थ्यांकरिता दरमहा २४० रुपये देण्यात येतात.

■ **मॉडेल स्कूल व मुलींचे वसतिगृह** : केंद्र शासनाने प्राथमिक, माध्यमिक शाळेमध्ये मुलींचे प्रमाण वाढवण्यासाठी तसेच मुलींच्या शैक्षणिक गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी दहा जिल्ह्यांतील अक्कलकुवा, धडगाव, तळोदा, शहादा, नंदूरबार, नवापूर, गेवराई, वडवणी, धारुर, हिंगोली, परभणी, गंगाखेड, जिंतूर, पूर्णा, पाथरी, सेलू, मानवत, भोकरदन, परतूर, मंठा, घनसांगवी, अंबड, जालना, बदनापूर, डहाणू, तलावरी, विक्रमगड, मोखाडा, जव्हार, गगनबावडा, इगतपूरी, त्र्यंबकेश्वर, पेठ, सुरगाणा, मुखेर, उमरी, धर्माबाद, बिलोली, धानोरा, एटापल्ली, भामरागड, अहेरी, सिरोंचा या ४३ ठिकाणी मॉडेल स्कूल व मुलींचे वसतिगृहांची योजना आहे.

■ **राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती** : विमुक्त जाती भटक्या जमाती/ विशेष मागास प्रवर्गाच्या मुला-मुलींचा शैक्षणिक दर्जा सुधारावा, त्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ व्हावी, या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आली आहे. विद्यार्थी इयत्ता ११ वी व १२ वी कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेणारा असावा. उत्पन्नाची अट नाही. विद्यार्थ्यास इयत्ता दहावीमध्ये ७५ टक्के व त्यापेक्षा जास्त गुण मिळणे आवश्यक आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना प्रतिमहा रुपये ३०० याप्रमाणे दहा महिने शिष्यवृत्ती देण्यात येते.

मोफत सायकल वाटप

ग्रामीण भाग व 'क' वर्ग नगरपरिषद क्षेत्रातील मुलींचे शैक्षणिक गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी माध्यमिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या दारिद्र्यरेषेखालील इयत्ता आठवीच्या मुलींसाठी ही योजना सुरू आहे. यासाठी इयत्ता सातवीमध्ये ४५ टक्के गुण प्राप्त केलेले असणे तसेच शासन मान्यताप्राप्त अनुदानित माध्यमिक शाळेत शिक्षण घेत असलेली असणे आवश्यक आहे. योजनेत लाभार्थ्यांची निवड करताना दुर्गम, अतिदुर्गम भाग तसेच शहरी भागात झोपडपट्टी तसेच गलिच्छवस्तीतील मुलींना प्राधान्य दिले जाते.

शब्दांकन : वर्षा फडके-आंधळे,
विभागीय संपर्क अधिकारी

कमीजास्त वेळ लागत असला तरी शासन स्तरावर होणाऱ्या निर्णयांची अंमलबजावणी प्रशासनामार्फत होते. शासनाच्या पलीकडे जाऊन आपण म्हणजे प्रत्येक व्यक्तीने दिव्यांग, निराधार, माता भगिनींकडे मानवतेच्या दृष्टीने, माणुसकीच्या भावनेने ती आपल्या घरातील एक व्यक्ती आहे असे समजून लक्ष दिले पाहिजे. प्रत्येक ठिकाणी त्यांच्याकडे प्राधान्याने पाहिले पाहिजे.

निराधारांना आधार

ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू
राज्यमंत्री, महिला व बालविकास

वंचित घटकांना न्याय देण्याला आपण प्राधान्य दिले पाहिजे. हा त्यांचा पहिला हक्क आहे. याचा विचार सर्वांनीच करावयाला हवा. शासनाच्या योजना शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी शासनासोबतच आपणा सर्वांची आहे. विशेषत: महिला व बालविकास विभागातील प्रत्येक अधिकारी, कर्मचाऱ्याची ही जबाबदारी आहे.

या विभागाचा राज्यमंत्री म्हणून काम करीत असताना मी विभागातील प्रत्येकाला हे सांगू इच्छितो की, या विभागात काम करताना तुम्ही विधवा, परित्यक्ता, घटस्फोटिता, दिव्यांग आणि निराधार घटकांच्या कल्याणाला प्राधान्य द्यायलाच हवे. संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा, राज्य निवृत्तिवेतन योजना, विधवा, परित्यक्ता आणि घटस्फोटितांसाठी स्वयंरोजगार योजना यासाठी जीव ओतून काम करायचे आहे.

आपल्यापेक्षा हुशार

आपल्या दिव्यांग माता भगिनींबाबत त्यांच्या सोयी-सुविधांसाठी काम करताना एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे, की ही मंडळी शारीरिकदृष्ट्या दिव्यांग असली तरी बौद्धिकदृष्ट्या आपल्यापेक्षा हुशार आहेत. आपल्या एका अंध भगिनीने हे जिल्हाधिकारी होऊन हे सिद्ध केले आहे. एसटी महामंडळात दिव्यांगांसाठी ज्या काही सुविधा आहेत, त्या त्यांना मिळाल्या पाहिजेत. त्यांना मिळणाऱ्या दुय्यम वागणुकीचा विचार प्रत्येकाने करायला हवा. त्यांना नैसर्गिकदृष्ट्या न्याय देण्याचा प्रयत्न करा. त्यांना मिळणारा हक्क, सवलती, सोयी-सुविधा या तुम्ही देत नसून शासनाने दिलेल्या आहेत. तुम्ही फक्त अंमलबजावणी करता. ती प्रामाणिकपणे करा. कोणत्याही कर्मचाऱ्याकडून, अधिकाऱ्याकडून दिव्यांगांना त्रास दिल्याची घटना व्हायला नको.

दिव्यांगासाठी असलेल्या शौचालयांचाही आपण विचार करायला हवा. त्या सुविधेची गरज ओळखून त्या तातडीने दिल्या पाहिजेत.

परित्यक्ता, विधवा, माता-भगिनीही सामाजिकदृष्ट्या वंचित घटक आहेत, असे समजून लक्ष द्यावे. मी तुम्हांला सांगू इच्छितो की, त्यांचे प्रश्न खूप गंभीर आहेत, शहरात राहणाऱ्यांना ते समजून येत नाहीत. पण जेव्हा गावाकडे फिरता, त्या वेळी ते प्रश्न आपणाला समजतात. अल्पसंख्याक समाज अथवा कोणताही समाज असो यातील अशा प्रकारच्या समस्या खरोखरच गंभीर आहेत. त्यांना बोलता येत नाही, हतबल असतात म्हणून त्यांच्या बाजूने उभे राहिले पाहिजे, असे मी समजतो.

आत्मविश्वास वाढवण्याची गरज

माझ्या अखत्यारीत असलेल्या विभागातील सर्व कर्मचारी अधिकाऱ्यांना माझे सांगणे आहे की, तुम्ही याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. ग्रामीण भागातील महिलांसाठी आपल्याला मोठी कामे करावयाची आहेत. त्यांचा आत्मविश्वास वाढवणे, त्यांचे शिक्षण, त्यांचे आरोग्य, त्यांच्यातील क्षमतेचा विकास, त्यांचे संघटन, सामाजिक, आर्थिक, राजकीय स्तरावर त्यांची पात्रता सुस्थापित करणे अशा बऱ्याच बाबींकडे आपणास लक्ष द्यावयाचे आहे. यासाठी झोकून देत काम करण्याची गरज आहे. दिव्यांगांना आधार देणे ही खरी माणुसकी आहे.

शब्दांकन : डॉ. राजू पाटोदकर

महिला आणि बालकांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी महिला व बालविकास विभाग केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत आहे. या विभागाच्या माध्यमातून माता व बालकांतील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत.

सक्षम माता, सुदृढ बालक...

आय.ए.कुंदन, सचिव, महिला व बालविकास

राज्यातील महिला व बालविकास विभाग महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना राबवत असून त्याद्वारे समाजातील तळागाळातील घटकांच्या उन्नतीचा मार्ग प्रशस्त करत आहे. माता सर्वच बाजूंनी सक्षम असेल तरच सुदृढ बालक होते. त्यामुळे महिलांचे सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक उन्नयन हा या विभागाचा उद्देश असून त्यादृष्टीने विविध योजना राबवण्यात येत आहेत. त्याचे सकारात्मक परिणामही दिसून येत आहेत.

प्रभावी अंमलबजावणी

महिला आणि बालकांचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी हा विभाग वचनबद्ध आहे. आमचे मुख्य कार्य धोरण आणि कार्यक्रमांना विकसित करणे आणि राज्यातील व केंद्रातील योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे हे आहे. बालक आणि महिला यांच्या हक्कांच्या अनुषंगाने आम्ही अनेक कायदे आणि योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत आहोत. 'प्रोटेक्शन ऑफ चाइल्ड फ्रॉम सेक्सुअल ऑफेन्स ॲक्ट २०१२' आणि 'प्रोटेक्शन ऑफ वुमेन फ्रॉम डोमेस्टिक व्हायलेन्स ॲक्ट २००५'ची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. याव्यतिरिक्त 'महिला आर्थिक विकास महामंडळ' (माविम) अंतर्गत महिलांना कौशल्य प्रदान करून आणि त्यांना उद्योजक प्रशिक्षण देऊन त्यांना उदरनिर्वाहाच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

मुलांच्या आणि मातांच्या पोषण आणि आरोग्य संबंधित गरजा पूर्ण व्हाव्यात म्हणून राज्य शासन पोषण अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करत आहे. या अभियानात आयसीडीएस - कॉमन ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर, जन आंदोलन, समुदाय- आधारित कार्यक्रम, नावीन्यपूर्ण उपक्रम इत्यादींचा समावेश आहे. आयसीडीएस-कॉमन ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर अंतर्गत सर्व अंगणवाडी सेविकांना मोबाइल फोन उपलब्ध करून दिलेले आहेत आणि बरीचशी माहिती आता डिजिटल स्वरूपात उपलब्ध होत आहे. त्याशिवाय समुदाय- आधारित कार्यक्रमामुळे समुदायातील लोकांच्या वर्तनात सकारात्मक बदल घडत आहेत.

राज्य नेहमी कुपोषणाविरुद्ध लढा देण्यासाठी तत्पर आहे व त्यासाठी २०२२ पर्यंत पोषण अभियानाची उद्दिष्टपूर्ती साध्य करण्याच्या दृष्टीने वाटचाल करताना महिला व बालकांच्या पूर्ण पोषणाची जबाबदारी आपण सगळे मिळून उचलण्याचा संकल्प यानिमित्ताने करू या!

माता व बालकांना पोषण आहार

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेद्वारे समाधानकारक पोषण प्राप्त करून देणे, हा आमचा मुख्य उद्देश आहे. राज्यात जवळजवळ १,०९,००० अंगणवाडी केंद्र आहेत. शहरी, ग्रामीण आणि आदिवासी क्षेत्रातील गर्भवती महिला, स्तनदा माता, व शून्य ते सहा वर्ष वयोगटातील बालकांना या कार्यक्रमांतर्गत पोषण आहार दिला जात आहे.

पोषण अभियानांतर्गत, वयानुसार कमी उंची असणे (स्टंटिंग), वयानुसार कमी वजन असणे (अंडरवेट), जन्मतः कमी वजन असणे (लो बर्थ वेट) तसेच उंचीनुसार कमी वजन असणे याचे प्रमाण प्रतिवर्षी दोन टक्केप्रमाणे कमी करणे आणि शून्य ते सहा वर्ष वय असलेले बालकांचे व १५-४९ वर्ष वयातील महिला यांचे रक्तक्षयाचे प्रमाण प्रतिवर्षी तीन टक्क्यांप्रमाणे कमी करणे असे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. ही उद्दिष्टे केंद्र शासनाने मार्च २०१८ मध्ये सुरू केलेल्या पोषण अभियानचे मूलभूत घटक आहेत. २०२२ पर्यंत अपेक्षित उद्दिष्टपूर्ती केली जाणार आहे.

अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी शासनामार्फत विविध योजना राबवण्यात येत आहेत. मुलींच्या शिक्षणासाठी तसेच महिलांच्या आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक सक्षमीकरणासाठी या योजनांचा लाभ होत आहे.

अल्पसंख्याक महिलांची उन्नती

राज्य शासन अल्पसंख्याक समुदायाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध आहे. अल्पसंख्याक समुदायांतील महिला आणि मुलींच्या प्रगतीसाठी राज्य शासन विविध योजना राबवत आहे.

२१ ठिकाणी वसतिगृहे सुरू

राज्यात अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना वसतिगृहांची योजना प्रभावीपणे राबवली जाते.

राज्यात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ (जळगाव), घनसावंगी (जि. जालना), शासकीय अध्यापक महाविद्यालय (पनवेल), राजाराम महाविद्यालय (कोल्हापूर), शासकीय विज्ञान संस्था (औरंगाबाद), शासकीय विदर्भ ज्ञानविज्ञान संस्था (अमरावती), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ (औरंगाबाद), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ (नांदेड), डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ (अकोला), शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय (जळगाव), शासकीय तंत्रनिकेतन (सोलापूर, हिंगोली, वाशिम आणि जिंतूर (परभणी)), परभणी जिल्ह्यातील परभणी, पुर्णा, गंगाखेड, सेलू, पाथरी तसेच चंद्रपूर (जि. चंद्रपूर) आणि वसमत, (जि. हिंगोली) येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) या २१ ठिकाणी अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी वसतिगृहे सुरू झाली आहेत. या वसतिगृहांची प्रवेशक्षमता १ हजार ९१० इतकी आहे. वसतिगृहात अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी ७० टक्के तर बिगर अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी ३० टक्के जागांवर प्रवेश देण्यात येतो.

शैक्षणिक कर्ज योजना

अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थी, विद्यार्थीनींना शिक्षण घेणे सुलभ व्हावे, यासाठी मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडून शैक्षणिक कर्ज योजना राबवली जाते. उच्च व्यावसायिक शिक्षणासाठी यातून कर्ज दिले जाते. शैक्षणिक कर्ज योजनेचा लाभ मुली उच्च शिक्षण पूर्ण करू शकतात.

महामंडळामार्फत अल्पसंख्याक समाजातील बेरोजगारांसाठी व्यवसाय कर्ज दिले जाते. बेरोजगार मुली, महिलाही या योजनेचा लाभ घेऊन आपला व्यवसाय, उद्योग सुरू करू शकतात. या योजनेची अधिक माहिती महामंडळाच्या mdd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर मिळेल.

> “ न्या. सच्चर समितीच्या अहवालानंतर राज्यात २००८ मध्ये स्वतंत्र अल्पसंख्याक विकास विभागाची स्थापना करण्यात आली. तेव्हापासून राज्यात अल्पसंख्याक समाजाच्या हितासाठी विविध योजना राबवण्यात येतात. मुस्लीम, बौद्ध, ख्रिश्चन, जैन, शीख आणि पारशी समुदायांचा अल्पसंख्याकांमध्ये समावेश करण्यात आला आहे. या समाजातील मुली आणि महिलांच्या सक्षमीकरणासाठी विभागामार्फत व्यापक उपाययोजना राबवण्यात येतात. ”
>
> **- श्री. नवाब मलिक, मंत्री, अल्पसंख्याक विकास विभाग**

विविध योजना

- अल्पसंख्याकासाठी ४२ आयटीआयमध्ये दुसऱ्या व तिसऱ्या पाळीत तसेच १५ शासकीय तंत्रनिकेतनमध्ये दुसऱ्या पाळीतील वर्ग चालवले जातात. उच्च व्यावसायिक तसेच १२वीनंतरच्या सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना राबवली जाते. मॅट्रिकपूर्व / मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीचाही लाभ दिला जातो. अल्पसंख्याक समाजातील मुली या योजनांचा लाभ घेऊ शकतात.
- आर्थिक कारणास्तव शिक्षण पूर्ण करू शकत नाही अशा अल्पसंख्याक विद्यार्थिनींसाठी मौलाना आझाद राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजना राबवण्यात येते. शाळा - महाविद्यालयाचे शुल्क, अभ्यासक्रमाची पुस्तके, लेखनसामग्री, उपकरणे आदींची खरेदी, निवास व भोजन व्यवस्थेचा खर्च आदींकरिता ही शिष्यवृत्ती देय आहे. केंद्र शासनाच्या मौलाना आझाद शिक्षण प्रतिष्ठानमार्फत ही योजना राबवली जाते. अधिक माहिती www.maef.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- अल्पसंख्याक समाजातील महिलांमध्ये नेतृत्व क्षमतेचा विकास व्हावा यासाठी ‘नई रोशनी’ योजना राबवली जाते. यामध्ये अल्पसंख्याक महिलांना सरकारी प्रणाली, बँका आणि इतर संस्थांसोबत कार्यव्यवहार आदी विविध बाबींविषयक प्रशिक्षण दिले जाते. अल्पसंख्याक महिलांना साधने आणि तांत्रिक कौशल्य देऊन त्यांना सक्षम बनवले जाते. त्यांच्यात विश्वास निर्माण केला जातो. या योजनेविषयी अधिक माहिती www.minorityaffairs.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

– ईशाद बागवान,
विभागीय संपर्क अधिकारी

प्रेरणेचा आदर्श !

महिलांनी प्रत्येक क्षेत्रात उंच भरारी घ्यावी यासाठी शासन प्रयत्न करत असते. मात्र उंच भरारी घेण्याची वृत्ती काही स्त्रियांमध्ये उपजतच असते. काहीजणी जिद्द आणि परिश्रमाच्या जोरावर स्वत:ची ओळख निर्माण करून सामान्य महिलांसमोर एक आदर्श निर्माण करतात. त्यांच्या कर्तृत्वामुळे त्या अनेकांच्या प्रेरणास्थान बनतात.

आम्ही सक्षम...

पारंपरिक व्यवसायाबरोबरच व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून औरंगाबाद जिल्ह्यातील भडजी (ता. खुलताबाद) येथील राणी लक्ष्मीबाई महिला बचतगटाच्या महिलांनी नवीन व्यवसायाची कवाडे उघडली आहेत. रत्ना धनसिंग पुसे या बचतगटाच्या प्रमुख आहेत. परिसरातील दहा महिलांनी एकत्र येऊन काहीतरी करावे, असे त्यांना वाटत होते. त्यातून हा बचतगट निर्माण झाला. या बचतगटाच्या माध्यमातून पौष्टिक आहार म्हणून चिक्की तयार करून विक्री करण्याचे त्यांनी ठरवले. बँक ऑफ महाराष्ट्रकडून कर्ज घेतले. या बचतगटाच्या माध्यमातून शेंगदाणे, राजगिरा, तीळ, खोबरे यासारख्या चिक्की हाताने बनवतात. चिक्की घरीच बनवत असल्यामुळे जागेसाठी भाडे द्यावे लागत नाही. राजगिरा, तीळ, खोबरे, शेंगदाण्यापासून बनवलेल्या या चिक्की वेरुळ लेणी, खुलताबाद येथील भद्रा मारुती मंदिर तसेच औरंगाबाद, पुणे, मुंबई, व दिल्ली या शहरांमध्ये विक्री केली जाते. मुंबई वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्समधील एमएमआरडीए मैदानावर श्रीमहालक्ष्मी सरस प्रदर्शनात या बचतगटाच्या महिलांनी बारा दिवसात साडे चार लाखांची अकरा क्विंटल चिक्की विक्री केली. यातून त्यांना खर्च वजा जाता निव्वळ नफा दोन लाख रुपये मिळाला.

- विजय चौधरी

बीजमाता

देशी वाणांमधली खरी ताकद ओळखली ती कोभांळणे या छोट्याशा गावात राहणाऱ्या राहीबाईनी. अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील दुर्गम भागातील राहीबाई सोमा पोपेरे यांना आज सारा महाराष्ट्र नव्हे तर सारा देश 'बीजमाता' म्हणून ओळखतो आहे.

राहीबाई यांच्याकडे सर्व प्रकारच्या जुन्या गावठी पालेभाज्या व वेलवर्गीय भाज्यांचे बियाणे जतन केलेले आहे. त्यांनी भाजीपाला, भात, गहू, बाजरी, कडधान्ये पिकांच्या ११२ प्रकारचे वाण जतन करून ठेवले आहेत. त्यांनी महिला शेतकऱ्यांचा गट स्थापन केला असून, त्या माध्यमातून जुन्या वाणांचे बीजोत्पादन केले जाते. आतापर्यंत सुमारे एक लाख लोकांनी त्यांनी तयार केलेले बियाणे त्यांच्याकडून नेले आहे. देशभरातून कृषी तंत्रज्ञान शिकणारे अनेक विद्यार्थी त्यांचा हा प्रकल्प बघायला येतात.

राहीबाईं पोपेरे यांना राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते 'पद्मश्री'ने गौरवण्यात आले. याबद्दल कृषिमंत्री दादाजी भुसे यांनी त्यांचा साडीचोळी देऊन सत्कार केला.

राहीबाई यांनी जुनी परंपरा पुनर्जीवित केली आहे. ते काम राज्यातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी कृषी विभाग सहकार्य करणार आहे. मानवी आरोग्यासाठी उपयुक्त असलेल्या स्थानिक वाणांच्या संवर्धनाला चालना देतानाच त्याच्या बीजोत्पादनासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले जाईल. स्थानिक देशी बियाणांचं वाण जतन करण्याचं अमूल्य काम त्या करीत असून राज्यातील शेतकऱ्यांपर्यंत त्यांचे काम पोहोचावे, यासाठी कृषी विभाग त्यांना सहकार्य करणार आहे.

राहीबाई करीत असलेल्या कामाचा अहवाल मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यापुढे सादर करू, असे कृषिमंत्र्यांनी या वेळी सांगितले. त्या करीत असलेल्या कामाला मोठं स्वरूप देऊ. त्यांचे जुन्या वाणांचे संवर्धनाचे काम शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक आहे. स्थानिक वाण प्रसाराला मदत करतानाच ही संकल्पना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवली जाईल, अशी ग्वाही कृषिमंत्र्यांनी या वेळी दिली.

ध्यास संशोधनाचा....

नम्रता अंकुश गिरी

कंदमुळे आपल्या आरोग्यासाठी अतिशय पोषक असतात. त्यातही रताळे हा आपल्या उपवासातील एक महत्त्वाचा अन्नपदार्थ. मात्र तो केवळ उपवास नव्हे तर रोज आपल्या आहारात असावा एवढा पौष्टीक आहे. त्याविषयी गोलटगाव (जि. औरंगाबाद) येथील नम्रता अंकुश गिरी या संशोधन करत आहेत. त्या केरळ येथील तिरुवनंतपुरममधील केंद्रीय कंदमुळे पीक संशोधन संस्थेत कृषी शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत आहेत. रताळ्यांपासून तयार करण्यात आलेले पदार्थ आरोग्यासाठी किती व कसे फायदेशीर आहेत याबाबत त्या संशोधन करत आहेत.

श्रीमती गिरी यांनी परभणीच्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातून बीटेक फूड टेक्नॉलॉजीमध्ये पदवी पूर्ण केली. पती ॲड. दुर्गेश शंकर पुरी यांची त्यांना साथ लाभली. त्यांनी फूड टेक्नॉलॉजीमध्ये एमटेक पूर्ण केले. असिस्टंट प्रोफेसर म्हणून काम करत असताना नवी दिल्ली येथील कृषी वैज्ञानिक निवड मंडळातर्फे घेण्यात आलेल्या युपीएससीच्या स्पर्धा परीक्षेत पूर्व, मुख्य परीक्षा व मुलाखतीत पहिल्याच प्रयत्नात त्यांना यश मिळाले. कृषी शास्त्रज्ञ (अन्नतंत्र) म्हणून त्यांची निवड झाली. निवड झालेल्या त्या महाराष्ट्रातील पहिल्या महिला उमेदवार आहेत. या परीक्षेत महाराष्ट्रात पहिल्या व देशात आठव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या. केंद्रीय कंदमुळे पीक संशोधन संस्थान तिरुवनंतपुरम, केरळ येथे त्यांची कृषी शास्त्रज्ञ म्हणून निवड झाली. २०१४ पासून तिथे त्या कार्यरत आहेत.

मैद्याऐवजी कंद मुळाचे पीठ वापरून आरोग्यवर्धक, डायबेटीक फ्रेण्डली बेकरी उत्पादने कसे बनवता येतील याविषयी त्यांचे संशोधन सुरू आहे. त्यामुळे बिस्कीट, केक, कुकीज, पास्ता, शेवया, रेडी टू ईट प्रोडक्ट, न्युट्रिबार इत्यादी पदार्थ रताळ्यांपासून बनवता येणार आहेत. त्याचप्रमाणे रताळ्यापासून उपवासाला चालेल असा पास्ता, नूडल्स बनवण्याबातही त्यांचे संशोधन सुरू आहे. त्यामध्ये त्यांना बऱ्यापैकी यशही आले आहे. रताळ्यापासून स्टार्च आणि पीठ (पावडर) प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांना रोजगाराची संधी मिळून आर्थिक सुबत्ता येऊ शकते. यामुळे पौष्टिक अन्नपदार्थ नागरिकांपर्यंत पोहोचतील.

रताळ्यामध्ये कॅरोटीन, ॲन्थोसायनिक, स्टार्च, प्रथिने, (जीवनसत्त्व) ब जीवनसत्त्व व खनिजांचे प्रमाण जास्त असते. तसेच रताळ्याच्या सेवनामुळे जीवनसत्त्व 'अ' ची कमतरताही भरून निघत असल्याचे श्रीमती गिरी सांगतात. शेतकऱ्यांनी व उद्योजकांनी एकत्र येऊन कंदफळाचे मूल्यवर्धन केल्यास फायदा होईल. मूल्यवर्धनामुळे रताळ्याची मागणी वाढेल. याचा शेतकऱ्यांना, उद्योजकांना फायदा होईल, असे श्रीमती गिरी यांनी सांगितले.

- संतोष देशमुख

स्व कमाईची नवी ओळख...

वर्धा जिल्ह्यातील करंजी काजी येथील स्नेहलता सावरकर या

सेंद्रीय पद्धतीने मशरुमचे उत्पादन घेतात. यामध्ये फ्रेश मशरूम, ड्राय मशरूम पावडर, मशरूम लोणची, चटणी, मशरूम मुगवड्या, मुरंबा अशी विविधांगी मशरूम उत्पादने घेतात. ग्राहकांकडून सेंद्रिय पद्धतीने पिकवण्यात आलेल्या मशरूम मालाला विशेष मागणी होते. नाबार्डच्या माध्यमातून आम्हाला 'स्व' कमाईतून 'स्व' ओळख मिळाल्याचा अभिमान असल्याचे श्रीमती सावरकर यांनी सांगितले.

राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) तसेच उत्कर्ष फाऊंडेशनच्या वतीने महिला बचतगटांनी तयार केलेल्या वस्तूंचे राज्यस्तरीय प्रदर्शन नागपूर येथे नुकतेच आयोजित करण्यात आले होते. महिला बचतगटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचे काम राज्यात सुरू आहे. यातून महिलांना रोजगारही मिळाला असून काही महिला मोठ्या उद्योजिकाही बनल्या आहेत. बचतगटाच्या माध्यमातून महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनत आहेत. मात्र ग्रामीण भागातील महिला मार्केटिंगमध्ये कमी पडतात. त्यांना या प्रदर्शनाच्या माध्यमातून आपल्या वस्तूंची जगभरात ओळख करून देण्याची संधी मिळत आहे. ग्राहकांना सर्व प्रकारच्या वस्तू एकाच छताखाली उपलब्ध होत आहेत.

नाबार्डच्या माध्यमातून समाजातील गरिबी निर्मूलनाला हातभार लागत असून महिला सक्षमीकरणाचा वेग मुख्यत्वे ग्रामीण स्तरावर वाढत आहे. या प्रदर्शनात राज्यातील १५ जिल्ह्यांतील महिला बचत गट सहभागी झाले होते. यासाठी जिल्ह्यातून ५० तर इतर जिल्ह्यातून ३५ महिला बचतगटांनी विविध स्टॉल्स लावले होते. यात सुमारे ६० प्रकारच्या वस्तूंचा समावेश होता.

- अपर्णा यावलकर-डांगोरे,
विभागीय माहिती कार्यालय, नागपूर

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या परिसरात आदिवासींच्या काही वस्त्या आहेत. त्यांची लहान घरे आहेत. जंगल हेच त्यांचे घर आणि गाव. वाहतुकीचे कोणतेही साधन नाही. मात्र या घनदाट जंगलातून रोज चार तासांची पायपीट करून दोन अंगणवाडी सेविका आपले कर्तव्य बजावून माता व बालकांच्या पोषणाची जबाबदारी स्वयंस्फूर्तीने पार पाडत आहेत. अंजली किसन जाधव आणि सोनल संजाव बराप असे या दोन कर्तव्यदक्ष सेविकांचे नाव.

या दोन्ही महिला अंगणवाडीतील मुलांची काळजी घेतात. त्यांचे वजन व उंची घेऊन वाढीची देखरेख करतात. या आदिवासी कुटुंबातील लोकांना घरपोच आहाराचे वाटप करतात. त्यांचे हे काम तेथील अनेक कुटुंबांना दिलासा देणारे आहे. त्यामुळे या दोघींच्या स्वागताला ते सदैव हसतमुखाने हजर असतात. हा आपुलकीचा अनुभव या दोघींना रोज चार तास चालण्याची ऊर्जा आणि स्फूर्ती देतो.

तिच्या हिमतीला शासनाची साथ

औरंगाबाद जिल्ह्यातील तिडी/मकरमतपूरवाडी (ता. वैजापूर) गावातील श्रीमती सोनू बन्सी सोळसे (वय २६) या लग्नानंतर पतीच्या व्यसनाधीनतेला कंटाळून मुलासह आईवडिलांकडे राहून जीवन जगत होत्या. आईवडिलांना त्रास नको म्हणून भूमिहीन असलेल्या श्रीमती सोनू उदरनिर्वाहासाठी गावातील शाळेत साफसफाई, शेतमजुरी व धुणीभांडी करतात. मोलमजुरी करून पोटाचा प्रश्न मिटायचा पण डोक्यावर हक्काचे छत नव्हते. त्यांची जगण्याची तळमळ पाहून ग्रामसभेने ठराव संमत करून त्यांच्या नावाची रमाई आवास योजनेसाठी शिफारस केली. सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यांना घरकूल मंजूर झाले. पंचायत समितीचे ग्रामीण गृहनिर्माण अभियंता प्रमोद बेंगाळ यांनी घरकूल मंजूर झाल्याचे सांगताच आपल्याला हक्काचा निवारा मिळणार या कल्पनेने श्रीमती सोनू सोळसे यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. त्या क्षणीच त्यांनी ठरवले की शासनाकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीव्यतिरिक्त आपल्या बचतीतील पैसे खर्च करायचे मात्र, घर नीटनेटके करायचे.

घरकूल बांधण्यासाठी जागेची अडचण होती. वडिलांनी घरकूल बांधण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली. रमाई आवास योजनेंतर्गत बांधकामासाठी मदतीचा पहिला, दुसरा, तिसरा आणि अंतिम हप्ता मिळत गेला तसतसे त्यांचे घर उभे राहिले. गट विकास अधिकारी अजयसिंह पवार तसेच ग्रामसेवक व ग्रामीण गृह निर्माण अभियंता याच्या मार्गदर्शनाने घरकूल पूर्ण झाले. टुमदार घर उभे राहिल्याने त्यांना जगण्याची ऊर्मी मिळाली. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती संगीतादेवी पाटील यांनी या घराला भेट दिली. घरासमोर पाच झाडे लावण्यास तसेच गावातील महिलांना एकत्र घेऊन स्वयंसाहाय्यता बचतगटाची स्थापना करून लघुउद्योग सुरू करण्यासाठी प्रोत्साहित केले.

घरकूल पूर्ण झाल्यामुळे त्यांच्या राहणीमानात बदल झाला आहे. समाजाचा त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. पावसाळ्यात कुडाच्या घरात पाणी येत असे, साप, विंचू येत असे. त्यामुळे घरात राहणे धोक्याचे होते. आता त्या पक्क्या घरात राहत असल्यामुळे ऊनपावसाचा त्रास उरलेला नाही. तसेच घरात शौचालय असल्याने कोणत्याही साथीच्या रोगाला बळी पडण्याचा धोका नाही.

- गणेश माधवराव चुकेवाड, विस्तार अधिकारी, पंचायत समिती, वैजापूर

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त 'तेजश्री फायनान्शियल सर्व्हिसेस' या योजनेचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)

महिलांच्या सर्वांगीण विकासात महत्त्वाचे माध्यम ठरत असलेले महिला आर्थिक विकास महामंडळ अर्थात माविम महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी महिलांच्या विकासात अग्रेसर ठरू लागले आहे. महिलांचे संघटन, त्यांच्या क्षमतांचा विकास करून त्यांना आत्मनिर्भर करण्यात माविम महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

महिला विकासात अग्रेसर

महाराष्ट्राचा आर्थिक विकास ग्रामीण विकासावर अवलंबून आहे. विशेषतः शेतीवर अवलंबून असलेल्या या आर्थिक व्यवस्थेला वेगळी दिशा देण्याची गरज ओळखून राज्य शासनाने जे प्रमुख काही निर्णय घेतले त्यामध्ये माविमचे महत्त्व अधिक आहे. स्वयंसहायतेच्या माध्यमातून महिलांना आत्मनिर्भर करण्याच्या उद्देशाने सुरू झालेला हा उपक्रम गेल्या चार दशकांहून अधिक काळ आपल्या उद्देशानुरूप कार्यरत आहे. माविमला देश आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर मिळालेले पुरस्कार हेच

"राज्यात प्लास्टिक बंदीच्या काळात महिला आर्थिक विकास महामंडळाने कागदी व कापडी पिशव्या बनवण्याची जबाबदारी उत्तमपणे पार पाडली. शाश्वत विकासाचे उद्दिष्ट व महिला सक्षमीकरण यांचे जवळचे नाते आहे, हे यातून दिसून येते. 'माविम' आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचे सक्षमीकरण करण्यासाठी शासन नेहमी प्रयत्नशील राहिले आहे. महिला बचतगटाचे काम करताना ग्रामविकास, नगरविकास विभाग यांचेसुद्धा बचतगट आहेत. यांच्याबरोबरच माविमचे महिला बचतगट पुढे जात आहेत व आपली नवनवीन उत्पादने बाजारात आणत आहेत. भविष्यातही माविमची प्रगतीकडे वाटचाल अशीच सुरू राहील."

- डॉ. नीलम गोऱ्हे, उपसभापती, विधानपरिषद

विकासाचे महत्त्व व महामंडळाची या कामातील तज्ज्ञता ध्यानी घेऊन राज्य शासनाने महामंडळाला महिला विकासाची राज्यस्तरीय 'शिखर संस्था' म्हणून घोषित केले आहे. त्यामुळे केंद्र व राज्य शासन पुरस्कृत महिलांसाठीच्या विविध विकासात्मक योजना राज्यात कार्यान्वित करण्याचे महत्त्वाचे कार्य तिचे आहे. स्वयंसाहाय्य बचतगट, वित्तीय संस्था, स्वयंसेवी संस्था व शासनाचे संबंधित विभाग यांच्यामध्ये समन्वय साधण्याचे महत्त्वाचे कार्यही माविम करीत आहे.

माविमचा विस्तार

संपूर्ण राज्यभरात आपला कार्यविस्तार असलेल्या माविमचे मुख्य कार्यालय मुंबई बांद्रा येथे स्थित असून, माविमची मुंबईसह ग्रामीण भागात ३६ जिल्हा कार्यालये आहेत. माविममार्फत राबवण्यात येणाऱ्या सर्व योजनांची अंमलबजावणी माविम जिल्हा कार्यालयातर्फे होत असते, महिलांच्या आर्थिक गरजा, त्यांच्यातील क्षमता ओळखून त्यांना आवश्यक ती मदत करण्यास येथील अधिकारी आणि कर्मचारी वर्ग तत्पर असतात.

> महिला आर्थिक विकास महामंडळातील (माविम) शहरी व ग्रामीण भागातील महिलांचे काम उत्कृष्ट आहे. चोहोबाजूंनी विकासाच्या दिशेने महाराष्ट्र सतत पुढे जात आहे. महिलांचे मन जाणून घेऊन त्यांना योग्य दिशा दिली तर त्या नक्की आपल्या क्षेत्रात प्रगती करू शकतात. यासाठी त्यांना शासनातर्फे सर्व सहकार्य केले जाईल, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या महिला बचतगटांचे काम प्रेरणादायी आहे. महामंडळाच्या भविष्यातील प्रगतीसाठी हे काम महत्त्वाचे आहे.
>
> **- श्री. उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री**

विशद करतात की, माविम राज्यातील महिलांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि औद्योगिक विकासात महत्त्वाचे माध्यम ठरत आहे.

विकासाच्या निरंतर प्रक्रियेतून महिलांसाठी सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय प्रस्थापित करण्याचे ध्येय घेऊन स्थापन झालेला महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) हा राज्य शासनाचा अंगीकृत उपक्रम आहे. आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्ताने २४ फेब्रुवारी १९७५ रोजी या महामंडळाची स्थापना झाली. महिलांच्या सर्वांगीण

धोरणे व दृष्टिकोन

- जिल्हास्तरावर महिलाच्या विकासात्मक योजना व कार्यक्रमाची सुनियोजित पद्धतीने अंमलबजावणी.
- लाभार्थ्यांच्या गरजानुसार उपक्रमांचे नियोजन व अनुदानावरील अवलंबित्व कमी करण्यावर भर.
- नियोजनात तळापासूनच्या लाभार्थ्यांचा सहभाग.

विविध कार्यक्रमांची फलिते

- माविमने स्थापन केलेल्या ३६१ लोकसंचलित साधन केंद्रांपैकी (सीएमआरसी) ८० टक्के सीएमआरसी स्वबळावर कार्यरत आहेत.
- स्वयंसाहाय्य बचतगटातील महिलांना दोन ते तीन कायमस्वरूपी टिकणारे उत्पन्नाचे स्रोत मिळाले.
- ६१८० मायक्रो लाईव्हलीहूड प्लॅनमध्ये (सूक्ष्म उदरनिर्वाह योजना) १,५१,०५९ महिलांचा सहभाग.
- मायक्रो लाईव्हलीहूड प्लॅनमध्ये सामील महिलांच्या उत्पन्नात ५000 ते २0,000 पर्यंतची वाढ.
- विविध बँकांनी स्वयंसाहाय्य बचत गटातील महिलांना (२८३६.३८ कोटी रुपये) कर्ज उपलब्ध करून कर्ज दिले.
- विविध विभागांसोबत कृतिसंगम साधून ४४ कोटी रुपयांचा (आर्थिक वर्ष २०१८-१९) महिलांना लाभ मिळवून देण्यात यशस्वी.
- महिलांची मालमत्तेत मालकी, निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग व पंचायत राज संस्थांमध्ये महिलांचे स्थान मिळवून देण्यात यशस्वी.
- कृषी पद्धतीमध्ये तंत्रज्ञानाचा वापर करून महिलांचे काबाडकष्ट कमी करण्याचा प्रयत्न.

- कार्यक्षेत्रातील वास्तविकतांवर आधारित प्रक्रिया आणि धोरणे यांची लवचीक पद्धतीने अंमलबजावणी.
- प्रभावी व्यवस्थापन व कार्यसंघाच्या भावनेच्या मदतीने अधिकारी आणि कर्मचारी यांच्यामध्ये स्थैर्यता.
- एकहाती सत्ता किंवा एकाधिकारशाहीला अटकाव करण्यासाठी योग्य त्या प्रतिबंधक उपाययोजना.
- गरिबातील गरीब लाभार्थी

महिला आर्थिक विकास महामंडळास नियोजन विभागाकडून २०१८-१९ या वर्षात ३१ कोटी तीन लाख निधी उपलब्ध करून दिला आहे. त्याचा महामंडळाने उपयोग करून आपल्या विविध उपक्रमाच्या माध्यमातून मंडळाचा नावलौकिक वाढवावा. राज्य सरकारच्या विविध विभागांना ज्या ज्या वस्तू लागतात त्या वस्तूंचे उत्पादन महामंडळाने करावे. महिला महामंडळावर विश्वास असून त्यांना शासनातर्फे जे कर्ज दिले जाते त्याची वेळेत परतफेड त्यांच्याकडून होत असते.

- श्री. अजित पवार, उपमुख्यमंत्री

निवडण्यासाठी स्मार्ट संसाधनाचा उपयोग.

- सूक्ष्म निरीक्षण करून सापेक्ष गरिबी संबोधित करणे.

माविमच्या कामाची रणनीती म्हणून कोणत्याही स्वयंसाहाय्य बचतगटावर आधारित कार्यक्रम/प्रकल्प यामध्ये खालील चार प्रमुख घटकांवर भर दिला जातो.

संस्था बांधणी व बळकटीकरण

माविमचा विश्वास आहे की, संस्था बांधणी व बळकटीकरणाची प्रक्रिया महिलांच्या सामुदायिक विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. संस्था बांधणीच्या प्रक्रियेत स्वयंसाहाय्य बचतगट, ग्रामविकास समित्या व क्लस्टर स्तरावर स्वयंसाहाय्य बचतगटाचे फेडरेशन अर्थात लोकसंचलित साधन केंद्राचा (सीएमआरसी) समावेश होतो. महामंडळाने बांधणी केलेल्या संस्थांनी सामाजिक भांडवल, लोकशाही गव्हर्नन्स, सदस्यांना विविध कार्यक्रम आणि सेवा देण्यासाठी प्रशासकीय प्रणाली विकसित केली आहे. सोबतच सोशल इंटरप्राईज डेव्हलपमेंटसारखे उपक्रम हाती घेणे व विविध भागीदारांच्या माध्यमातून संसाधन एकत्र करणे यावर भर दिलेला आहे.

सूक्ष्म वित्त सेवा

या घटकांतर्गत - • अंतर्गत बचत आणि कर्ज देणे. • मोठ्या रकमेचे कर्ज मिळवण्यासाठी बँका व इतर वित्तीयसंस्थांसोबत भागीदारी करणे. • स्वयंसाहाय्य बचतगटातील महिलांना विम्याचा लाभ मिळवून देण्यासाठी विमा कंपन्यांशी जोडणे.

उपजीविका व उद्योजकता विकास

महिलांना उत्पन्नाचे स्रोत उपलब्ध करून देण्यासाठी, महिलांकडे असणारी कौशल्ये विकसित करणे आणि नवीन कौशल्यांची ओळख करून देणे. प्रगत तंत्रज्ञान व श्रमाची बचत करणाऱ्या पायाभूत सुविधांची ओळख करून देऊन महिलांचा उद्योजकता विकासात सहभाग वाढवणे. बचतगटांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी आवश्यक ते सहकार्य करणे.

आरोग्य

महिलांचे आरोग्य हा अतिशय संवेदनशील विषय आहे. महिलांचे आरोग्य सुदृढ राहण्यासाठी आणि त्यांच्यात आरोग्य आणि स्वच्छतेविषयी जागृती निर्माण करण्यासाठी बाहेरील संस्थांसोबत भागीदारी कार्य करण्यात येत आहे.

अल्पसंख्याक महिला सक्षमीकरण

महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विभाग व अल्पसंख्याक आयोग यांच्या मदतीने एकूण १० अल्पसंख्याकबहुल शहरांमध्ये (मुंबई-धारावी, चांदिवली, ट्रॉम्बे, ठाणे-भिवंडी, मुंब्रा-कौसा, नाशिक-मालेगाव, औरंगाबाद-परभणी, नांदेड, वाशिम-कारंजा, नागपूर, पुणे व सांगली-मिरज) महिला सक्षमीकरणाचे उपक्रम राबवले जात आहेत.

“ महिला बचतगटाची चळवळ ही फार जुनी असून आज बचतगट मोठ्या प्रमाणावर प्रगती करत आहेत. महिला जसे कुटुंब चांगले सांभाळू शकतात तसाच त्या देशही सांभाळू शकतात. समाजातील उत्पादनाच्या गरजा ओळखून विविध उपक्रम राबवून महामंडळाचे उत्पादन वाढवावे, त्यासाठी महिलांना संधी उपलब्ध करून देण्यात येईल.

- श्री. बाळासाहेब थोरात, महसूल मंत्री ”

कृषी विकास प्रकल्प

विदर्भातील अमरावती, यवतमाळ, वाशिम, अकोला, बुलडाणा व वर्धा या प्रमुख सहा जिल्ह्यांमध्ये शेतकरी आत्महत्याग्रस्त प्रमाण जास्त असल्यामुळे महाराष्ट्र शासन व आयफॅड यांच्या सहकार्याने कृषी समृद्धी समन्वित कृषी विकास प्रकल्प २००९ पासून कार्यान्वित करण्यात आलेला आहे. हा कार्यक्रम जून २०१९ पर्यंत पूर्ण झाला.

अंत्योदय योजना

महिला आर्थिक विकास महामंडळ या प्रकल्पामध्ये संसाधन संस्था म्हणून भूमिका बजावते व हा प्रकल्प राज्याच्या ३४ जिल्ह्यांतील २५० शहरांत राबवण्यात येतो.

हा प्रकल्प सप्टेंबर २०१७ ते ३० मार्च २०२४ पर्यंत राहील. या प्रकल्पात शहरातील गरीब व त्यांच्या संस्थांचे बळकटीकरण करणे व त्यांना क्षमतावृद्धिपर प्रशिक्षण देणे अशी माविमची भूमिका राहील.

ग्रामीण जीवनोन्नती अभियान

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत ठाणे (भिवंडी, शहापूर), सोलापूर (माळशिरस, मोहोळ) व गोंदिया (सालेकसा, तिरोडा) या तीन जिल्ह्यांमध्ये एकूण सहा तालुक्यांकरिता तीन वर्षांसाठी तांत्रिक तज्ज्ञ व अंमलबजावणी संस्था म्हणून निवड करण्यात आली आहे. या कार्यक्रमाची अंमलबजावणी माहे मार्च २०२३ पर्यंत राहील.

“ महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) हा महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम असून स्वयंसाहाय्य बचतगटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचे काम ‘माविम’ आजतागायत करीत असले, तरी राज्यातील प्रत्येक महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी महिलांची शिखर संस्था म्हणून ‘माविम’ कटिबद्ध आहे.

- श्रीमती ज्योती ठाकरे, अध्यक्षा, माविम ”

इतर उपक्रम

माविमच्या माध्यमातून विविध उद्योगांचे प्रशिक्षण देऊन महिलांना उद्यमशील करण्याचा उपक्रम सातत्याने राबवला जातो. यामध्ये विविध कार्यशाळा, प्रशिक्षण वर्गांचा समावेश असतो. याबरोबरच शेतीपूरक व्यवसायासाठी आणि शेती किफायतशीर करण्याच्या दृष्टीनेही उपक्रम राबवले जातात. विशेषतः प्रशिक्षण आणि यंत्राचा वापर करून कमी श्रमात जास्त उत्पादन घेण्यावर भर दिला जातो.

टीम लोकराज्य

तेजश्री फायनान्शिएल सर्व्हिसेस

महिला आर्थिक विकास महामंडळाचा ४५ वा वर्धापन दिन नुकताच साजरा करण्यात आला. या वेळी ‘माविम’ स्थापित बचतगटातील महिलांच्या प्रेरणादायी कन्यांना ‘तेजस्विनी कन्या’ या पुरस्काराने गौरवण्यात आले. सामाजिक क्षेत्रामध्ये स्त्री सक्षमीकरणासाठी योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान महिलांना सन्मानित करण्यात आले.

माविमच्या वर्धापन दिन सोहळ्यात ‘तेजश्री फायनान्शिएल सर्व्हिसेस’ या महिलांकरिताच्या योजनेचा शुभारंभ करण्यात आला. यासाठी माविमला एकूण रु. ६८.५८ कोटी एवढा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी चालू वित्तीय वर्षाकरिता पहिला हप्ता ३१ कोटी तीन लाख रुपयांचा निधी हस्तांतरित करण्यात आला.

तेजस्विनी कन्या पुरस्कार

नेहा गजभिये, नागपूर; संध्या हटकर, नांदेड; जयश्री आहेर, नाशिक; प्रतिक्षा निमकर, अमरावती; प्रियंका लोखंडे, पुणे; माधवी पाटील, पालघर या माविम स्थापित बचतगटातील महिलांच्या प्रेरणादायी कन्यांना ‘तेजस्विनी कन्या’ या पुरस्काराने गौरवण्यात आले. तसेच सामाजिक क्षेत्रामध्ये स्त्री सक्षमीकरणात भरीव योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान महिला चित्रा उबाळे-डिक्की. ज्योती म्हापसेकर-स्त्री मुक्ती संघटना, रुबिना शहा, स्वाती वैद्य, रेवती निकम या सर्व महिलांना सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे 'उमेद' असे नामकरण करण्यात आले आहे. उमेद या शब्दातच योजनेचे सगळे सार सामावले आहे. उमेद ही कार्यकर्तृत्वाला चालना देणारी, मनाला उभारी देणारी गोष्ट. उमेद असेल तर माणूस पुन्हा उभा राहू शकतो. याच उमेदने लाखो स्त्रियांना स्वरोजगाराची वाट दाखवली आहे. त्यांच्यातील कौशल्याला नवे पंख दिले आहेत.

कौशल्याला नवे पंख

इर्शाद बागवान

ग्रामीण भागातील गरिबीचे निर्मूलन करण्यासाठी ग्रामविकास विभागांतर्गत उमेद अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. यामध्ये गरिबी निर्मूलनाचा समग्र विचार करण्यात आला असून समुदाय विकासापासून शाश्वत उपजीविका निर्माण करण्यापर्यंतच्या सर्व बाबींचा यात समावेश आहे. सामाजिक, आर्थिक आणि वित्तीय समावेशनाबरोबर सार्वजनिक सेवांची उपलब्धता आणि विविध योजनांचे लाभ हे उमेदचे आधारस्तंभ आहेत. ग्रामीण महाराष्ट्रातील गरीब आणि जोखीमप्रवण कुटुंबांना समृद्ध, आत्मसन्मानाचे आणि सुरक्षित जीवन जगता यावे यासाठी उमेदअंतर्गत एकात्मिक प्रयत्न करण्यात येतात. स्वयंसाहाय्यता गटाद्वारे, बचतगटाद्वारे स्त्रियांचे संघटन करून त्यांच्यातील उद्योग व्यवसायाला चालना देण्यात येते.

ग्रामपंचायतस्तरावर ग्रामसंघ तर जिल्हा परिषद प्रभाग स्तरावर प्रभागसंघ तयार केले जातात. या संस्थांच्या माध्यमातून गरिबांचे अधिकार, हक्क, वित्तीय सेवा तसेच शाश्वत उपजीविकेच्या संधी प्राप्त होण्यासाठी वातावरण निर्मिती केली जाते.

गावपातळीपर्यंत उमेद

'उमेद' अभियानाची अंमलबजावणी राज्यातील ३४ जिल्हे व ३५१ तालुक्यात इन्टेन्सिव्ह पद्धतीने करण्यात येत आहे. इन्टेन्सिव्ह पद्धतीने राबवण्यात येणाऱ्या जिल्ह्यात आणि तालुक्यात जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष आणि तालुका अभियान व्यवस्थापन कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. हे अभियान प्रभावीपणे राबवण्यासाठी राज्यस्तरापासून ग्रामस्तरापर्यंत स्वतंत्र, समर्पित आणि संवेदनशील मनुष्यबळाची व अंमलबजावणी यंत्रणेची निर्मिती करण्यात आली आहे.

अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी समुदाय संसाधन व्यक्तींची एक भक्कम फळी गावपातळीपर्यंत उभी केली गेली आहे. या व्यक्तीमार्फत गरीब कुटुंबांची नेमकी ओळख करून त्यांना स्वयंसाहाय्यता गटात समाविष्ट करण्याचे मोलाचे काम केले जाते. समुदाय संसाधन व्यक्ती या स्थानिक स्त्रिया असून त्या समुदाय संस्थाचा एक भाग म्हणून काम करतात.

बचतगटांना कर्जवाटप

उमेद अभियानांतर्गत आतापर्यंत महिलांची ४.२३ लाख स्वयंसाहाय्यता गटांची स्थापना झालेली असून त्या माध्यमातून ४५ लाख कुटुंबे अभियानाशी जोडली आहेत. अभियानामार्फत जवळपास ८२३ कोटी रुपये एवढा समुदाय निधी तर बँकांमार्फत ६,६०० कोटी रुपयांचे कर्ज गटांना उपलब्ध करून देण्यात आले आहेत. अभियानांतर्गत १०.८३ लाख कुटुंबांनी उपजीविकेचे विविध स्रोत (ॲक्टिव्हिटीज) निर्माण केले असून त्या माध्यमातून जवळपास १ हजार ७० कोटी रुपयांचे उत्पन्न निर्माण झालेले आहे. गावपातळीवर जवळपास ४० हजार प्रशिक्षित समुदाय संसाधन व्यक्ती कार्य करत आहेत.

कौशल्यवृद्धी आणि क्षमताबांधणी

राज्यात उमेदअंतर्गत महिलांचे बचतगट स्थापन केले जातात. अभियानाची बांधणी करतांना स्त्रियांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. त्यामुळे अभियानात समाविष्ट असणारे सर्वच उपक्रम हे स्त्रियांसाठीच

अभियानातील दशसूत्री

अभियानात दशसूत्री संकल्पना स्वीकारण्यात आली आहे. समुदाय संस्थांमध्ये वित्तीय शिस्तीबरोबर सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करणे हा या दशसूत्रीचा मुख्य उद्देश आहे. **दशसूत्रे पुढीलप्रमाणे** : १) नियमित बैठका २) नियमित बचत ३) नियमित अंतर्गत कर्ज व्यवहार ४) नियमित कर्ज परतफेड ५) नियमित दस्तऐवज अद्ययावत ठेवणे ६) आरोग्य व स्वच्छता ७) शिक्षण ८) पंचायतराज संस्थांमध्ये स्त्रियांचा सहभाग ९) शासकीय योजनांचा लाभ १०) शाश्वत उपजीविका यांची सांगड घालणे.

दशसूत्रीच्या पालनामुळे बचतगटातील सदस्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होत असून त्यांना बँकाकडून मोठ्या प्रमाणात अर्थसाहाय्य उपलब्ध होत आहे.

आहेत. स्त्रियांचे स्वयंसाहाय्यता गट तयार झाल्यानंतर आणि त्यास तीन महिने पूर्ण झाल्यानंतर फिरता निधी (आरएफ) दिला जातो. याचा उपयोग गटातील स्त्रिया त्यांच्या मूलभूत गरजा भागवण्यासाठी तसेच व्यवसायासाठी करू शकतात.

गट सहा महिन्यांचा झाल्यानंतर त्या गटातील प्रत्येक सदस्यांचा सूक्ष्म गुंतवणूक आराखडा तयार करून त्या गटास समुदाय गुंतवणूक निधी (सीआयएफ) दिला जातो. बँकांमार्फत गटास कर्ज दिले जाते. या निधीतून स्त्रिया त्यांच्याकडे असणारे कौशल्य, संसाधने व त्यांची इच्छा या सगळ्या गोष्टींचा साकल्याने विचार करून व्यवसायाची निवड करतात. स्त्रियांना त्यांच्या कौशल्यवृद्धीसाठी तसेच क्षमताबांधणीसाठी उमेदअंतर्गत प्रशिक्षण दिले जाते. या अभियानाचा लाभ गावातील सर्व गरीब स्त्रिया घेऊ शकतात. त्यासाठी त्यांनी स्वयंसाहाय्यता गट किंवा बचतगटात सहभागी होणे आवश्यक आहे.

प्रशिक्षण

बचतगटांच्या सदस्य असलेल्या महिलांच्या कुटुंबातील युवक, युवतींना प्रशिक्षण देऊन विविध कंपन्यांमध्ये रोजगार मिळवून दिला जातो. यासाठी अभियानामार्फत प्रकल्प अंमलबजावणी संस्थांची नियुक्तीदेखील करण्यात आली आहे. स्वरोजगार करण्याची इच्छा असणाऱ्या युवक-युवतींना जिल्हास्तरावर लीड बँकांच्या माध्यमातून आरईएसटीआय योजनेंतर्गत प्रशिक्षण दिले जाते. बँकांमार्फत त्यांना कर्ज उपलब्ध करून देऊन स्वरोजगार करण्यासाठी साहाय्य केले जाते. अभियानात वर्धिनी, प्ररिका, पशुसखी, कृषी सखी, कृतिसंगम सखी अशा पद्धतीने समुदाय संसाधन व्यक्ती म्हणून काम करण्याची संधी दिली गेली आहे. त्यासाठी आवश्यक असणारे प्रशिक्षण त्यांना देण्यात आले आहे. या माध्यमातून प्रशिक्षित आणि कौशल्य विकसित झालेली समुदाय संसाधन व्यक्तीची फळी निर्माण झाली आहे.

बचतगटांच्या उत्पादनांना बाजारपेठ

अभियानात जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर प्रदर्शनांचे आयोजन करून स्त्रियांच्या बचतगटातील उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाते. मुंबईत आयोजित होणारे महालक्ष्मी सरस प्रदर्शन लोकप्रिय ठरले आहे. या प्रदर्शनातून महिला बचतगटांनी मागील वर्षी १२ कोटी रुपयांची तर या वर्षी १५ कोटी रुपयांची उलाढाल केली. यंदा प्रदर्शनात ५०० पेक्षा अधिक बचतगट सहभागी झाले होते. अशाच प्रदर्शनांचे विभाग आणि जिल्हा स्तरांवरही आयोजन केले जाते.

अस्मिता योजना

ग्रामीण मुली आणि महिलांमध्ये मासिक पाळीच्या काळात सॅनिटरी नॅपकीन वापरण्याचे प्रमाण कमी आहे. हे लक्षात घेऊन उमेद अभियानातील बचतगटांमार्फत राज्यात 'अस्मिता' योजना राबवण्यात येत आहे. यात शालेय मुलींना फक्त ५ रुपयांमध्ये सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध करून दिले जात आहे. तसेच ग्रामीण महिलांनाही स्वस्त दरात सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध करून दिले जाते.

http://www.umed.in या संकेतस्थळावर जाऊन उमेद अभियानाची अधिक माहिती आपण घेऊ शकाल. अभियानात सहभागी होण्यासाठी गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे संपर्क साधावा.

विभागीय संपर्क अधिकारी

"उमेद अभियानांतर्गत राबवण्यात येत असलेल्या बचतगट चळवळीतून राज्यात मोठी सामाजिक आणि आर्थिक क्रांती घडत आहे. महिलांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढत आहे. बचतगटांच्या महिला मोठ्या मेहनतीने आणि प्रामाणिकपणे उत्पादनांची निर्मिती करतात. त्यामुळे ग्राहकांनाही त्यांची उत्पादने विश्वासाची वाटतात. उमेद अभियान आणि त्याअंतर्गत राबवले जाणारे विविध उपक्रम, महालक्ष्मी सरससारखी प्रदर्शने, इतर विभागस्तरीय आणि जिल्हास्तरीय प्रदर्शनांमुळे बचतगटातील महिलांना बाजारपेठ उपलब्ध झाल्याने गावातील महिलांच्या आयुष्यातील गरिबी कमी होण्यास मदत होत आहे. मुंबईसारख्या मोठ्या शहरामध्ये स्वयंसाहाय्यता गटांच्या उत्पादनास बाजारपेठ मिळत आहे."

- हसन मुश्रीफ, ग्रामविकास मंत्री

हक्क आणि अधिकार

भारतीय संविधानाने स्त्री पुरुष समतेचे धोरण अंगीकारले असले तरी सामाजिक स्तर, जातिनिहाय वर्ग, भाषा, संस्कृती आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या बदलामुळे संविधानिक तरतुदींचा पुरेसा लाभ महिलांपर्यंत पोहोचलेला नाही. समान संधी आणि एक नागरिक म्हणून सन्मानाने जगण्याचा अधिकार संविधानाने दिला आहे. घटनेने प्रदान केलेल्या हक्क आणि अधिकारांचा लाभ घेण्यासाठी कायद्याची माहिती आवश्यक असते. अन्याय आणि अत्याचार सहन करण्यामागे कायदेशीर तरतुदींबाबत अनभिज्ञता हे प्रमुख कारण असते. महिलांमधील कायदेविषयक जाणीवजागृतीसाठी शासन, विविध सामाजिक संघटना, व्यक्ती विशेष कार्य करीत असल्या तरी महिलांना त्यांचे हक्क आणि अधिकार मिळवून देण्यासाठी समाजाने स्वयंस्फूर्तीने पुढाकार घेणे आवश्यक आहे.

ॲड. प्रिया देशपांडे

घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय स्त्रियांवर अनेक उपकार करून ठेवले आहेत. भारतीय स्त्रियांच्या जीवनात क्रांतिकारी बदल आणू पाहणाऱ्या हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून त्यांनी महिलांच्या पायातील परंपरेची साखळी तोडली. परंपरेने लादलेले महिलांसाठीचे दुय्यमत्व अमान्य करून महिला आणि पुरुष समानतेच्या दिशेने त्यांनी कायदेशीर तरतुदी केल्या. आज आपल्या हक्काची जाणीव झालेला एक मोठा वर्ग असला तरी शिक्षण आणि माध्यमांच्या अभावामुळे कायदेविषयक अपुऱ्या ज्ञानामुळे महिला अन्याय सहन करीत आहेत. या घटकांवरील अन्याय दूर करण्यासाठी त्यांच्यातील आत्मभान जागे करण्याबरोबरच त्यांना कायद्याविषयी माहिती असणे आवश्यक आहे.

हुंडा प्रतिबंधक कायदा

१९६१च्या कायद्यान्वये हुंडा मागणे आणि हुंडा देणे गुन्हे आहेत. हा कायदा अधिक प्रभावी होण्यासाठी भारतीय दंड विधान संहिते (भादंवी) मध्ये ३०४ (ब) आणि ४९८ (क) ही नवीन कलमे अंतर्भूत आहेत. कोणीही हुंडा मागणी करत असल्यास संबंधित महिला, त्यांचे नातेवाईक पोलिसात तक्रार करू शकतात. प्रत्येक पोलीस ठाण्यात हुंडा प्रतिबंधक अधिकाऱ्याची नियुक्ती, जिल्हा तसेच तालुकास्तरीय समित्यांची स्थापना या कायद्यांतर्गत करण्यात आली आहे.

अश्लीलताविरोधी कायदा

भादंवी कलम २९२ ते २९४ मध्ये महिलांशी अश्लील वर्तन करणाऱ्यांना शिक्षा देण्याची तरतूद आहे. त्याप्रमाणेच जाहिराती, पुस्तके, चित्रे आदी माध्यमांतून महिलांची विटंबना करणाऱ्याविरोधी वॉरंटशिवाय अटक होऊ शकते. सार्वजनिक ठिकाणी छेड, अश्लील हावभाव, शेरेबाजी याबाबीही दंडनीय आहेत.

छेडछाड करणे गुन्हा

स्त्रीची अब्रू लुटणे, हात धरणे, तिच्या वस्त्रांना हात घालणे अशा प्रकारे विनयभंग करणाऱ्यांना शिक्षेची तरतूद आहे. तसेच छेडछाड केल्याबद्दल भारतीय दंड संहिता कलम ५०९ अंतर्गत पोलिसांत तक्रार दाखल करता येते.

बालविवाह प्रतिबंधक कायदा

बालविवाहाची प्रथा बंद करण्यासाठी 'बालविवाह प्रतिबंधक अधिनियम (शारदा ॲक्ट)' १९२९ मध्ये सुधारणा झाल्या आहेत. मुलीचे वय किमान १८ आणि मुलाचे वय २१ वर्षाहून कमी असल्यास शिक्षेची तरतूद आहे. हा कायदा सर्व जाति-धर्माच्या लोकांना सारखाच लागू होतो.

कौटुंबिक न्यायालय कायदा

दाम्पत्य व कौटुंबिक कलहाची प्रकरणे एकाच ठिकाणी सोडवण्यासाठी कौटुंबिक अधिनियम १९८४ लागू करण्यात आला



आहे. कुटुंब न्यायालय नसल्यास तिथल्या जिल्हा न्यायालयांना कुटुंब न्यायालयाचा दर्जा देण्यात आला आहे.

मुलावर हक्क

एखाद्या स्त्रीचा घटस्फोट झाल्यास तिच्या पाच वर्षापर्यंतच्या मुलांना ती स्वत:जवळ ठेवू शकते. मात्र पाच वर्षाहून अधिक वयाच्या मुलांच्या बाबतीत न्यायालयाचा निर्णय बांधील असतो.

समान वेतन कायदा

समान वेतन कायद्यानुसार एकाच कामासाठी स्त्री व पुरुष दोघांना समान वेतन मिळाले पाहिजे. विशिष्ट कार्यक्षेत्रातील नोकऱ्या सोडता अन्य ठिकाणी स्त्रियांना रात्रपाळीला कामाला बोलावता येत नाही.

लैंगिक गुन्हे

लैंगिक गुन्ह्यांसंबंधात भादंवी ३७५ व ३७३ अनुसार कडक शिक्षा देण्यात येतात. लैंगिक प्रकरणाची सुनावणी न्यायालयाच्या बंद खोलीत होते.

हिंदू उत्तराधिकार

१९५६ मध्ये निर्माण झालेल्या हिंदू उत्तराधिकारी कायद्यानुसार महिलांना संपत्तीमध्ये व्यापक अधिकार देण्यात आले असून स्त्रीधनाचा उपभोग घेण्याचा आणि ते धन खर्च करण्याचा अनिर्बंध अधिकार स्त्रीला मिळाला आहे. हिंदू स्त्रीला एकत्र कुटुंबाच्या संपत्तीतसुद्धा वाटणी मागता येते. स्त्रीधन मिळावे म्हणून स्त्री न्यायालयात खटला दाखल करू शकते. स्त्रीला मुलाप्रमाणेच वडिलोपार्जित संपत्तीमध्येही समान हक्क दिला गेला आहे.

हिंदू विवाह कायदा

भादंवी १२५ अनुसार स्त्रीला पोटगी मागणीचा हक्क आहे. पती-पत्नीच्या वादामध्ये निकाल लागेपर्यंतच्या मधल्या काळातसुद्धा पत्नीच्या उदरनिर्वाहासाठी अंतरिम पोटगी रक्कम देण्याची कायद्यात तरतूद आहे.

प्रसूती सुविधा कायदा

नोकरीपेशातील स्त्रियांसाठी बाळंतपणाची आणि नवजात बाळाची देखभाल करण्यासाठी रजेची तरतूद असून त्या काळात स्त्रीला विशिष्ट दिवसाची भरपगारी रजा मिळते. मात्र कायद्यानुसार ती रजा व इतर फायदे फक्त दोन बाळंतपणासाठी असतात. गर्भपात झाल्यावरही स्त्रीला भरपगारी रजा मिळण्याची तरतूद आहे.

स्त्रीला संपत्ती मिळण्याचे मार्ग

कमावती स्त्री स्वतः नोकरी-व्यवसायातून मिळवत असलेला पगार, तिला मिळणारे मानधन, व्यवसायात मिळणारा नफा ही तिची स्वकष्टार्जित म्हणजेच स्वतः कमावलेली संपत्ती होय.

मग अगदी कुटुंबाच्या पारंपरिक, सामायिक व्यवसायाला स्त्री हातभार लावत असेल तर तो ही तिच्या उत्पन्नाचा स्रोतच आहे. त्या व्यवसायातील उत्पन्नातून तिला स्वतःसाठी पैसे मागण्याचा हक्क आहे. याशिवाय वाढदिवस, साखरपुडा, लग्न, लग्नानंतरचे पहिले बारा सण, लग्नाचा वाढदिवस, डोहाळे जेवण, बाळंतपण, बारसे, सण-समारंभ, गृहप्रवेश, इतरांचे विवाहसमारंभ अशा अनेक निमित्ताने बरेचदा स्त्रियांना मौल्यवान भेटवस्तू मिळतात. अशा कोणत्याही निमित्ताने माहेरच्या तसेच सासरच्या मंडळींनी तिला दिलेले दागिने हे तिच्या मालकीचे असतात.

इच्छापत्र किंवा मृत्युपत्र, (विल) बक्षीसपत्र किंवा दानपत्र (गिफ्ट डीड) अशा मार्गाने कोणी एखाद्या स्त्रीला संपत्ती दिली तर ती संपत्ती त्या स्त्रीच्या मालकीची होती. स्त्रीला वाडवडिलांच्या संपत्तीमध्ये हिस्सा मिळतो, सासरच्या संपत्तीमध्ये काही कारणांनी हिस्सा मिळतो, घटस्फोटानंतर एकरकमी पोटगी म्हणून काही रक्कम मिळू शकते, ही सर्व संपत्ती तिच्या मालकीची होते.

अनेक स्त्रियांना काही कारणांनी घटस्फोट घेऊन विभक्त व्हावे लागले तर बरेचदा दरमहा पोटगी घेण्यापेक्षा पोटगीची एकत्रित रक्कम एकाच वेळी पतीकडून ताब्यात घेणे पतिपत्नी दोघांनाही सोयीचे असते. काही कुटुंबांमध्ये एकरकमी पोटगीऐवजी शेतजमिनीतील एखादा हिस्सा, निवासी गाळा किंवा घर, दुकान अशा स्थावर मालमत्तेमध्ये पत्नीला हिस्सा दिला जातो. अशा रीतीने मिळालेला हिस्सा ही तिची वैयक्तिक मालकीची संपत्ती गणली जाते. या संपत्तीचा वापर, खरेदी-विक्री, अशा संपत्तीतून तिला येणारे उत्पन्न यावर फक्त तिचाच अधिकार असतो. लग्नामध्ये खर्च केला, हुंडा दिला, लग्नात मुलीच्या अंगावर दागिने घातले, तिच्या शिक्षणासाठी खर्च केला अशी अनेक लटकी कारणे सांगून मुलीला माहेरच्या संपत्तीमध्ये हिस्सा देण्याचे टाळले जाते. हे कायदेसंमत नाही. वरील परिस्थिती काहीही असली तरी तिचा माहेरच्या संपत्तीतील हक्क अबाधित राहतो.

विशेष विवाह अधिनियम

विशेष विवाह अधिनियम १९५४च्या तरतुदीनुसार मानसिकदृष्ट्या सक्षम आणि १८ वर्षे पूर्ण झालेली स्त्री प्रेमविवाह किंवा आंतरजातीय विवाह स्वतःच्या इच्छेनुसार करू शकते.

महिलांच्या अटकेसंबंधी

महिलांना फक्त महिला पोलीस सूर्योदयानंतर आणि सूर्यास्तापूर्वी अटक करू शकतात. कुटुंबाच्या सदस्यांच्या उपस्थितीत व योग्य कारण असेल तरच स्त्रीला पोलीस ठाण्यात चौकशीसाठी बोलावता येते. स्त्रीला अटक केल्यास तिला फक्त महिला कक्षामध्येच ठेवता येते.

हक्कसोडपत्र

माहेरच्या संपत्तीमध्ये हिस्सा मागितला तर भाऊ-भावजयी आणि इतर बहिणींशी नातेसंबंधं दुरावतील अशी काळजी वाटते आणि नाही मागितला तर सासरचे नाराज होतात अशा कात्रीत स्त्रिया सापडलेल्या दिसतात. माहेरचा आधार टिकून राहावा म्हणून स्त्रिया माहेरच्या संपत्तीवरील हक्क सोडून देतात. तर कधी भावांकडून संपत्तीवरील हक्क मिळवण्यासाठी न्यायालयाच्या फेऱ्या माराव्या लागतात. संपत्तीबाबत कोणताही निर्णय हा वकिलाच्या सल्ल्याने आणि समजून-उमजून घ्यावा. भावनेच्या भरात घेऊ नये.

स्वतःच्या संपत्तीबाबत हक्कसोडपत्र, कुलमुखत्यार पत्र किंवा पावर ऑफ ॲटर्नी असे कोणतेही दस्त करताना योग्य सल्ला घ्यावा. आपले कायदेशीर अधिकार समजून घेऊनच अशा कागदपत्रांवर सही करावी.

घर दोघांचे

पतिपत्नीमध्ये भांडण किंवा जमत नसेल तर सहजपणे पत्नीला घराबाहेर काढले जाते. सर्वसाधारणपणे सगळीकडे हे चित्र दिसून येते. ही परिस्थिती बदलण्यासाठी शासनाने १० ऑक्टोबर १९९४ पासून नवीन नियम केले आहेत.

महत्त्वाच्या तरतुदी

जमिनीचा पट्टा, घर आणि प्लॉट हे आता दोघांच्या सामायिक मालकीचे असणार.

झोपडपट्टीवासीयांना दिल्या जाणाऱ्या ओळखपत्रातील पहिल्या पानावर पती आणि पत्नी दोघांचाही फोटो असेल.

नवीन फ्लॅट किंवा प्लॉट घेतल्यानंतर त्यासंबंधीची कागदपत्रे करताना दोघांच्या नावे करण्यात यावी. तशी कागदोपत्री

नोंद करणे गरजेचे आहे

इंदिरा आवास योजनेंतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरांना पती आणि पत्नी दोघांची नावे द्यावीत.

लक्षात ठेवा : घर किंवा संपत्तीची नोंदणी करताना व्यक्ती अविवाहित असेल तर लग्नानंतर आपोआप घर किंवा संपत्ती पत्नीच्याही नावावर होईल, अशी अट आहे.

मुस्लीम स्त्रिया

इस्लामिक कायद्यानुसार मुस्लीम स्त्रीला कुटुंबाच्या संपत्तीमध्ये वारसा हक्क प्राप्त आहे.

महत्त्वाच्या तरतुदी

विधवेचा हक्क - प्रत्येक विधवेला तिच्या पतीच्या मालमत्तेवर हक्क आहे. जर मयत नवऱ्याला मूल नसेल तर त्याच्या विधवेला मालमत्तेचा १/४ हिस्सा मिळेल आणि मूल असेल तर १/८ मिळेल. मयत पतीच्या मागे एकापेक्षा अधिक विधवा हयात असतील विधवेचा हक्क विभागला जाऊन तो १/१६ एवढा होतो.

मुलीचा हक्क - मुलगी वडिलांच्या मालमत्तेची वारसदार समजली जाते. जर मुलगा नसला तर मुलीला वडिलांच्या मालमत्तेत अर्धा वाटा मिळतो.

आईचा हक्क - मुलाच्या पश्चात त्यांच्या मालमत्तेमध्ये आईचा हक्क असतो. मयत मुलाला मूलबाळ म्हणजेच स्त्रीला नातवंड नसेल तर तिला तिच्या मयत मुलाच्या मालमत्तेचा १/३ हिस्सा मिळतो पण नातवंड असेल तर स्त्रीचा हिस्सा विभागला जाऊन तो तिला १/६ एवढा हिस्सा मिळतो.

नानी व दादी यांचा हक्क - नानीला नातवाच्या मालमत्तेचा १/६ हिस्सा मिळेल मात्र नातवाचे आईवडील किंवा आई जिवंत नसेल तरच दादीला नातवाच्या मालमत्तेत हिस्सा मिळतो.

कोणतीही मुस्लीम व्यक्ती आपल्या संपत्तीपैकी फक्त १/३ एवढ्याच संपत्तीचे इच्छापत्र अथवा मृत्युपत्र करू शकते. मूलबाळ नसलेली व्यक्ती मात्र आपल्या जोडीदाराला २/३ संपत्ती इच्छापत्राने देऊ शकते.

मुस्लीम स्त्रीला संपत्तीमध्ये मुलगी, विधवा, आई, आजी अशा विविध

नात्यांमधून संपत्तीमध्ये हिस्सा मिळतो.

ज्यांच्याकडून स्त्रीला संपत्तीचा वारसा मिळणार आहे, त्याव्यतिरिक्तच्या नातेवाइकांकडून स्त्रीला भेटीदाखल संपत्ती घेण्याचे स्वातंत्र्य आहे.

अविवाहित मुलीला पालकांच्या घरामध्ये राहण्याचा आणि पालकांकडून पालनपोषण घेण्याचा हक्क आहे. विवाहानंतर घटस्फोट झाल्यास तीन महिन्यांचा ईद्दत कालावधी संपल्यानंतर स्त्रीच्या पालनपोषणाची जबाबदारी पालकांची असते. तसेच पालकांपश्चात स्त्रीचा सांभाळ करण्याची जबाबदारी तिच्या कमावत्या मुलांची असते.



कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण

स्त्रियांना मिळणारे हक्क किंवा संरक्षण अधिक सक्षम होण्याकरिता 'कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा २००५' मंजूर करण्यात आला. अत्याचारग्रस्त स्त्रीला लवकरात लवकर न्याय मिळावा या हेतूने या कायद्याची विशेष तरतूद करण्यात आली आहे. या कायद्यामध्ये पीडित स्त्रीला साहाय्याचे आदेश मिळवण्यासाठीची कार्यप्रणाली दिली गेली आहे. त्याशिवाय पीडित स्त्रीला तिच्या हक्क बजावणीसाठी वेगवेगळ्या कायद्यांतर्गत निरनिराळे दावे करण्याची आता गरज राहणार नाही.

मेहर

मेहर हा प्रत्येक मुस्लीम स्त्रीचा हक्क आहे. मेहर म्हणजे विवाहावेळी पतीने पतीला देण्याची संपत्ती. मेहर दोन प्रकारची असते. एक मेहर म्हणजे विवाहाच्या वेळीच पत्नीच्या ताब्यात दिली जाते ती संपत्ती. दुसरा प्रकार म्हणजे वैवाहिक नातेसंबंध संपवताना म्हणजेच घटस्फोट घेताना किंवा पतीच्या निधनाच्या वेळी पत्नीच्या ताब्यात दिली जाते ती संपत्ती.

मेहेर म्हणून किती रक्कम किंवा काय संपत्ती दिली जाणार हे मात्र विवाह ठरवला जात असतानाच नवऱ्या मुलाला निश्चित करावे लागते आणि पत्नीला तसेच तिच्या नातेवाईकांना ही मेहरची रक्कम मान्य झाल्यावरच विवाह ठरवला जातो. मुस्लीम धर्मात स्त्रीधन ही संकल्पना नाही. मात्र मेहेरचा हक्क आहे.

ख्रिश्चन स्त्रिया

मृत्युपत्र न करता एखादी व्यक्ती मरण पावली तर संपूर्ण संपत्तीचे नवरा, बायको किंवा इतर जवळच्या नातेवाइकांमध्ये विभागणी केली जाते. मूलबाळ किंवा इतर नातेवाईक नसतील तर संपूर्ण संपत्ती पत्नीला मिळते. सर्व मुला-मुलींना संपत्तीमध्ये समान हक्क आहे. मुलगा किंवा मुलगी हयात नसतील तर त्यांच्या मुला-मुलींमध्ये तो हिस्सा समान वाटला जाईल. ख्रिश्चन स्त्रीने स्वतः कमवलेली संपत्ती ही तिची स्वतःची मालकीची संपत्ती असते. मृत्युपत्र अथवा इच्छापत्राद्वारे संपत्तीचे वाटप करण्याचा स्त्रीला अधिकार आहे.

विशाखा मार्गदर्शिका

कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ होऊ नये म्हणून 'विशाखा मार्गदर्शिका'ची अंमलबजावणी राज्यात सुरू आहे. यासाठी राज्यभर तक्रार निवारण समित्यांची स्थापना करण्यात आली असून महिला, मुली आणि बालकांचा अवैध मानवी व्यापार रोखण्यासाठी 'राज्य कृतिदलाची' स्थापना करण्यात आली आहे.

कामकाजाचे ठिकाण

नोकरीच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळ थांबवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने मार्गदर्शक तत्त्वे लागू केली आहेत. खासगी, सार्वजनिक तसेच अन्य संस्थांमध्येसुद्धा ती लागू आहेत. लैंगिक चाळे आणि तक्रारी थांबवण्याची जबाबदारी संबंधित संस्थांवर तसेच कर्मचाऱ्यांवर आहे. तसेच, तक्रारींच्या झटपट निवारणासाठी प्रत्येक विभागात महिला अध्यक्षासह अर्ध्यापेक्षा अधिक महिला असणारी समिती स्थापन करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

देवदासी प्रतिबंधक कायदा

देवदासींचे आणि त्यांच्या मुलांचे पुनर्वसन, शिक्षण, आरोग्य आणि त्यांच्या आर्थिक स्वावलंबनाचे मार्ग प्रशस्त करण्याच्या दृष्टीने हा कायदा उपयुक्त ठरत आहे. या सर्व कार्यासाठी महिला व बालविकास विभागाच्या स्वतंत्र योजना कार्यान्वित आहेत.

लेखिका विधिज्ञ आहेत.

कुटुंबाचा संपूर्ण भार आपल्या खांद्यावर उचलणाऱ्या महिलांसाठी बचत हा त्यांच्या एकूण जगण्याचा अविभाज्य घटक बनला आहे. मात्र वाचवलेला पैसा योग्य ठिकाणी गुंतवला तरच तो महागाईशी स्पर्धा करत वाढतो. त्यामुळे गुंतवणुकीचे नवे मार्ग चोखंदळणे आवश्यक आहे.

बचत आणि गुंतवणूक

हेरंब ओक

इंग्रजीत एक छान वाक्य आहे. मनी सेव्हड इज मनी अर्न्ड अर्थात पैसे वाचवणं म्हणजेच पैसे मिळवणं. थोडक्यात वाचवलेला प्रत्येक पैसा हा कमावलेल्या पैशाइतकाच महत्त्वाचा आहे. अर्थात भारतीय स्त्रीवर्गाला बचतीचं वेगळं महत्त्व सांगण्याची आवश्यकता नाही. घरातील स्त्री नानाविध मार्गांनी पै न् पै वाचवत असतेच. वर्षभरात केवळ दोन साड्या वापरणाऱ्या उदाहरणांपासून ते थेट सध्याच्या पिढीतल्या वर्षभराचं धान्य एकदम भरून ठेवणाऱ्या किंवा किंचित स्वस्त आहे म्हणून थोडं लांबच्या दुकानातून खरेदी करणाऱ्या अशा अनेक महिलांची उदाहरणं देता येतील. थोडक्यात 'बचत' संकल्पना आपल्यासाठी नवी नाही. या वाचवलेल्या पैशांचा विनियोग कसा केला जातो हे खरं आव्हान. बचतीचे हे पैसे कपाटात ठेवून दिले तर बचतीचा पूर्ण लाभ घेता येत नाही. किंबहुना स्वतःच्या मेहनतीवर अन्याय करण्यासारखेच आहे ! तसं होऊ द्यायचं नसेल तर वाचवलेल्या पैशांची योग्य पद्धतीने केलेली गुंतवणूक महत्त्वाची आहे.

गुंतवणूक म्हणजे काय?

गुंतवणुकीची अगदी साधी, सोपी, सरळ व्याख्या करायची झाल्यास ती अशी करता येईल की, आपण गुंतवलेल्या पैशांवर आपल्याला काही किमान परतावा मिळाला की आपण गुंतवणूक केली असं म्हणायला हरकत नाही. अर्थात ही अगदीच ढोबळ व्याख्या झाली. गुंतवणूक या संज्ञेचे अनेक पदर आहेत. आपण केलेली गुंतवणूक सुरक्षित असावी आणि त्यावर आपल्याला चांगला परतावा कमी कालावधीत मिळायला हवा अशी एक रास्त अपेक्षा असू शकते. यात 'सुरक्षितता' हा सर्वात महत्त्वाचा भाग आहे. सुरक्षित पर्यायांचा विचार करताना आपण 'अधिक सुरक्षित पण कमी परतावा'पासून सुरू करून 'कमी सुरक्षित पण अधिक परतावा' अशा चढत्या क्रमाने विचार करू.

बचत खाते आणि मुदत ठेव

हा पर्याय सर्वात सुरक्षित असला तरी अलीकडे अतिशय कमी होत चाललेल्या व्याजदरांमुळे या पर्यायांमधून मिळणारा परतावा अतिशय सामान्य असतो.

आवर्ती ठेव अर्थात रिकरिंग डिपॉझिट

या योजनेंतर्गत सलग वर्षभर दर महिन्याला एक विशिष्ट रक्कम आपल्या खात्यात भरली की दर तीन महिन्यांनी त्यावर जे व्याज मिळते तेही आपल्या मूळ रकमेत समाविष्ट केले जाऊन वर्षाच्या शेवटी किंवा आपले खाते परिपक्व (मॅच्युअर) झाले की ठरलेल्या व्याजदराप्रमाणे आपल्याला आपली रक्कम काढून घेता येते. अशाच पद्धतीने आपल्याला पोस्टाच्या रिकरिंग योजनेंतर्गतदेखील गुंतवणूक करता येते.

सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी

या योजनेंतर्गत आपल्याला कुठल्याही बँकेत जाऊन सर्वप्रथम याचे (पीपीएफ)

खाते उघडावे लागते. पूर्वी ही सुविधा फक्त स्टेट बँकेच्या शाखांमध्येच उपलब्ध होती. परंतु आता कुठल्याही खासगी बँकेत जाऊनही पीपीएफ खाते उघडता येते. या योजनेंतर्गत प्रत्येक आर्थिक वर्षात आपल्या पीपीएफ खात्यात किमान ५०० रुपये भरणे आवश्यक असते. खाते उघडल्यानंतर खात्यात भरलेली रक्कम १५ वर्षांपर्यंत काढता येत नाही. अर्थात सात वर्षांनंतर काही किमान रक्कम खात्यातून काढण्याची सुविधा असते. सुरक्षिततेशिवाय या योजनेचे अजून दोन सर्वात महत्त्वाचे फायदे म्हणजे सध्या ७.९५ टक्के असा अन्य गुंतवणूक साधनांच्या मानाने घसघशीत म्हणावा असा परतावा आणि त्याउपर म्हणजे गुंतवलेल्या रकमेवर प्राप्तिकराच्या कलम ८०सी अंतर्गत मिळणारी सूट. (अर्थात ही सवलत जुन्या नियमानुसार प्राप्तीकर अर्ज भरणाऱ्यांनाच लागू आहे). आपण गुंतवलेली रक्कम १५ वर्ष अडकते हा या योजनेचा एक तोटा आहे असंही काहीजण म्हणू शकतात. पण ते अंशतःच खरं आहे. कारण गुंतवणुकीचं हे सूत्रच आहे की, आपण आपली गुंतवणूक जितक्या अधिक काळासाठी करतो तितका मिळणारा परतावा अधिक असण्याची शक्यता जास्त असते.

राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र आणि किसान विकास पत्र

या दोन्ही सरकारी योजनांमध्ये ७.६% व्याजदर असून पोस्ट ऑफिसच्या माध्यमातून या योजनांमध्ये गुंतवणूक करता येते. राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रांतर्गत केलेल्या गुंतवणुकीचा लॉक-इन कालावधी ५ वर्षे असून किसान विकास पत्रासाठी हाच कालावधी साधारण १० वर्षे आहे. या योजनेंतर्गत १० वर्षांमध्ये आपली गुंतवणूक दुप्पट होते. राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र योजनेंतर्गत केलेली गुंतवणूक प्राप्तिकराच्या कलम ८०सी अंतर्गत सूट मिळण्यासाठी पात्र ठरते मात्र किसान विकास पत्रांतर्गत केलेल्या गुंतवणुकीवर हा लाभ घेता येत नाही.

सुकन्या समृद्धी योजना

ही योजना खास महिलावर्गासाठी आहे. आपल्या वय वर्षं दहाच्या आतल्या मुलींसाठी पालक या योजनेंतर्गत गुंतवणूक करू शकतात. या खात्यात दरवर्षी किमान २५० रुपये भरणे आवश्यक असते. मुलगी १८ वर्षांची झाल्यावर हे खाते बंद करता येते. दरम्यान गुंतवलेल्या रकमेवर ९.१ टक्के असं घसघशीत व्याज मिळते.

अटल पेन्शन योजना

१८ ते ४० यादरम्यान वय असलेली कुठलीही व्यक्ती या योजनेंतर्गत गुंतवणूक करू शकते. किमान २० वर्षांसाठी दर महिन्याला ठरावीक गुंतवणूक करून (किमान २१० रुपये) त्याप्रमाणे वयाच्या ६० व्या वर्षापासून निवृत्तिवेतन अर्थात पेन्शन मिळायला सुरुवात होते.

आत्तापर्यंत आपण पारंपरिक आणि तुलनेने सुरक्षित अशा गुंतवणूक पर्यायांवर विचार केला. आता अधिक परतावा देणाऱ्या परंतु तुलनेने अधिक जोखीम असलेल्या अशा काही निवडक पर्यायांचा विचार करू.

म्युच्युअल फंड

म्युच्युअल फंड हा प्रचंड मोठा विषय आहे. परंतु आज आपण फक्त आपल्या आजच्या लेखाच्या अनुषंगाने आणि फक्त त्या संदर्भात आवश्यक असलेल्या मुद्द्यांनाच स्पर्श करू. म्युच्युअल फंड म्हणजे काय हे आपण अगदी थोडक्यात बघू. समजा एखाद्या कंपनीच्या एका शेअरची किंमत १००० रुपये आहे. दहा जणांना त्या कंपनीचा शेअर विकत घ्यायचा आहे. परंतु त्या दहाजणांपैकी कोणाकडेही एकरकमी १००० रुपये नाहीयेत. अशा वेळी त्या दहा जणांनी एकत्र येऊन प्रत्येकी १०० रुपये काढून तो एक शेअर दहाजणांमध्ये सामायिकरीत्या विकत घेतला. एका वर्षाने तो शेअर १२०० रुपयांना गेल्यावर त्यांनी तो शेअर विकून टाकला आणि मिळालेला नफा प्रत्येकी समप्रमाणात वाटून घेतला. अशा रीतीने त्यांना कमी भांडवलात अधिक नफा कमावता आला. हे झाले म्युच्युअल फंडच्या कार्यपद्धतीचे अगदी ढोबळ रूप. आता म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक कशी करायची याविषयी आपण बघू.

म्युच्युअल फंडमध्ये दोन पद्धतींनी गुंतवणूक करता येते. एकरकमी अर्थात लम्पसम किंवा सिस्टिमेटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन (एसआयपी). एकरकमी गुंतवणूक अर्थात सुरुवातीला एकदा करावी लागते तर एसआयपी अंतर्गत एक ठरावीक

स्टॉक मार्केट अर्थात शेअर बाजार

पुरेसे ज्ञान असल्याशिवाय यात उतरणे म्हणजे संकटाला आमंत्रण देण्यासारखेच आहे. त्यामुळे शेअर बाजार, त्यातील कंपन्या, त्यांचे व्यवहार, कंपन्यांचे वार्षिक अहवाल, व्यवसाय पद्धती इत्यादी सर्व अंगांची समग्र माहिती करून घेऊन त्यानंतरच कुठल्याही कंपनीचे समभाग विकत घ्यावेत.

रक्कम दर महिन्याला गुंतवावी लागते. म्युच्युअल फंडमध्ये गुंतवलेल्या रकमेसाठी कुठलाही लॉक-इन कालावधी नसला तरी गुंतवलेली रक्कम एक वर्षाच्या आधी काढून घेतल्यास १ ते २ टक्क्यांचा एग्झिट लोड अर्थात दंड भरावा लागतो. इक्विटी लिंक्ड सेव्हिंग स्किम अर्थात ईएलएसएस प्रकारच्या फंडमध्ये गुंतवणूक केल्यास आपली रक्कम किमान तीन वर्षांच्या कालावधीसाठी अडकते. परंतु ईएलएसएस प्रकारच्या फंड्सचा फायदा म्हणजे याअंतर्गत मिळणारा परतावा अन्य प्रकारांपेक्षा तुलनेने बराच अधिक असतो तसेच या गुंतवणुकीवर प्राप्तिकराच्या ८०सी (८०उ) अंतर्गत सूटही मिळते. गुंतवणुकीची पद्धत, जोखीम, परतावा, शेअर्सची निवड इत्यादी अनेक मुद्दे विचारात घेता म्युच्युअल फंड्सचे बॅलेन्स्ड फंड, थिमॅटिक फंडस्, डेब्ट फंड, हायब्रिड फंड, ओपन/क्लोज एंडेड फंड, लार्ज/मिड/स्मॉल कॅप फंडस्, डायरेक्ट/रेग्युलर फंडस् असे विविध प्रकार आहेत. अर्थात विस्तारभयास्तव त्या सर्वांची चर्चा इथे करणे शक्य होणार नाही. पण जाता जाता काही महत्त्वाच्या मुद्द्यांना स्पर्श करू या. 'रेग्युलर फंडस्' मध्ये गुंतवणूक करायची असल्यास गुंतवणूकदाराचे 'डिमॅट अकाऊंट' असणे अनिवार्य आहे. मात्र 'डायरेक्ट फंडस्'मध्ये गुंतवणूक करण्यासाठी डिमॅट खातं असलंच पाहिजे अशी काही अट नसते. तसेच अजून एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सोने खरेदीसाठी असलेले गोल्ड ईटीएफ फंडस्. थेट सोने (Physical Gold) विकत घेण्याऐवजी गोल्ड ईटीएफच्या माध्यमातून सोन्यात गुंतवणूक केल्यास त्याचे दोन प्रमुख फायदे आहेत. एक तर ते सोने सांभाळण्याची जोखीम आणि ते ठेवण्यासाठी येणार बँक लॉकर वगैरेचा खर्च वाचतो. आणि दुसरी गोष्ट म्हणजे गोल्ड ईटीएफमधील सोन्याच्या दर्जा आणि शुद्धता इत्यादींबाबत खात्री करून घेण्याची काळजी गुंतवणूकदाराला करावी लागत नाही. म्युच्युअल फंड कंपनीवर ती जबाबदारी असते. आता लेखाच्या अखेरीस आपण गुंतवणूक पद्धतीतील सर्वांत अधिक जोखीम असलेल्या साधनाकडे वळू.

आत्तापर्यंत आपण बँका, पोस्ट ऑफिस, म्युच्युअल फंड, समभाग इत्यादींच्या माध्यमातून करता येऊ शकणाऱ्या गुंतवणुकीच्या विविध पर्यायांचा आढावा घेतला. पण दुर्दैवाने काही जनसमूह असेही असतात की ज्यांना

त्यांचे दुर्गम भौगोलिक स्थान किंवा आर्थिक परिस्थिती किंवा अशाच अन्य काही कारणांमुळे वर उल्लेखलेल्यापैकी कुठल्याही माध्यमामार्गे गुंतवणूक करता येणे शक्य नसते. खास अशा लोकांसाठी पुढे दिलेली योजना अतिशय उपयुक्त ठरू शकते.

बचतगट

खेड्यातल्या, वस्तीतल्या, पाड्यावरच्या महिला मिळून त्यांचा एक बचतगट स्थापन करू शकतात. त्यांच्यातल्याच एका सदस्याची निवड त्यांच्या बचतगटाची प्रतिनिधी किंवा प्रमुख म्हणून करता येते. सर्वानुमते एक अल्प रक्कम ठरवून दर महिन्याला तेवढी रक्कम प्रत्येक महिला बचतगटाच्या स्वाधीन करते. या बचतगटाचे जवळच्या सरकारी बँकेत खाते उघडले जाते. बचतगटांचे अनेक फायदे आहेत. रक्कम सुरक्षित राहते, अगदी अल्प रक्कमही भरता येते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे कधी एखाद्या सभासदाला व्यवसायासाठी भांडवलाची आवश्यकता भासल्यास त्यांना सहजपणे कर्ज मिळू शकते जे अर्थातच एका व्यक्तीला मिळू शकणाऱ्या कर्जाच्या रकमेपेक्षा कैक पटीने अधिक असते.

गुंतवणूक हे क्षेत्र इतके विशाल आहे की एका छोट्याशा लेखाच्या माध्यमातून ते समर्पकरीत्या मांडणे ही निश्चितच अवघड बाब आहे. परंतु क्लिष्ट, अवघड, जोखमीचं समजून त्याकडे दुर्लक्ष करणे हे तर त्याहूनही धोकादायक आहे. त्यामुळे या लेखाच्या माध्यमातून या लेखात उल्लेखलेल्या अनेक साधन/योजनांपैकी आपल्याला पटणाऱ्या, योग्य वाटणाऱ्या कुठल्याही प्रकारात किमान १ टक्के वाचकांनी जरी गुंतवणूक करायला सुरुवात केली तरी हे लेखन सत्कारणी लागलं असं समजण्यास हरकत नाही.

महिलांनी गृहकर्ज घेऊन घर घेतल्यास, बहुतेक सर्व बँका महिलांसाठी व्याजदरात खास सवलत देतात. त्यामुळे घरखरेदी ही एकप्रकारे गुंतवणूक करता येते. त्यामुळे दुहेरी फायदा होतो. जुन्या प्राप्ती कररचनेनुसार अर्ज केला तर गृहकर्ज व्याज सवलत मिळते आणि त्याबरोबरच व्याजसवलत मिळते. त्यामुळे इथे महिलांना दुहेरी फायदा होतो.

विमा

विमा आणि युलीप (युनिट लिंक इन्शुरन्स प्लॅन) या योजना गुंतवणूक या विषयात येऊ शकत नाहीत. कारण त्यात गुंतवणूक आणि परतावा असला तरी त्या योजनांचा मुख्य उद्देश 'जीवन विमा' असतो. आणि अगदी प्रामाणिकपणे सांगायचं तर विमा आणि गुंतवणूक कधीही एकत्र करू नये. विम्याचा उद्देश आणि गुंतवणुकीचा उद्देश स्पष्ट असायला हवा.

इंटरनेटवरचे आभासी जग आपल्या समाजातील लोकांनी निर्माण केले आहे. त्यामुळे समाजात जसे सद्वर्तनी असतात तसेच काही समाजकंटकही असतात. इंटरनेट अर्थात महाजालावरही असे समाजकंटक आपल्या विकृतीसह वावरत असतात. या माध्यमांचा वापर करून महिलांचे शोषण करणाऱ्या सायबर गुन्ह्यांची व्याप्ती घाबरवून सोडणारी आहे, त्यासाठी महिलांनी अधिक जागरूकतेने हे माध्यम वापरणे आवश्यक आहे.

सायबर महागुरू

ॲड. प्रशांत माळी

महाजालावरची सावधगिरी

स्त्रियांकडे बघण्याचा काही विकृतांचा दृष्टिकोन केवळ उपभोगाचे साधन बनला आहे. दर दिवशी येणारी बलात्काराची बातमी मन सुन्न करणारी आहे. भौतिक जगात स्त्रियांचे होणारे शोषण डिजिटल जगामध्येही होत आहे हे सर्वात भीषण चित्र आहे. माहिती आणि तंत्रज्ञानाचा वापर असंख्य स्त्रिया नेटवर्किंग, व्यवसाय किंवा अभिव्यक्तीसाठी करतात परंतु, त्याबरोबरच त्यांचे सायबर पीडित होण्याचे प्रमाण खूप वाढले आहे.

सायबर क्राईम पीडित स्त्रीने नक्की कोठे जावे? काय करावे व स्वतःची मानसिकता कशी जपावी? हे तीन मोठे प्रश्न समाजासमोर आहेत.

'सायबर स्पेस' हे मानवी विकासाच्या मार्गातील सर्वात मोठे साधन ठरले आहे. इंटरनेटमुळे जग जोडले गेले आहेत. विविध समाज माध्यमे आणि इंटरनेट सुविधेने सामाजिकीकरणाचे एक नवीनच रिंगण समाजात निर्माण केले आहे. या रिंगणातील प्रवेश सर्वांसाठी खुला असल्याने समाजातील स्त्रिया या मुक्तीचा पुरेपूर आणि आनंदाने फायदा घेताना दिसतात. ऑनलाइन शॉपिंगपासून ते नेट बँकिंगपर्यंत, ऑनलाइन तिकिटांपासून ते ऑनलाइन टॅक्स-फायलिंगपर्यंत या सोशल नेटवर्किंगच्या व्यासपीठाने भारतीय महिलांचे जीवन अगदी सुखकर केले आहे. ऑनलाइन जगात स्त्रिया त्यांचा अनुभव जगासोबत वाटू शकतात आणि सोशल नेटवर्किंगच्या या फायद्यामुळे अनेक महिला त्यांच्या यशोगाथा त्याचबरोबर त्यांच्या आयुष्यातील अडचणी किंवा गाऱ्हाणी या व्यासपीठाद्वारे मांडताना आपण पाहतो. बऱ्याच महिलांकडून या नवीन सामाजिकीकरणाच्या मार्गाचा, 'तणाव-मुक्ती'चे माध्यम म्हणून वापर करताना दिसत आहेत. समाज माध्यमाद्वारे समदुःखी मित्रमैत्रिणी बनवल्या जातात, एकसारख्या विचारांच्या व्यक्तींची ओळख वाढवून त्यांच्यासोबत सुख-दुःखाच्या क्षणांची देवाणघेवाण होत आहे. इतकेच नाही तर, वैयक्तिक किंवा सामाजिक आयुष्यातील संघर्षांनासुद्धा इथे वाचा फोडली जात आहे, हे सगळे असूनही आहे मनोहर तरीही असेच म्हणावे लागते. त्याला कारणही तसेच आहे.

आभासी जग

या माध्यमामुळे घडणाऱ्या, आभासी जगतातील वाढत्या सायबर गुन्ह्यांमुळे, स्त्रियांचे जीवन अतिशय असुरक्षित होऊ लागले आहे. इंटरनेटच्या या वादळामुळे सर्व वयोगटातील आणि सर्व स्तरातील स्त्रिया फार मोठ्या आव्हानाला सामोऱ्या जात आहेत. माझ्या आजवरच्या कारकिर्दीत माझ्यासमोर असे अनेक प्रसंग आहेत, जिथे स्त्रियांच्या ऑनलाइन बदनामीमुळे किंवा त्यांच्यावर ऑनलाइन स्वरूपातील झालेल्या अत्याचारामुळे त्यांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. यात सर्वात मोठा धोका असतो तो किशोरवयीन मुलींसाठी. त्या या जगात अगदीच नवीन असतात आणि त्याचाच गैरफायदा काही विकृत घेण्यास टपलेले असतात त्यांना या माध्यमातील धोक्यांची जाणीव अगोदर करून देणे महत्त्वाचे असते, त्यासाठी

सायबर स्टॉकिंग

सायबर स्टॉकिंग म्हणजे, विविध ऑनलाइन माध्यमातून एखाद्या स्त्रीचा तिच्या इच्छेविरुद्ध सतत पाठलाग करणे व त्याद्वारे तिचा मानसिक छळ करणे. एखाद्या महिलेच्या मनाविरुद्ध तिच्या समाज माध्यमावरील प्रोफाइलवर सतत मैत्रीची मागणी करणे, मेसेजला उत्तर दिले नाही तरी सतत तिला काही ना काही अवास्तव संदेश, स्मायलीज पाठवणे, सोशल माध्यमावरून एखाद्या महिलेला 'फ्रेंड रिक्वेस्ट' पाठवणे, तिच्या समाज माध्यमावरील पोस्टवर सारख्या छळणाऱ्या प्रतिक्रिया लिहिणे, तिला ई-मेल अथवा समाज माध्यमाद्वारे प्रत्यक्ष भेटण्यासाठी आग्रह करणे, दूरध्वनीवर प्रतिसाद मिळाला नाही तर संकेतस्थळ, चॅट-रूम्स, ऑनलाइन चर्चा मंच, खुल्या प्रकाशन वेबसाइट्स आदी माध्यमाद्वारे सतत संपर्क करत राहणे, सर्वतोपरी त्या स्त्रीला त्रास देऊन तिचे शोषण करणे, यालाच सायबर स्टॉकिंग म्हटले जाते.

ई-मेलद्वारे केल्या जाणाऱ्या छळवणुकीप्रमाणे सायबर स्टॉकिंगचा गुन्हा भारतीय सायबर कायद्यामध्ये अंतर्भूत केलेला नाही. माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ७२ अन्वये केवळ गोपनीयतेचा भंग केल्याविरोधात आरोपीविरुद्ध तक्रार दाखल केली जाऊ शकते. त्याचबरोबर, भारतीय दंड विधानातील कलम ५०९ आणि ४४१ अन्वये शिक्षा होऊ शकते.

पालकांमधील जाणीव अधिक महत्त्वाची आहे. सायबर क्राइमचे बळी पुरुष ठरत नाहीत असे नाही पण यात महिलांचे बळी ठरण्याचे प्रमाण अधिक आहे आणि ते काळजी करण्यासारखे आहे. सायबर स्टॉकिंग, हॅकिंग, ऑनलाइन बदनामी, प्रौढ छळवणूक, इलेक्ट्रॉनिक ब्लॅकमेलिंग, मॉर्फ्ड पोर्नोग्राफिक इमेजेस, रिव्हेंज पॉर्न आदींचा समावेश आहे. सहसा सायबर गुन्ह्यांमध्ये गुन्हेगार विविध युक्त्या वापरून एखाद्या स्त्रीच्या वैयक्तिक आयुष्यावर त्यांचे सर्वतोपरी नियंत्रण ठेवू पाहतात, त्यांना दमदाटी करून त्यांचे शारीरिक, भावनिक तसेच आर्थिक शोषण करतात.

सायबर छळवणूक

सायबर तंत्रज्ञान गुन्हेगारांना त्यांची ओळख लपवून व्हर्चुअल जगतात वावरण्याची मुभा देते. या व्हर्चुअल जगात स्त्रियांवर लैंगिक अत्याचार राजरोसपणे चालतात. वेगवेगळ्या पद्धतीत ही छळवणूक केली जाते. कधी शाब्दिक तर कधी चित्रांच्या किंवा ग्राफिक्सच्या स्वरूपात असलेली ही छळवणूक ऑनलाइन वक्तव्यातील सक्रिय आणि निष्क्रिय अशा दोन्ही प्रकाराची असते. त्यापैकी शाब्दिक सक्रिय लैंगिक अत्याचार म्हणजे ई-मेल्स किंवा चॅट-रूम्सद्वारे अश्लील, शारीरिकदृष्ट्या पाणउतारा करणारे संदेश पाठवणे. या संदेशामधील टीका आक्षेपार्ह तेव्हाच मानल्या जातात, जेव्हा समोरील व्यक्ती त्या टीकांच्या विरोधात असते किंवा समोरील व्यक्ती तसे संदेश स्वीकारत नाही. निष्क्रिय लैंगिक अत्याचारात एका व्यक्तीऐवजी अनेक व्यक्तींना उद्देशून टीका केली जाते. ग्राफिक्सच्या स्वरूपातील लैंगिक छळवणूक म्हणजे पोर्नोग्राफिक छायाचित्रे, चित्रफिती प्रसारित करणे इत्यादींचा समावेश असतो. यातील निष्क्रिय प्रकार म्हणजे पोर्नोग्राफिक छायाचित्रे आणि चित्रफिती असलेल्या संकेतस्थळाची लिंक पाठविणे आणि त्याद्वारे त्रास देणे. माहिती तंत्रज्ञान कायद्यामधील कलम ६७ अ, ६७ ब अन्वये वरील गुन्ह्याविरोधात शिक्षेची तरतूद केलेली आहे. परंतु, सहसा गुन्हेगार त्यांची खरी ओळख लपवून हा गुन्हा करत असल्यामुळे त्यांचा छडा लावणे, अवघड जाते.

सायबर पोर्नोग्राफी

स्त्रीसंबंधी अश्लील चित्रणे संकेतस्थळावर प्रदर्शित करणे म्हणजे सायबर पोर्नोग्राफी होय. महिलांसाठी ही एक वेगळीच भीती आहे कारण, त्यांची कोणती कृती केव्हा आणि कशा प्रकारे रेकॉर्ड करण्यात आली आणि शेवटी ते इंटरनेटपर्यंत येऊन कसे प्रदर्शित झाले हे बऱ्याचदा त्या स्त्रीच्या लक्षातच येत नाही.

इतर सायबर गुन्ह्यांच्या तुलनेत सायबर पोर्नोग्राफी या गुन्ह्याला असाधारण गुन्हा म्हणता येईल, ज्याचा माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत कलम ६७ मध्ये अंतर्भाव केला आहे. या कायद्याबरोबरच भारतीय दंड विधानातील विविध कलमे (कलम २९०, २९२, २९२-अ, २९३, २९४ तसेच कलम ५०९) देखील लावली जाऊ शकतात.

ऑनलाइन बदनामी

बदनामी आणि बेअब्रूकारक मजकूर ऑनलाईन छापणे, हा आणखी एक महिलांविरुद्ध घडणारा सर्वसामान्य सायबर गुन्हा आहे. संगणक आणि इंटरनेट यांचा वापर करून केल्या जाणाऱ्या बदनामीला

ऑनलाइन बदनामी, असे म्हणतात.

मॉर्फिंग

मॉर्फिंग म्हणजे मूळ छायाचित्र अशा काही पद्धतीने बदलणे, जेणेकरून त्याचा अर्थ पूर्णपणे किंवा बऱ्याच अंशी बदलून काही वेगळाच निष्कर्ष लागावा. सर्वसाधारणपणे, सायबर गुन्हेगार मुलींचे विविध फोटो सोशल मीडियावरून डाऊनलोड करतात आणि त्याचे इतर छायाचित्रांसमवेत रूपांतर करतात. हे रूपांतर असे काही असते की जणू काही ती विशिष्ट स्त्री त्या छायाचित्रामधील कृतीत खरोखर सामील असल्याचे भासते. असे फोटो रूपांतरित केल्यानंतर सहसा गुन्हेगार त्या महिलेला खोट्यानाट्या धमक्या देऊन त्यांच्याकडून पैसे उकळतात.

ई-मेल स्पूफिंग

या गुन्ह्यामध्ये ई-मेल पाठवणाऱ्याची माहिती, ई-मेल मधील फूटर व इतर माहिती मुद्दाम बदलून सायबर गुन्हेगार त्यांची ओळख लपवतात आणि जणू काही तो ई-मेल कोणी अमुक व्यक्तीने पाठवला आहे असे भासवतात. गैरउद्दिष्ट मनात ठेवून ई-मेलचे रिटर्न-पाथ, रिप्लाय-टू फिल्ड्स बदलले जातात. हे करण्याचा गुन्हेगारांचा मानस म्हणजे लक्षीत स्त्रीबद्दल वैयक्तिक माहिती मिळवणे, तिचे गोपनीय छायाचित्रे मिळवणे आणि मग त्यांचा गैरवापर करून त्या स्त्रीला ब्लॅकमेल करणे.

निनावीपणाचे सोंग

सायबर स्पेसमधील स्त्री-हक्कासंबंधी समस्या वाढण्यामागे स्त्री-पुरुष समानतेला अनुसरून सरकारची पावले पडत आहेत. माहिती तंत्रज्ञान कायदा अगदी स्पष्ट उद्दिष्टासाठी अंमलात आणला आहे आणि ते म्हणजे ई-कॉमर्स व्यासपीठ होऊन त्यासंबंधीचे व्यावसायिक आणि आर्थिक

गुन्हे आटोक्यात आणता आले पाहिजेत. परंतु, या कायद्याचा मसुदा तयार करताना इंटरनेट आणि त्याच्या वापरासंबंधीच्या सुरक्षिततेचा अधिक विचार केला नसल्याचे दिसते. सायबर कायद्यामध्ये सद्य:स्थितीतील गुन्ह्यांसाठी विशेष तरतुदी आवश्यक आहेत, जेणेकरून गुन्हेगारास सायबर गुन्ह्यासाठी बेड्या ठोकताना इतर कायद्यांचा टेकू घेणे गरजेचे राहणार नाही. इंटरनेटचा संदिग्ध असण्याचा गुणधर्म जरी वाढत्या सायबर गुन्ह्यांचे एक कारण असला तरी माहिती तंत्रज्ञान कायद्यामधील कलम ७५ भारताबाहेरील घडणाऱ्या सायबर गुन्ह्यांच्या बाबतीत शिक्षेची तरतूद सांगते. मात्र, सायबर स्पेसमध्ये घडलेल्या गुन्ह्यांची नोंद कोणत्या अधिकारक्षेत्रात येईल आणि ते गुन्हे कोठे आणि कसे नोंदवले जातील, याची तरतूद नाही. परिणामी, गुन्ह्यांना आवर घालणे अवघड झाले आहे.

कायद्याच्या या खिंडारापलीकडे सायबर स्पेसमधील निनावीपणा हे महिला पीडितांमागचे मोठे कारण आहे. सायबर जग हे व्हर्च्युअल असल्याने गुन्हेगारांना त्यांची ओळख बदलून गुन्हे करणे आणि स्वतःचा बचाव करणे खूप सोपे आहे. गुन्हा करण्याचे ठिकाण जरी शोधता आले, तरी त्यामागचा खरा सूत्रधार शोधणे, ही पोलिसांसमोरची मोठी जोखीम असते. संकेतस्थळे त्यांच्या उपभोक्त्यांची माहिती शाब्दिक, छायाचित्रे किंवा चित्रफिती या स्वरूपात प्रसारित करीत असतात. संकेतस्थळाची निर्मिती बऱ्याच उपयुक्त कामांसाठी किंवा उद्देशांसाठी करण्यात येते पण, त्याद्वारे मिळणाऱ्या महिलांबाबतच्या माहितीचा खूपदा बदनामी, द्वेष आणि अश्लील कृत्यांसाठी वापर करताना समाजकंटक दिसतात. याचा निष्कर्ष असा निघतो की, वैयक्तिक माहितीच्या प्रसाराची व्यापकता खासकरून समाजातील स्त्रियांसाठी अत्यंत घातक आहे.

सायबर कायदा आणि सुरक्षा तज्ज्ञ

अशी काळजी घ्या..

पोलीस, न्यायव्यवस्था आणि अन्वेषक दल यांनी अत्याधुनिक अशा वेब-बेस्ड ॲप्लिकेशन्समध्ये होणाऱ्या बदलांसोबत बरोबरीने ज्ञात राहणे गरजेचे आहे, यामुळे खऱ्या गुन्हेगाराला पकडून शिक्षा देणे सोयीस्कर होईल. प्रशासन आणि कायदे सुव्यवस्था यांनी तंत्रज्ञानाच्या विकासासोबत दोन हात करून तांत्रिक टूल्स शोषण आणि छळवणूक करण्याच्या हेतूने वापरल्या जाणार नाहीत, याची खात्री करण्यासाठी ठोस पावले उचलावीत. कायद्यांकरवी उपभोक्त्याच्या संवधर्नासोबतच त्यांना मार्गदर्शक सूचना करण्यात याव्यात. नागरिकांनीदेखील त्यांच्या ऑनलाइन आणि ऑफलाइन वर्तणुकीची जाणीव ठेवून, सतर्क राहून सायबर जगतात वावरावे.

सायबर युग हे सर्वपरिचित झाले असल्याने समाज माध्यमांचा, इंटरनेटचा वापर हे आता आगत्याचे बनले आहे. पण, हा वापर करताना आपली सद्सद्विवेकबुद्धी वापरून प्रत्येक स्त्रीने आपल्या जीवनात कोणासोबत मैत्री करावी, कोणासोबत संवाद साधावा, हे ठरवावे व गरज पडल्यास थोरामोठ्यांचे सल्ले घ्यावेत, तसेच सायबर विश्वातसुद्धा ही वागणूक जपावी. सायबर गुन्हा घडल्यास त्याला धैर्याने सामोरे जावे व गरज पडेल तिथे पोलीस व कायद्याची मदत अवश्य घ्यावी.

स्त्रियांनी एखादी गोष्ट ठरवली तर त्या पूर्णत्वास नेतातच. तिचे ठरवणे तेवढे पक्के असायला हवे. याचा प्रत्यय महाकाव्ये-महाकथांमधील महिलांच्या पात्रांपासून ते आधुनिक महिलांच्या कर्तृत्वातून दिसून येतो. देशाच्या राजधानीत आपल्या कार्यकर्तृत्वाने महिलांनी वेगळा ठसा उमटवला आहे.

दिल्लीतील 'मराठी नारीशक्ती'

अंजू निमसरकर

देशात महाराष्ट्राची ओळख पुरोगामी राज्य अशी आहे. ही ओळख स्त्री-पुरुष समानतेमुळेच होऊ शकली आहे. स्त्रियांसाठीची वाट थोडी अधिक बिकट असते, हे कोणीही नाकारू शकणार नाही. कारण स्त्री ही जेव्हा पत्नी, आईच्या भूमिकेत जाते तेव्हा तिला स्वत:ला सिद्ध करण्यासाठी अधिक बळ निर्माण करावे लागते. आपले गाव, जिल्हा, राज्य सोडून आल्यानंतर दिल्लीसारख्या ठिकाणी स्वत:ला सिद्ध करणे हे अधिकच जिकिरीचे होऊन जाते. महाराष्ट्रातून दिल्लीत आलेल्या महिलांमध्ये काही लग्नानंतर आपल्या जीवनसाथीसोबत आल्या आहेत, तर काही नोकरीनिमित्त तर काही स्वप्नपूर्तीसाठी. घरातील, कार्यालयातील आपल्या भूमिका बजावताना एक वेगळी ओळख निर्माण करताना या सर्वांना प्रयत्न व सातत्य हे ठेवावे लागले आहे. अशा काही महिलांमुळे महाराष्ट्राची मान राजधानीत उंचावली आहे.

अर्चना मिरजकर

बातमीदार, संपादिका, लेखिका

नमिता भंडारे, पत्रकारिता क्षेत्रातील एक मोठे नाव. यांचा जन्म अमराठी कुटुंबात मुंबईत झाला तर त्यांचे लग्न मराठी कुटुंबात झाले. पत्रकारिता क्षेत्रात ज्या काळात फारशा महिला नव्हत्या, त्या काळात त्यांनी सुरुवात केली. रिपोर्टिंगपासून ते संपादिकापर्यंतचा त्यांचा प्रवास राजधानीत झाला. देशाच्या पहिल्या 'जेंडर एडिटर' म्हणून त्यांनी मिंट या वर्तमानपत्राचे काम बघितले. आज त्या विविध इंग्रजी दैनिकात स्तंभ-लेखिका म्हणून लिंग समानता जागरूकतेविषयी लिहितात.

नमिता भंडारे

निवेदिता मदाणे

आंतरराष्ट्रीय माध्यम क्षेत्रातही मराठी महिलांचा ठसा आहे. कॅनेडा दुतावासामध्ये माध्यम समन्वयक म्हणून काम पाहणाऱ्या अर्चना मिरजकर मूळच्या कोल्हापूरच्या आहेत. त्या लेखिकादेखील आहेत.

पत्रकारिता क्षेत्रातील आणखी एक नाव ज्यांनी दिल्लीत आल्यावर नव्याने आयुष्याला वळण दिले त्या निवेदिता वैशंपायन-मदाने त्या नाशिकच्या. मुलाला आई-बाबा दोघेही मिळावे म्हणून नाशिक सोडून दिल्लीत आल्या. येथे आल्यावर त्यांचा लेखन प्रवास नव्याने सुरू झाला. 'द कोर' या मराठी मासिकाच्या संपादिका म्हणूनही काम करण्याची संधी त्यांना मिळाली.

समुपदेशक

मूळ नाशिकच्याच असणाऱ्या ॲड. रुचा माई यांनी कायद्याचे शिक्षण घेतले. मात्र, एक ब्लॉगर म्हणून आज त्यांची स्वतंत्र ओळख आहे. लिखाणाच्या माध्यमातून कमीत-कमी शब्दात अधिकाधिक समुपदेशन करण्याचा त्यांचा ध्यास असतो.

ॲड. रुचा माई

सामाजिक कार्य

२०१६ मध्ये भारतीय प्रशासकीय सेवेत प्रथम आलेल्या टिना डाबी यांच्या आई हिमाली डाबी-कांबळे यांचा जन्म हा नागपूरचा. या भारतीय दूरसंचार सेवेतील अधिकारी होत्या. आपल्या मुलींना युपीएससीसाठीचे प्रशिक्षण देता-देता त्यांचा स्वत:च इतका अभ्यास झाला की, त्या विविध खासगी वर्गात सामान्य ज्ञान हा विषय शिकवतात.

उस्मानाबाद जिल्ह्यातील शारदा डोलारे हे असे नाव आहे, ज्यांनी दिल्लीत शाळा सुरू केली. त्यांची मॉडर्न पब्लिक स्कूल ही शाळा पहिली ते दहावीपर्यंतची आहे. या शाळेत अंत्यत माफक शुल्क आकारले जाते.

दिल्लीत अनेक नव्या-जुन्या मराठी संस्था आहेत. त्यातील एक ऑल इंडिया सिद्धार्थ वेलफेअर सेंटर ही ४५ वर्ष जुनी संस्था आहे. या 'संस्थेच्या पहिल्या महिला अध्यक्ष' होण्याचा मान मुळच्या परभणीकर असलेल्या सुजाता अंबोरे यांना मिळाला. श्रीमती अंबोरे यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेची सकारात्मक वाटचाल सुरू आहे.

नांदेडच्या असणाऱ्या डॉ. संगीता कस्तुरे सध्या भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयातील जैव तंत्रज्ञान विभागात वैज्ञानिक आणि धोरण अधिकारी म्हणून काम पाहतात. ग्रामीण भागाला २४ तास ऊर्जा मिळावी यासाठी त्यांचा प्रयत्न असतो. तांदूळ पेंढा, गहू पेंढा, कपाशीची देठे, ऊस

पिशवी इत्यादी शेती अवशेषांचा वापर करून जैवइंधन तयार केले जाते. डॉ. संगीता संशोधन करणाऱ्या विद्यापीठांना, संशोधन संस्थांना, महाविद्यालये आणि स्वयंसेवी संस्थांना मंत्रालयामार्फत अर्थसाहाय्य करतात. मागील १० वर्षांत केवळ राष्ट्रीयच नाहीत तर आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वच्छ ऊर्जेच्या क्षेत्रात कार्य करीत असताना त्यांनी १००० हून अधिक वैज्ञानिकांना जोडले आहे.

सांस्कृतिक ठेवा

दिल्ली कलानगरी आहे. मंडी हाऊस हे नाटकवाल्यांचे केंद्र आहे. येथील नाट्यक्षेत्राला समृद्ध करण्यामध्ये वर्धेच्या गौरी देवल आपली भूमिका निभावत आहेत. मागील १५ वर्षांपासून विविध नाटकात अभिनय करून प्रेक्षकांवर एक वेगळी छाप त्यांनी सोडली आहे. त्यांनी निभावलेल्या भूमिकेतील 'लीला', 'रूप-अरूप', 'ऑफ्टर थर्ड बेल' ही नाटके खूप गाजली.

माया कारंजकर

चित्रकला या क्षेत्राला योगदान देण्याचे काम मूळ साताऱ्यातील माया कारंजकर करीत आहेत. त्यांच्या चित्रकृतीचे प्रदर्शनही भरत असते.

उपहारगृह

राजधानी दिल्लीत मराठी व्यंजनाची भुरळ घातली ती विभा चिपळूणकर यांच्या 'महाराष्ट्र फूड'ने. येथील आयएनएस्थित 'दिल्ली हाट'मध्ये मागील २५ वर्षांपासून हे खवय्यांचे आवडते ठिकाण आहे.

विभा चिपळूणकर

चंद्रपूरच्या असणाऱ्या डॉ. जया सूर्या या केंद्रीय कृषी मंत्रालयातील भारतीय कृषी संशोधन परिषदेत त्या ज्येष्ठ शास्त्रज्ञ या पदावर कार्यरत आहेत. आतापर्यंत त्यांचे ५० हून अधिक संशोधन पेपर प्रकाशित झालेले आहेत. डॉ. जया सूर्या या देशातील प्रथम महिला मृदा सर्वेक्षक (सॉईल पेडॉलॉजी) आहेत. या क्षेत्रात त्यांनी आपली छाप सोडली आहे. लेह लडाख या परिसरात त्यांचे संशोधन झाले आहे. येथे त्यांना 'लेह बेरी' वनस्पतीचा शोध लागला.

आरोग्य

लीला भटकर

डॉ. राम मनोहर शासकीय रुग्णालयात 'परिचारिका उपअधीक्षक' या पदावर पोहोचणाऱ्या प्रथम मराठी महिला लीला भटकर आहेत. वयाच्या दुसऱ्या वर्षी वडील वारले. आईने मोठ्या जिद्दीने शिकवून मुलांना आपल्या पायावर उभे केले. त्यांचे आई-बाबा हे वर्धा जिल्ह्यातील.

याच रुग्णालयात वरीष्ठ परिचारिका अधिकारी म्हणून काम करणाऱ्या सुजाता नंदेश्वर बहुगुणी आहेत. आरोग्य क्षेत्राशी संबंधित काही मदत लागल्यास त्या सदैव तत्पर असतात. त्यांचा सामाजिक क्षेत्रातही तेवढ्याच वावर आहे. मराठी परिचारिकांना घेऊन त्यांनी 'रमाई' नावाची संस्था सुरू केली आहे.

सुजाता नंदेश्वर

निलिमा शिंगाडे या अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेत परिचारिका आहेत. त्या महिलांना होणाऱ्या कर्करोगाच्या प्रतिबंधात्मक उपायांवर लोकांना जागरूक करतात. कर्करोग संबंधित समपुदेशन करणाऱ्या अनेक संस्थेशी त्या संलग्न आहेत.

निलिमा शिंगाडे

नागपुरात जन्मलेल्या हेमांगी सिन्हा-भिसे या दिल्लीत 'अर्जुन फाउंडेशन'च्या माध्यमातून गरीब मुलींना मासिक पाळीतील स्वच्छतेविषयी माहितीसह मुला-मुलींना एकमेकांचा आदर आणि समान वागणुकीसंबंधी समुपदेशन करतात.

मूळच्या मुंबईच्या श्वेता राणा-करंदीकर या दिल्लीत नागालँडमधील 'एलिझर बालगृह'साठी नि:स्वार्थवृत्तीने निधी मिळवून देतात. या बालगृहात पाच मुली आणि चार मुले आहेत. या सर्वांना कुटुंबातील सदस्यांप्रमाणे खायला, राहायला मिळावे, त्यांचे शिक्षण योग्यरीत्या व्हावे, यासाठी टिनू मेरेन वोझुकूम आणि ओसेनला इमचेन हे जोडपे काम करते. श्रीमती श्वेता राणा-करंदीकर यांनी आतापर्यंत विविध माध्यमांचा उपयोग करून एक लाख रुपयांपेक्षा अधिक निधी या बालगृहासाठी गोळा केला आहे.

श्वेता राणा-करंदीकर

लातूरमधील उदगीर येथे जन्मलेल्या शांता वाघ या दिल्लीतील झोपडपट्टीतील लोकांना पुरेशा सोयीसुविधा मिळवण्यासाठी मागील २५-३० वर्षांपासून कार्य करीत आहेत. त्या येथील भूमी आवास संघटनेच्या समन्वयक म्हणून काम करतात.

शांता वाघ

माहिती अधिकारी,
महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली

कुटुंबाला प्राधान्य देणाऱ्या महिलांचे आरोग्याकडे दुर्लक्ष होत असते. महिलांनी आरोग्यविषयक अधिक सजग राहायला हवे. समाजरथाचे दुसरे महत्त्वाचे चाक असलेल्या महिला जर निरोगी असतील तरच समाज निरोगी राहील.

निरोगी महिला, निरोगी समाज

डॉ. सुजाता जोशी-पाटोदेकर

आरोग्य म्हणजे, केवळ रोगाची अनुपस्थिती नव्हे, तर शारीरिक, मानसिक व सामाजिक कल्याणकारी अवस्था म्हणजे सर्वांगीण आरोग्य अथवा पॉझिटिव्ह हेल्थ - अशी व्याख्या जागतिक आरोग्य संघटनेतर्फे करण्यात आली आहे. 'महिला आरोग्य' या विषयावर लिहिताना वरील व्याख्येसंदर्भात महिलांच्या दृष्टिकोनातून मांडणी करावी लागेल.

आरोग्यपूर्ण तंदुरुस्तीसाठी, आहार-विहार, व्यायाम, मन:शांती ही त्रिसूत्री महत्त्वाची होय. या गोष्टींचा वारंवार उच्चार अनेक माध्यमांमधून होत असतो. महिलांबाबत ही त्रिसूत्री कोणत्या अवस्थेत आढळते? - शहरी व ग्रामीण भागातील स्त्रियांमध्ये या बाबतीत फरक, तफावत आढळते हे लक्षात घ्यावे लागेल.

महिला व आहार

■ उपवासाचे मोठे प्रमाण : आठवड्यातील वेगवेगळे 'उपवासाचे वार' ही महिलांची मक्तेदारी! गोळाबेरीज करता महिन्यातले ८ ते १२ दिवस उपवासाचे व्रत करणाऱ्या महिलांचे प्रमाण लक्षणीय आहे. हे उपवास चुकीच्या पद्धतीने केले जातात व वारंवार केले जातात. त्यामुळे संतुलित आहाराच्या अभावामुळे विविध तक्रारी सुरू होतात. पित्त वाढणे, डोकेदुखी, वजनवाढ, हातपाय ओढणे, अशक्तपणा वाटणे अशा तक्रारी महिलांकडून सतत केल्या जातात.

■ सकाळचा नाष्टा/न्याहरी न करण्याकडे महिलांचा कल असतो. नुसताच दोन तीन वेळेस चहा घेणे आणि घरकाम उरकण्याच्या नादात सकाळचा नाष्टा टाळणे. यामुळेही आरोग्याच्या तक्रारींमध्ये भर पडते. दिवसाच्या आरंभी चांगला, पौष्टिक नाष्टा केल्याने दिवसभरासाठी आवश्यक ऊर्जा प्राप्त होते.

■ पोषक मूल्यांबाबत दुर्लक्ष - हे दोन प्रकारे घडते. गृहिणींच्या बाबतीत, उरलेसुरले शिळे अन्न खाण्याचा प्रघात दिसून येतो. तर तरुणी, किशोरी, नोकरदार महिलांमध्ये चमचमीत, चटकदार फास्ट फूडचे आकर्षण दिसते. या दोन्ही प्रकारामुळे शरीराला आवश्यक असा संतुलित आहार मिळत नाही, या अयोग्य आहार पद्धतीत महिलांमधील अनेक आरोग्यविषयक तक्रारींचे मूळ असते. राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षण सांगते की ५० टक्के स्त्रियांचे हिमोग्लोबीन ८ टक्के किंवा त्यापेक्षा कमी असते.

एका बाजूला कुपोषण आणि दुसऱ्या बाजूला, स्थूलत्व व वाढलेले अतिरिक्त वजन दूरगामी परिणाम करणारे ठरते. पॉलीसिस्टिक ओवरी सिंड्रोम असे नाव असणारे लक्षण तरुणी व मध्यमवयीन महिलांना ग्रासण्याचे प्रमाण वाढत आहे. मासिक पाळी अनियमित व खूप उशिराने येणे, चेहऱ्यावरील मुरूमांमध्ये वाढ आणि वंध्यत्वाची समस्या अशी लक्षणे असणाऱ्या पिसीओएसमध्ये, स्त्रीबीज निर्मितीची प्रक्रिया बाधित होते व अंत:स्त्रावी ग्रंथींचे संतुलन बिघडते. हे टाळण्यासाठी सुयोग्य पोषक आहाराबद्दल जागरूक होणे महिलांसाठी गरजेचे आहे.

महिला व विहार/व्यायाम

गृहिणीपदाची व्यस्तता शिवाय घराबाहेर पडून नोकरी करणाऱ्या महिलांना व्यायामासाठी वेळ काढणे खरोखर कठीण होऊन बसते. चाळिशीच्या आसपास हाडांची ढिसूळता निर्माण होण्यात

नियमित तपासणी

चाळीशीनंतर विशेषतः पाळी बंद झाल्यानंतर महिलांनी नियमितपणे शरीराच्या तपासण्या करणे आवश्यक आहे. आजच्या स्त्रियांवर मानसिक, शारीरिक आणि आर्थिक जबाबदाऱ्या असतात. स्त्रिया संपूर्ण कुटुंबाची काळजी घेतात परंतु त्यांचे स्वतःकडे मात्र दुर्लक्ष होते. स्त्रियांनी कुटुंबाबरोबर स्वतःची काळजी घेणे आवश्यक आहे. कुटुंबाची काळजी आणि स्वतःचे आरोग्य याचा समतोल राखणे आवश्यक आहे.

मानसिक आधाराची गरज

महिलांच्या समस्येबाबत घरातील लोकांना खूप थोडी माहिती असते. मुलीला आपली आई इतकी काळजी का करते आहे, याचे कारण उमजत नाही. नवऱ्याला आपली पत्नी विनाकारण चिडचिड का करते आहे, हे कळत नाही. खरे तर मेनोपॉजच्या काळात महिलांना मानसिक आधाराची फार गरज असते. घरच्यांनी अधिक समजूतदारपणे वागले तर ही समस्या उद्‌भवणारच नाही.

व्यायामांचा अभाव हेदेखील महत्त्वाचे कारण असते. आपल्याकडे प्रभात फेरी- अर्थात 'मॉर्निंग वॉक'चा प्रघात घट्ट रुजलेला आहे. सकाळी वेळ मिळत नाही म्हणून मग महिला, फिरणे व व्यायाम करतच नाहीत ! आपल्या सवडीनुसार चालणे, सायकलिंग, स्नायूचे व्यायाम, वजन उचलणे या गोष्टी दिवसभरात कधीही करण्यास हरकत नसते, हे महिलांनी ध्यानात ठेवावे. व्यायामामुळे, एंडोर्फिन (Endorphins) नामक द्रव्य मेंदूद्वारे निर्माण होते- ज्यामुळे सुखद अशी आनंदाची अनुभूती होऊन त्याचा आरोग्यावर खूप सकारात्मक परिणाम होतो. व्यायाम हा केवळ वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी नसून, एकूणच आरोग्यासाठी जीवनासाठी आवश्यक होय. हे महिलांमध्ये बिंबवले गेले पाहिजे.

महिला व प्रसाधने

विशिष्ट शहरी वर्गामध्ये स्वतःच्या दिसण्याबद्दल महिला कमालीच्या दक्ष झालेल्या दिसतात. माध्यमातील प्रचंड जाहिरातबाजीचा प्रभाव त्यांच्यावर पडतो. झटपट गोरे बनवणारी क्रीम्स, तसेच त्वचा नितळ करणारी उत्पादने परस्पर वापरल्याने त्याचे दुष्परिणाम झालेल्या स्त्रिया त्वचा रोगतज्ज्ञांकडे नंतर उपचारासाठी येतात. जाहिरातींना न भुलता तज्ज्ञांचा योग्य सल्ला घेणे हितकारक होय. मुख्य म्हणजे, गोरेपणाचा हव्यास न धरता, त्वचा निरोगी असणे अधिक महत्त्वाचे हे लक्षात घ्यायला हवे. आत्मविश्वासाचे तेज चेहऱ्यावर असले की सावळी छटा देखील खुलून दिसते !...

प्रसाधनांमध्ये वस्त्रेदेखील समाविष्ट असतात. भारतीय उष्ण हवामानात, सुती व हवा खेळती राहील अशी वस्त्रे आवश्यक होय. तंग व सिन्थेटिक कपड्यांमध्ये घामाचा निचरा होत नाही. शिवाय स्वउपचार करण्याच्या नादात, गजकर्णासारखे बुरशीजन्य त्वचारोग कमालीचे वाढलेले असून, त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

महिला व मानसिक आरोग्य/मन:शांती

महिलांच्या जीवनात मासिक पाळी, मातृत्व, रजोनिवृत्ती या साखळीमुळे हॉर्मोनल म्हणजेच अंत:स्त्रावी ग्रंथींचा प्रभाव खूप मोठा असतो. या प्रभावामुळे मानसिक व भावनिक आंदोलनांचा सामना महिलांना करावा लागतो. त्यात कुटुंबातील दुय्यम स्थान, नातेसंबंधातील तणाव, नोकरीच्या ठिकाणी होणारा लिंगभेद, संतती नियमनासाठी महिलांनाच गृहीत धरणे अशा विविध गोष्टींना सामोरे जाताना स्त्रीच्या मानसिक आरोग्याची एक प्रकारे कसोटी लागत असते. समाजात वावरताना, हिंसाचार, बलात्कार, एकतर्फी प्रेम अशा पुरुषी वासनाधीनतेची शिकार होण्याचे भय तिला बिलगून असते.

स्वयंसुरक्षा व मनोबल संवर्धन याकडे जाणीवपूर्वक महिलांनी लक्ष दिले पाहिजे. स्वतःच्या हक्काचा थोडा तरी वेळ स्वतःच्या आरोग्यासाठी राखून ठेवला पाहिजे. महिलांना खऱ्या अर्थाने आरोग्यसंपन्न करण्यासाठी पुरुषांनी सहजीवनातील आपला वाटा उचलला पाहिजे.

लोकराज्य या प्रकाशनाची मालकी व अन्य माहिती, यासाठी द्यावे लागणारे निवेदन
तक्ता – ४ नियम ८ वा

१) **प्रकाशन ठिकाण**	: माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२
२) **प्रकाशन काल**	: मासिक
३) **मुद्रकाचे नाव**	: अनिल आलूरकर
भारताचे नागरिक आहेत का?	: होय
४) **प्रकाशकाचे नाव**	: अनिल आलूरकर
भारताचे नागरिक आहेत का?	: होय
पत्ता	: माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – ३२
५) **संपादकाचे नाव**	: डॉ. दिलीप पांढरपट्टे
भारताचे नागरिक आहेत का?	: होय
पत्ता	: माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – ३२

मी अनिल आलूरकर असे जाहीर करतो की, माझ्या माहितीप्रमाणे वरील तपशील पूर्णपणे खरा आहे.

अनिल आलूरकर
मुद्रक व प्रकाशक

महिलेला पुरुषापेक्षा अधिक बंधने व जबाबदाऱ्यांची चादर अंगावर घेऊन स्वत:चे क्षितिज मोठे करायचे असते. असे करताना कुटुंबीयांची साथ मिळाली तर तिला यशोशिखरावर जाण्यापासून कुणीही रोखू शकत नाही. बुलडाण्यातील सर्वसामान्य कुटुंबातील अर्चना वानखेडे यांनी विवाहानंतर गलेलठ्ठ पगाराची नोकरी सोडून आयएएस होण्याचे स्वप्न पाहून ते पूर्ण केले. अर्थातच या यशापर्यंतचा त्यांचा प्रवास तेवढाच खडतर राहिला.

जिद्दीला यशाची किनार

यूपीएससी परीक्षा खरंतर एक दिव्यच आहे. मात्र या दिव्यापासून मी कोसो दूर होती. माझे मूळ गाव डोंगरशेवली (जि. बुलडाणा). वडील राज्य परिवहन मंडळात लिपिक या पदावर कार्यरत होते. त्यामुळे आम्ही बुलडाणा येथेच स्थायिक झालो. १२ पर्यंत शिक्षण येथेच झाले. पुढे चिखली येथील अनुराधा अभियांत्रिकी महाविद्यालयातून पदवी तर पुणे येथील विश्वकर्मा अभियांत्रिकी महाविद्यालयातून पदव्युत्तर पदवीचे शिक्षण पूर्ण केले.

टर्निंग पॉइंट

वडील लिपिक म्हणून नोकरीला लागले होते तरी ते मूळ शेतकरी होते. गावकडील थोड्याफार जमिनीवर आमचा सुरुवातीच्या काळात गुजारा झाला. शेतजमिनीमुळे गावाशी नाळ जुळलेली होती. त्यामुळे शेतकरी कुटुंब, मजूर कसे हलाखीच्या परिस्थितीत जीवन काढत असतात हे जवळून पाहिले होते. त्यांचे प्रश्न जवळून पाहिले होते. सर्वसामान्यांसाठी आपल्या हातून काहीतरी चांगले काम व्हावे अशी इच्छा मनात घर करून होती. आपल्या शिक्षणाचा गोरगरिबांना फायदा व्हावा असे वाटत होते. मात्र सुरुवातीच्या काही वर्षात या इच्छेला वाव नाही मिळाला. पुढे लग्न झाले. मुलगी झाली. मी मुंबईमध्ये सोमैय्या कॉलेजला सहायक प्राध्यापक म्हणून नोकरीला लागले. माझे पद स्थायी असल्याने व पती सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून कार्यरत असल्याने आर्थिक स्थैर्यता आली होती. मात्र आपला हा पिंड नसल्याचे नेहमी जाणवत होते. आपण सर्वसामान्य

अर्चना पंढरीनाथ वानखेडे
भा.प्र.से, २०१८

लोकांसाठी काहीही करू शकत नसल्याची अपराधीची भावना मनात निर्माण होत गेली आणि मी ठरवून टाकले की यूपीएससीच्या माध्यमातून प्रशासकीय सेवेत यायचे.

यशाला गवसणी

यूपीएससीची परीक्षा देण्याचे ठरवल्यानंतर अभ्यासाला लागले. २०११ मध्ये पहिला प्रयत्न दिला. मात्र, या प्रयत्नाच्या निकालानंतर खूप नाउमेद झाले. दरम्यान २०१३ ला मुलगी झाली. मुलगी दोन वर्षांची झाल्यानंतर २०१५ मध्ये पुन्हा जोमाने अभ्यासाला लागले. सुरुवातीला चौथ्या प्रयत्नापर्यंत पूर्व परीक्षाही पास होऊ शकले नाही. आपण तयारीसाठी १०० टक्के वेळ देऊ शकत नसल्याने तयारी कमी पडत असल्याचे लक्षात आले. त्यामुळे मुलीला सासरी मुंबईत ठेवून २०१७ मध्ये यशदामध्ये प्रवेश मिळवला. येथेच माझ्या तयारीला कलाटणी मिळाली. २०१७ च्या परीक्षेत ५व्या प्रयत्नात पूर्व, मुख्य व मुलाखतीचा टप्पा यशस्वी पार केल्यानंतर यशाने केवळ आठ गुणांनी हुलकावणी दिली. या परीक्षेत यश मिळणार अशी आशा होती. ६व्या प्रयत्नातील परीक्षेसाठी केवळ २०-२५ दिवस राहिले होते. अशा वेळी माझ्या भावाने मला मोठा आधार दिला. तोदेखील एसआयएसी संस्थेत स्पर्धा परीक्षेची तयारी करत आहे. २०१८ ला मी या संस्थेशी जोडली गेली. येथेही चांगले मार्गदर्शन मिळाले. पुण्यात असताना प्रवीण चव्हाण यांचेही मोलाचे मार्गदर्शन मिळाले. पुन्हा त्याच जोमाने तयारीला लागले आणि २०१८ च्या परीक्षेत आयएएस होण्याचे स्वप्न पूर्ण झाले. बुलडाणा जिल्ह्यातून पहिली महिला आयएएस होण्याचे समाधान मला मिळाले. बुलडाणा जिल्ह्यातून पहिली महिला आयएएस होण्याचा मान मला मिळाला.

कुटुंबाची साथ

वडील पंढरीनाथ व आई लक्ष्मी हे सदैव आमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. त्यांच्यामुळे आम्ही चौघे भावंडे अभियंते होऊ शकलो. वडिलांनी मुलगा-मुलगी असा भेद न करता कर्ज काढून आम्हाला शिकवले. आईने आमच्या अभ्यासाला सर्वोच्च प्राधान्य दिले. कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे तिने शिक्षक, लिपिक पदाची संधी सोडली. तर नर्स म्हणून नोकरी करण्याची संधी असताना तिने माझ्यासाठी त्या संधीवरही पाणी सोडले व गृहिणी म्हणून राहिली. सासू-सासरे व पतीचा खंबीर पाठिंबाही

यशाची सूत्रे

- एनसीईआरटीच्या पुस्तकांचे वाचन करून पाया पक्का करावा.
- जो विषय अभ्यास करायला घेत आहात त्या विषयाचा अभ्यास परीक्षेच्या प्रश्नपत्रिका लक्षात घेऊन करा. मुख्य परीक्षेसाठी हीच पद्धत वापरा. यामुळे तुम्हाला तो विषय कसा अभ्यासायचा याचे ज्ञान होईल व तयारीला दिशा मिळेल.
- अभ्यासाचे संदर्भ साहित्य मर्यादित ठेवा. या परीक्षेची व्याप्ती जरी मोठी असली तरी तयारीला आपल्याकडे वेळ खूप कमी असतो. प्रत्येक विषयाची तयारी करण्यासाठी आपण ढोबळ पुस्तके घेऊन बसलो तर नक्कीच वेळ पुरणार नाही. त्यामुळे वरिष्ठांचे मार्गदर्शन घ्यावे.
- चांगल्या गुणांनी यशस्वी झालेल्या उमेदवारांचे यूट्युबवरील व्हिडीओ पाहून आपली अभ्यासाची बुकलिस्ट आधी ठरवावी आणि त्याप्रमाणेच अभ्यास करायला हवा.
- केलेल्या अभ्यासाची उजळणी खूप आवश्यक आहे. त्यामुळे परीक्षेपूर्वी जोपर्यंत समाधान होत नाही तोपर्यंत उजळणी करायला हवी.
- आत्मविश्वास सदैव जागृत ठेवावा. कारण स्वत:वर विश्वास ठेवला तरच तुम्ही या परीक्षेची उत्तम तयारी करू शकाल.
- नेहमी सकारात्मक वातावरणात वावरा. नकारात्मक विचारांच्या लोकांपासून दूर राहत सकारात्मक विचारांच्या मित्र-मैत्रिणींची संख्या व सहवास वाढवा. स्पर्धा परीक्षेच्या तयारीदरम्यान आपण जेवढे सकारात्मक वातावरणात वावराल तेवढीच तुमची तयारी चांगली होईल व निराशेपासून दूर राहाल.
- त्याग करण्याची तयारी ठेवा. कारण त्यागाशिवाय कुठलेही मोठे यश मिळत नाही. जेवढे मोठे यश तुम्हाला मिळवायचे आहे तेवढीच त्यागाची तयारीही असायला हवी. त्यालाच जोडून येणारी बाब म्हणजे एखाद्या गोष्टीची भुरळ. यूपीएससीचा अभ्यास करत असताना तुम्हाला इतर सेवेत अथवा राज्य सेवेत एखादी नोकरी मिळून जाते. मात्र ही आपल्याला मोठ्या यशापासून दूर घेऊन जाणारी एक प्रकारची भुरळच असते. प्लॅन-बी म्हणून एखादी नोकरी हाताशी असे नैराश्य टाळण्यासाठी ठीक आहे. मात्र वेळप्रसंगी त्याचा त्याग करण्याची तयारी ठेवायला हवी.
- आपण ग्रामीण भागातील आहोत, इंग्रजी व्यवस्थित जमत नाही, आता माझे लग्न झाले आहे किंवा नोकरी करणे गरजेचे आहे या बाबी या परीक्षेच्या तयारीदरम्यान गौण ठरतात. तुम्ही ठरवले तर कितीही अडचणींवर मात करून यश मिळवू शकता. फक्त तुमच्या अंगी जिद्द हवी, परिश्रम घेण्याची व त्यागाची तयारी असेल तर यशाला गवसणी घालणे मुळीच अवघड नाही.
- ऑनलाइन माध्यमांचा तयारीदरम्यान प्रभावी वापर करा.
- कुठलीही तक्रार न करता, कारण न सांगता मला प्रामाणिकपणे परिश्रम करायचे आहे, असे खुणगाठ मनाशी बाळगा.

मिळाला. मुलगीही तेवढीच समजदार असल्याने मला भावनिक बळ मिळाले. तरी तिला भेटण्यासाठी अधूनमधून यायची. परीक्षेच्या शेवटच्या प्रयत्नांदरम्यान पती नोकरीनिमित्त विदेशात गेल्याने मुलीचा सांभाळ आईवडिलांनीच केला. तिच्या शाळेचीही काळजी घेतली. तिच्यासाठी त्यांनी शेतीही पडीक ठेवली. कुटुंबाच्या पाठिंब्याशिवाय हे यश मिळवणे मला तरी खूप कठीण गेले असते.

गटचर्चा

यशदामध्ये आमचा पाच-सहा जणांचा गट होता. आमची गट चर्चा व्हायची, नाष्टा, चहाच्या ब्रेकदरम्यान आम्ही अभ्यासलेल्या बाबींची चर्चा करायचो. सायंकाळी जेवल्यानंतर चालू घडामोडींवर चर्चा करायचो. अशा सकारात्मक वातावरणात आमचा एक मिनिटही वाया जात नव्हता. अनॲकॅडमी, स्टडी आयक्यू आदी ऑनलाइन प्लॅटफॉर्मचा वापरही मी केला. जेव्हा रटाळ वाटायचे तेव्हा राज्यसभा टीव्हीवरील चर्चा, एखाद्या टॉपिकसंबंधीचा युट्युबवरील व्हिडिओ पाहून तयारीत नावीन्यपूर्णता ठेवली व वेळेचा अपव्यय टाळला.

मुलाखत

परीक्षेचा अर्ज (डिटेल ॲप्लिकेशन फॉर्म) भरताना त्यात उल्लेख असलेल्या बाबींशी निगडीत जसे की जन्मस्थळ, त्या स्थळाचा इतिहास, भौगोलिक स्थिती, तेथील प्रश्न आदींबाबतचे प्रश्न मुलाखतीत विचारले जातात. त्यासोबतच ज्वलंत प्रश्न, चालू घडामोडींचा प्रसंगपरत्वे त्यात समावेश होऊ शकतो.

यशदा, एसआयएसी व महाराष्ट्र सदन येथे झालेल्या परिसर मुलाखतींचा मला चांगला फायदा झाला.

आदर्श

विल स्मिथ यांच्या 'आय वॉण्ट टू रिप्रेझेन्ट पॉसिब्लिटीज' या वाक्याचाही माझ्यावर प्रभाव राहिला आहे. एखादी अशक्य वाटणारी गोष्ट आपण केली तर इतरांसाठी एक नवा आदर्श निर्माण होतो याची मला जाणीव होती. त्यामुळे जेव्हा अनेक अडचणी समोर असल्या तरी मला अडचणींवर मात करून एक माइलस्टोन तयार करायचा होता. त्यासाठी परिश्रम घेण्याची तयारी ठेवली आणि यश मिळवले. त्यामुळे कुठल्याही श्रेत्रात आपण शक्यतांचा विचार करून पुढे गेल्यास मोठे यश मिळवता येते, असे मला वाटते.

शब्दांकन : राजाराम देवकर

शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक परिवर्तन घडवण्यासाठी शासनाने सर्वोच्च प्राथमिकता दिली आहे. या परिवर्तन प्रक्रियेत 'सहकार आणि पणन' विभाग महत्त्वाची भूमिका बजावण्यासाठी सज्ज झाला आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफी ते कर्जमुक्तीपर्यंतचा सुखद अनुभव देण्यासाठी शासनाने सहज-सुलभ आणि किमान कागदपत्रांची गरज असलेली कार्यपद्धती स्वीकारली आहे.

शेतकरी हितासाठी

बाळासाहेब पाटील
मंत्री, सहकार व पणन

राज्य आर्थिकदृष्ट्या सक्षम करायचे असेल तर शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक परिवर्तन होणे आवश्यक आहे. सहकार आणि पणन विभाग हा थेट शेतकऱ्यांशी निगडित असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक सक्षम करण्यासाठी शासन प्रयत्न करत आहे. गेल्या चार वर्षांपासून शेतकरी कर्जाच्या दुष्टचक्रात अडकलेला आहे. म्हणून शेतकऱ्यांना प्रत्यक्ष कर्जमुक्त करणारी सहज, सोपी आणि पारदर्शक अशी महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना शासनाने जाहीर करून त्यांच्या याद्या प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली आहे.

कर्जमुक्ती

शेतकऱ्यांचे अवलंबित्व शेतीवर असल्याने त्यांना शेतीसाठी जिल्हा मध्यवर्ती बँक, सहकारी बँक किंवा व्यापारी बँकेकडून कर्ज घ्यावे लागते. शेतकऱ्यांना कर्जमुक्त करून चिंतामुक्त करण्यासाठी महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली. या योजनेत प्रत्येक शेतकऱ्याचे दोन लाखांपर्यंतचे पीक कर्ज आणि अल्पमुदत पीक पुनर्गठित कर्ज माफ होणार आहे. ही कर्जमुक्ती योजना सहज, सोपी आणि पारदर्शक असून शेतकऱ्यांना कोणताही त्रास होऊ नये, याची काळजी घेतली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना अर्ज करण्याची आवश्यकता नाही आणि थकबाकीसुद्धा भरण्याची अट नाही.

पुनर्गठित कर्ज

या योजनेत १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१९ या कालावधीत घेतलेले व ३० सप्टेंबर २०१९ रोजी थकीत असलेले अल्पमुदत पीक कर्ज आणि अल्पमुदत पीक पुनर्गठित कर्ज माफ करण्यात येणार आहे. राष्ट्रीयकृत बँका, व्यापारी बँका, जिल्हा मध्यवर्ती, सहकारी बँका, ग्रामीण बँका, विविध कार्यकारी सहकारी संस्था यांच्याकडून शेतकऱ्यांनी घेतलेले पीक कर्ज माफ करण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकरी खरीप २०२० या हंगामात कर्ज घेण्यासाठी पात्र होतील.

बँकांनी संगणकीय पोर्टलवर कर्जखात्याची माहिती अपलोड करण्यास सुरुवात केली आहे. ही शेतकऱ्यांची यादी गावनिहाय प्रत्येक गावात ग्रामपंचायतीला प्रसिद्ध करण्यात येईल. प्रसिद्ध झालेल्या यादीमधील समाविष्ट असलेल्या शेतकऱ्यांनी नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्र किंवा बँकेच्या शाखेत जाऊन आपले आधार प्रमाणीकरण करणे अपेक्षित आहे. जे शेतकरी प्रमाणीकरण करताना त्यांचा आधार क्रमांक व कर्जखात्याची रक्कम मान्य करतील अशा शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ त्वरित मिळेल. आणि ज्या शेतकऱ्यांना त्यांच्या आधार क्रमांक किंवा कर्जखात्याची रक्कम मान्य नसेल अशा शेतकऱ्यांनी पोर्टलद्वारे थेट जिल्हास्तरीय समितीकडे तक्रार

पणन विभागाचे बळकटीकरण

पणन विभाग हा थेट शेतकऱ्यांशी निगडित आहे. शेतकऱ्यांना शेतीमालाच्या विक्रीकरिता आवश्यक त्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे, शेतीमालास योग्य भाव मिळवून देणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे. कृषी उत्पन्न बाजार समित्यांना गोदामे, रस्ते, लिलावगृह, शीतगृह, लिलाव ओटे याकरिता अनुदान देणे ही पणन विभागाची प्रमुख कार्ये आहेत. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या कृषी मालाला योग्य किंमत मिळवून देण्यासाठी, जागतिक स्तरावर स्पर्धात्मक पायाभूत सुविधांनी सुसज्ज असे संघटित विपणन जाळे विकसित करणे हे या विभागाचे कार्य आहे. शेतकरी ज्या वेळी शेतमाल घेऊन कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये येतो, तेव्हा मार्केट कमिटी शेतकऱ्यांच्या शेतमालाल योग्य भाव उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांना विश्वास देण्याचे काम करत असते त्यामुळे शेतकऱ्यांना एक आधार आणि विश्वास या ठिकाणी मिळत असतो.

बाळासाहेब पाटील

अशा प्रकारे ग्रामीण विकासाला चालना देत शेतकरी हा केंद्रबिंदू ठेवून जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी अधिक समृद्ध झाला पाहिजे. शेतकरी बांधव आर्थिक सक्षम व्हावा हीच माझी प्रमुख भूमिका आहे.

साखर कारखान्यांच्या अडचणी

राज्यात सहकारी कारखानदारीमुळे त्या त्या भागाचा काही प्रमाणात विकास, स्थानिकांना रोजगार निर्मिती आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक परिवर्तन होण्यास मदत झाली. साखर कारखाने आणि ऊस उत्पादक शेतकरी हे एक चक्र आहे. ऊसाचे प्रमाण कधी कमी तर कधी जास्त असे होत असते. नैसर्गिक संकटे येत असतात. गेल्या वर्षी पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली. सांगली, कोल्हापूर येथील क्षेत्र बाधित झाले. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अशा वेळी साखर कारखाने आणि शेतकरी अडचणीत येतात अडचणीत असलेले साखर कारखाने असोत वा शेतकरी यांना मदत करणे गरजेचे असते. अशा वेळी शेतकऱ्यांना थकीत कर्ज वेळेत भरता आले नाही तर शेतकरी अडचणीत येतो.

नोंदवावी. जिल्हास्तरीय समिती याबाबतचा निर्णय शेतकऱ्यांना कळवेल.

यांना लाभ नाही

आजी/माजी मंत्री, राज्यमंत्री, लोकसभा/राज्यसभा सदस्य, विधानसभा/विधान परिषद सदस्य, केंद्र व राज्य शासनाचे सर्व अधिकारी/ कर्मचारी (एकत्रित मासिक वेतन रुपये २५००० पेक्षा जास्त असणारे मात्र चतुर्थ श्रेणी कर्मचारी वगळून) राज्य सार्वजनिक उपक्रम (उदा. महावितरण, एसटी महामंडळ इ.) व अनुदानित संस्था यांचे अधिकारी व कर्मचारी, निवृत्ती वेतनधारक, कृषी उत्पन्न बाजार समिती, सहकारी साखर कारखाना, सहकारी सूतगिरणी, नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व सहकारी दूध संघ यांचे अधिकारी व पदाधिकारी (अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालक मंडळ) ज्यांचे मासिक निवृत्तिवेतन रुपये २५००० पेक्षा जास्त आहे (माजी सैनिक वगळून) शेतीबाह्य उत्पन्नातून आयकर भरणाऱ्या व्यक्ती यांना याचा लाभ मिळणार नाही.

कापसासाठी १८०० कोटींची हमी

कापूस पणन महासंघास आवश्यक असलेल्या १८०० कोटी रुपयांच्या शासन हमीस मान्यता देण्यात आली. महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाकडून २०१९-२० मध्ये किमान हमी भावाने खरेदी करण्यात येणाऱ्या कापसाचे चुकारे शेतकऱ्यांना वेळेत देण्यासाठी कापूस पणन महासंघाने बँक ऑफ इंडियाकडून ७.७५ टक्के या व्याजदराने घेत असलेल्या १८०० कोटीच्या कर्जास शासनाने हमी दिली आहे. या शासन हमीवर महासंघास द्यावे लागणारे हमी शुल्क देखील माफ करण्यात आले आहे. हंगाम १९-२० मध्ये कापूस पणन महासंघातर्फे कापूस खरेदीला सुरुवात झाली आहे. सध्या दररोज अंदाजे ६० ते ८० हजार क्विंटल कापूस खरेदी होत आहे. महासंघाद्वारे या हंगामात ३० ते ३५ लाख क्विंटल कापूस खरेदी अपेक्षित आहे. यासाठी १८०० कोटी रुपये लागणार होते. शेतकऱ्यांना त्रास होऊ नये त्यांना वेळेत पैसे मिळावे म्हणून हा निर्णय घेतला आहे.

शेतकऱ्यांनी काय करावे

ज्या शेतकऱ्यांची नावे या यादीत आहेत, त्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी आपला आधार क्रमांक बँक खात्याशी सलंग्न करून घ्यावा. या योजनेचा लाभ फक्त गरजू शेतकऱ्यांना मिळणे अपेक्षित आहे. म्हणून जे शेतकरी पात्र आहेत त्यांनी आधार क्रमांक बँक खात्याला संलग्न करावा. ही पूर्ण प्रक्रिया ऑनलाइन केल्यामुळे शेतकऱ्यांना त्रास होणार नाही. बँकेत चकरा माराव्या लागणार नाही. या कर्जमुक्तीमुळे शेतकरी बांधवांच्या डोक्यावर असलेल्या कर्जाचा भार कमी होऊन ते पुन्हा कर्जास पात्र होतील आणि त्यांना मोठा आधार मिळेल.

सहकार क्षेत्राला प्रोत्साहन

राज्याच्या विकासात सहकार क्षेत्राचे मोठे योगदान आहे. ग्रामीण भागातील अर्थवाहिनी म्हणून सहकार क्षेत्राकडे पाहिले जाते. सहकारच्या माध्यमातून, विकास सोसायटी, विविध कार्यकारी सोसायटी, बँका. पतसंस्था, साखरकारखाने अशा सहकारी संस्थाची निर्मिती झाली. शेतकऱ्यांना अडचणीच्या वेळी आर्थिक मदत म्हणून या संस्था कार्य करत असतात. त्यामुळे काही प्रमाणात सावकारी नष्ट होण्यासही मदत झाली. या क्षेत्राला अधिक प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.

कृषी प्रक्रिया उद्योग

भारतामध्ये राज्यनिहाय पीकविविधता असल्याने कृषी प्रक्रिया उद्योगासाठी कच्च्या मालाची उपलब्धता सहज होऊ शकते. त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतीमालावर प्रक्रिया उद्योग याकडे लक्ष दिले पाहिजे. ऊस उत्पादक शेतकरी साखर कारखान्याला ऊस देतात आणि कारखान्याचे मूळ तत्त्वही गळीत करून साखर तयार करणे असले तरी आज इथेनॉलची मोठ्या प्रमाणात गरज आहे. त्याला प्रोत्साहन दिले पाहिजे. यासाठी केंद्र शासनाने पुढाकार घेतला आहे. अनेक ठिकाणी प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. पण त्याचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे साखर कारखान्यांनी इथेनॉल निर्मितीकडे लक्ष देणे गरजेचे आहे. काही भागात सेंद्रिय गूळ प्रकल्प तयार करणे, सेंद्रिय ऊस तयार करणे असे उद्योग सुरू आहेत, अशा कृषी प्रक्रिया उद्योगाकडे शेतकऱ्यांनी अधिक लक्ष देणे गरजेचे आहे.

शब्दांकन : काशीबाई थोरात,
विभागीय संपर्क अधिकारी

राज्याच्या हिताच्या अनेक योजनांना मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता दिली जाते, अशा काही निर्णयांचा आढावा..

मंत्रिमंडळात ठरले !

महाराष्ट्राचा हीरकमहोत्सव

महाराष्ट्र राज्याचे हीरकमहोत्सवी वर्ष राज्य शासनामार्फत साजरे करण्याचा निर्णय घेण्यात आला. यानिमित्त वर्षभर विविध कार्यक्रमांच्या आयोजनाबाबत चर्चा करण्यात येऊन १ मे, २०२० पासून राज्यभरात कार्यक्रमांना सुरुवात करण्यास मंजुरी देण्यात आली.

राज्याच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये महाराष्ट्र राज्याच्या हीरकमहोत्सवी वर्षानिमित्त 'हीरकमहोत्सवी महाराष्ट्र' या विषयावर सादरीकरण करण्यात आले. यामध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळ, मराठी नाटक, मराठी चित्रपट, लोककला, गड किल्ल्यांवरील वीररसयुक्त कार्यक्रम, छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन चरित्रावरील कार्यक्रम, समाज सुधारकांचा महाराष्ट्र, राष्ट्रामधील महाराष्ट्र, विश्वातील महाराष्ट्र, महाराष्ट्राची संत परंपरा, शास्त्रीय संगीत महोत्सव, आदिवासी संस्कृती महोत्सव, क्लिक महाराष्ट्र, कृषी संस्कृती, लोकवाद्य महोत्सव, लोककलाकारांचा मेळावा, कव्वाली महोत्सव, दुर्गा महोत्सव, शंभर वर्षाचा मराठी चित्रपट प्रवास इत्यादी विविध सर्वसमावेशक सांस्कृतिक कार्यक्रम विविध जिल्ह्यांत आयोजित करण्यात येणार आहेत.

त्याचप्रमाणे संयुक्त महाराष्ट्र चळवळीची महती विषद करणारे कार्यक्रम, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील हुतात्म्यांची तसेच राज्यातील ऐतिहासिक, सामाजिक, भौगोलिक व सांस्कृतिक वैशिष्ट्यांची परिपूर्ण माहिती देणारी सचित्र पुस्तिका (कॉफीटेबल बुक) प्रकाशित करणे, परदेशस्थ महाराष्ट्रीयांचा सहभाग असणाऱ्या कार्यक्रमांचे आयोजन, महाराष्ट्राच्या गौरवशाली परंपरेची उकल करणाऱ्या सर्वंकष माहितीपटाची निर्मिती, राज्याच्या विविधांगी प्रगतीचे, संस्कृतीचे चित्रण करणाऱ्या जाहिरातींची निर्मिती करून विविध राज्यात त्या प्रदर्शित करणे, हीरक महोत्सवी महाराष्ट्र या संकल्पनेवर आधारित दर्जेदार दृकश्राव्य आशय गीताची (थीम साँग) निर्मिती करणे अशा विविधांगी कार्यक्रमांचे आयोजन यानिमित्ताने करण्यात येणार आहे, असा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

त्याचप्रमाणे प्रत्येक प्रशासकीय विभागाने हीरकमहोत्सवी महाराष्ट्र या संकल्पनेवर आधारित किमान एक योजना किंवा उपक्रम तयार करून हीरकमहोत्सवी वर्षात त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देशही बैठकीत देण्यात आले.

सांडपाण्यावर प्रक्रिया

राज्याच्या नागरी भागात निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या पहिल्या टप्प्यातील सांडपाणी प्रक्रिया प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

राज्यातील ३९१ स्थानिक स्वराज्य संस्थांमधून ९७५८.५३ एमएलडी सांडपाणी निर्माण होते. या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी निर्माण झालेली क्षमता ७७४७.२४ एमएलडी इतकी असून नव्याने निर्माण करावयाची प्रक्रिया क्षमता २०११.९१ इतकी आहे. सांडपाणी प्रक्रिया क्षमतेचे प्रमाण हे जवळपास ७९ टक्के इतके समाधानकारक आहे. असे असले तरी राष्ट्रीय हरीत लवादाने दिलेल्या निदेशानुसार सांडपाण्यासाठी आवश्यक असलेली ही २०११ एमएलडी मलप्रक्रिया क्षमता उभारणे बंधनकारक आहे.

यानुसार राज्यातील महानगपालिका व नगरपरिषद क्षेत्रामध्ये टप्पा-१ मध्ये कमतरता असलेली मलप्रक्रिया क्षमता निर्माण करण्यासाठी आवश्यक रूपये २८२० कोटी इतका निधी केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान-दोन किंवा राज्य शासन पुरस्कृत महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानातून उभारण्यात येणार आहे.

कंपनी एकत्रीकरण दस्त

कंपनी एकत्रीकरण किंवा पुनर्रचनेसंबंधीच्या दस्तांसाठी आकारण्यात येणाऱ्या मुद्रांकशुल्कावर विहित केलेली कमाल मर्यादा २५ कोटींवरून ५० कोटीपर्यंत वाढवण्यात आली.

कंपनी एकत्रीकरण किंवा पुनर्रचनेसंबंधीच्या दस्तांवर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या अनुसूची-१ च्या अनुच्छेद २५(वर) खाली देय असलेल्या मुद्रांक शुल्कावर ०६ मे, २००२ रोजीच्या आदेशांन्वये विहित केलेली कमाल मर्यादा २५ कोटी रुपयांवरून ५० कोटी रुपयांपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

पाच दिवसांचा आठवडा

राज्यातील शासकीय कार्यालयांसाठी पाच दिवसांचा आठवडा लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. आता केंद्राप्रमाणे राज्यातील शासकीय कार्यालयांना प्रत्येक महिन्यातील सर्व शनिवारी व रविवारी सुट्टी राहील. यासोबतच दररोज ४५ मिनिटांचे वाढीव काम अधिकारी व कर्मचाऱ्यांना करावे लागेल. या निर्णयाची अंमलबजावणी २९ फेब्रुवारीपासून होईल.

सर्व कार्यालयांसाठी एकच वेळ

सध्या बृहन्मुंबईतील कार्यालयांची कामकाजाची वेळ सकाळी ९.४५ ते सायं. ५.३० अशी आहे. ती आता ९.४५ ते सायं.६.१५ अशी होईल. शिपायांसाठी कामकाजाची वेळ सकाळी ९.३० ते सायं.६.३० अशी राहील. बृहन्मुंबई बाहेरील शासकीय कार्यालयांसाठी देखील ही वेळ ९.४५ ते सायं.६.१५ अशी राहील. बृहन्मुंबई बाहेरील शासकीय कार्यालयांसाठी सकाळी १०.०० ते सायं. ५.४५ अशी कामाची वेळ सध्या आहे. मात्र आता पाच दिवसाचा आठवडा केल्यामुळे मुंबई आणि मुंबई बाहेरील सर्व कार्यालयांना एकच वेळ निश्चित करण्यात आली आहे. सध्याच्या या कार्यालयीन वेळेमध्ये दुपारी १ ते २ या वेळेमधील जास्तीत जास्त अर्ध्या तासाची भोजनाची वेळ देखील अंतर्भूत आहे.

यांना लागू नाही

ज्या शासकीय कार्यालयांना कारखाना अधिनियम किंवा औद्योगिक विवाद लागू आहे किंवा ज्यांच्या सेवा अत्यावश्यक म्हणून समजल्या जातात अशा कार्यालयांना व शासकीय महाविद्यालये, तंत्रनिकेतने, शाळा, पोलीस दल, अग्निशमन दल, सफाई कामगार यांना पाच दिवसाचा आठवडा लागू नाही.

ज्या कार्यालयांना पाच दिवसाचा आठवडा लागू नाही त्यांची नावे पुढील प्रमाणे-

अत्यावश्यक सेवा : शासकीय रुग्णालये, चिकित्सालये, पोलीस, कारागृहे, पाणीपुरवठा प्रकल्प, अग्निमशन दल, सफाई कामगार. **शैक्षणिक संस्था :** शासकीय महाविद्यालये, वैद्यकीय महाविद्यालये, शाळा, तंत्रनिकेतने. **जलसंपदा विभाग :** दापोडी, सातारा, वर्धा, अकोला, अहमदनगर, अष्टी, खडकवासला, नाशिक व नांदेड येथील कर्मशाळा. नागपूर, भंडारा येथील मध्यवर्ती कर्मशाळा तसेच जलसंपदा व सार्वजनिक विभागांतर्गत क्षेत्रिय कामावरील व प्रकल्पांवरील नियमित आस्थापना, स्थायी व अस्थायी आस्थापना व रोजंदारीवरील क्षेत्रीय कामगार व कर्मचारी. **सार्वजनिक आरोग्य विभाग :** व्हॅक्सिन इन्स्टिट्युट नागपूर. **महसूल व वन विभाग :** बल्लारशा, परतवाडा व डहाणू येथील एकात्मिकृत घटके, अलापल्ली येथील सॉ मिल, विभागीय वन अधिकारी यांच्या नियंत्रणाखालील परतवाडा व बल्लारशा येथील वर्कशॉप, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालये, पुणे. **सामान्य प्रशासन विभाग :** शासकीय परिवहन सेवेचा कारखाना विभाग. **कृषी विभाग :** दुग्धशाळा विकास विभागांतर्गत दुग्ध योजना. **उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग :** शासकीय मुद्रणालये. **कौशल्य व उद्योजकता विकास :** सर्व आयटीआय.

केंद्र शासनाप्रमाणे राजस्थान, बिहार, पंजाब, दिल्ली, तामिळनाडू, पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये पाच दिवसांचा आठवडा लागू आहे. सध्या दुसरा व चौथा शनिवार कार्यालयीन सुट्टी असते. पाच दिवसाच्या आठवड्याच्या प्रस्तावामुळे शासकीय कार्यालयातील वीज, पाणी, वाहनांचे डिझेल, पेट्रोल या खर्चामध्ये बचत होणार आहे. तसेच शासकीय कर्मचाऱ्यांना कुटुंबाना वेळ देणे शक्य होऊन त्यांच्या जीवनमानाचा स्तर उंचावेल.

प्रतिवर्ष कामाचे तास वाढणार

सध्याच्या कार्यालयीन वेळेमुळे वर्षातील सरासरी कार्यालयीन दिवस २८८ होतात. भोजनाचा ३० मिनिटांचा कालावधी वगळून प्रतिदिन ७ तास १५ मिनिटे प्रतिदिन कामाचे तास होतात. यामुळे एका महिन्यातील कामाचे तास १७४ तर एका वर्षातील कामाचे तास २०८८ इतके होतात.

पाच दिवसाच्या आठवड्यामुळे वर्षातील सरासरी कार्यालयीन दिवस २६४ होतील. मात्र, कामाचे ८ तास होतील. परिणामत: एका महिन्यातील कामाचे तास १७६ तर वर्षातील कामाचे तास २११२ इतके होतील. म्हणजेच प्रतिदिन ४५ मिनिटे, प्रतिमहिना २ तास आणि प्रतिवर्ष २४ तास इतके कामाचे तास वाढतील.

बालकांच्या कल्याणासाठी न्याय निधी

बालसंस्थांमधील मुलांचे कल्याण आणि पुनर्वसन करण्याकरिता राज्य बाल निधी निर्माण करण्यास व त्यासाठी दोन कोटी रुपयांची तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ च्या कलम १०५ अन्वये, राज्य शासन बाल न्याय अधिनियमांतर्गत बालकांचे कल्याण व पुनर्वसनाकरिता राज्यास योग्य वाटेल अशा नावाने निधी निर्माण करण्याबाबत तरतूद आहे. तसेच महाराष्ट्र राज्य बाल न्याय नियम, २०१८ मधील नियम ८५ अन्वये राज्य शासन 'राज्य बाल निधी' नावाचा निधी निर्माण करील अशी तरतूद आहे. या तरतुदीचा विनियोग बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ मधील बालकांच्या कल्याणासाठी विविध प्रयोजनांसाठी करण्यात येईल.

सध्या ५६० पेक्षा जास्त बालगृहांमध्ये २१ हजार १७८ मुले राहतात. या बालकांना मोठ्या आजाराकरिता वैद्यकीय साहाय्य, कौशल्य विकास प्रशिक्षण किंवा व्यवसाय प्रशिक्षण तसेच उच्च शिक्षणासाठी साहाय्य करणे शक्य होणार आहे.

इतर मागासवर्ग विभागाचे नाव आता बहुजन कल्याण विभाग

इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागासप्रवर्ग, विमुक्त जाती,

निरा उजवा व डावा कालव्यातील पाण्याचे समन्यायी वाटप

निरा देवघर व गुंजवणी धरणाचे कालवे कार्यान्वित नसल्यामुळे विनावापर राहणारे पाणी समन्यायी तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात निरा उजवा आणि डावा कालवा येथील लाभक्षेत्रास वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला. याचा फायदा दोन्ही कालव्यांच्या क्षेत्रात झालेले नागरीकरण, औद्योगीकरण, कृषिपूरक उद्योग, साखर कारखाने, फळबागांना होईल. या निर्णयाची अधिक माहिती पुढील प्रमाणे- निरा देवघर धरणाचे काम २००७ मध्ये पूर्ण असून ११.७३ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा निर्माण झालेला आहे व गुंजवणी धरणात २०१८ पासून ३.६९ टीएमसी पाणीसाठा निर्मित झालेला होता. या दोन्ही प्रकल्पांच्या कालव्याची कामे अपूर्ण असल्याने त्यांच्या नियोजित लाभक्षेत्रात पाणी वापर होऊ शकत नाही, ही बाब विचारात घेऊन या पाण्याचा वापर होण्याच्या दृष्टीने या दोन्ही धरणात उपलब्ध होणारे मूळ प्रकल्पाची गरज भागल्यावर शिल्लक राहणारे पाणी निरा डावा कालवा व निरा उजवा कालवा यात समन्यायी तत्वावर वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला. हे वाटप निरा डावा कालवा ५५ टक्के व निरा उजवा कालवा ४५ टक्के असे राहील.

या निर्णयामुळे दोन्ही कालव्यांच्या लाभक्षेत्रामध्ये समन्यायी तत्त्वावर २४२७ हेक्टर/टीएमसी या प्रमाणात पाणी सिंचनासाठी उपलब्ध होईल. निरा डावा कालव्याच्या लाभक्षेत्रातील पुरंदर व बारामती, इंदापूर तालुक्यातील ३७०७० हे. लाभक्षेत्राला व निरा उजव्या कालव्याच्या खंडाळा, फलटण, माळशिरस, पंढरपूर सांगोला तालुक्यांच्या ६५५०६ हे. लाभक्षेत्राला फायदा होईल.

भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग या विभागाचे नाव आता बहुजन कल्याण विभाग असे करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

विभागाचे सध्याचे नाव खूप मोठे व विस्तृत स्वरूपाचे आहे. या विभागाकडे सोपवण्यात आलेल्या योजना व विभागाने नव्याने सुरू केलेल्या योजना तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून या विभागाकडे हस्तांतरित केलेल्या योजनांचे स्वरूप पाहता विभागाचे नाव संक्षिप्त असावे यावर एकमत झाले.

शालेय विद्यार्थ्यांना मोफत चष्मे

सर्व शासकीय व अनुदानित शाळांमधील ६ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांमधील दृष्टिदोष निवारण्यासाठी त्यांना मोफत चष्मे पुरवण्यासाठी मान्यता देण्यात आली. या योजनेसाठी सुमारे २० कोटी रुपये अनावर्ती व ५ कोटी रुपये आवर्ती खर्च अपेक्षित आहे.

सध्या केंद्र शासनाच्या राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत शालेय मुलांची वर्षातून एकदा आरोग्य तपासणी करण्यात येते. या वर्षात ११९५ वैद्यकीय पथके यासाठी कार्यरत असून त्यांच्या तपासण्यात दृष्टिदोषाचे प्रमाण वाढलेले आढळले आहे. शाळांमध्ये १ कोटी २१ लाख ६७ हजार ५८५ इतकी मुले शिकत असून दृष्टिदोषाचे प्रमाण ८ टक्के इतके आहे. या मुलांना चष्मे उपलब्ध करून दिल्यास एकूणच त्यांच्या शैक्षणिक प्रगतीत सुधारणा होईल.

सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे दृष्टीदोष असलेल्या मुलांना निश्चित करण्यात आलेल्या पुरवठादाराकडून त्याच्या घरी अथवा शाळेत मोफत चष्मा पोहोचवण्यात येईल.

शेतकरी कर्जमुक्ती योजना

महात्मा जोतिबा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या अंमलबजावणीकरिता १० हजार कोटी इतका निधी आकस्मिकता निधी अग्रिमाद्वारे उपलब्ध करून देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या संदर्भातील अध्यादेश विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने तसेच राज्यपालांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येईल.

सध्या आकस्मिकता निधीची मर्यादा १५० कोटी इतकी आहे. या मर्यादेत १० हजार कोटींची तात्पुरती वाढ करून ती आता १०,१५० कोटी इतकी करण्यात येईल.

शासनाने २२ फेब्रुवारी २०२० पासून ही योजना कार्यान्वित करण्यात ठरवले आहे. ५ मार्चपर्यंत या योजनेसाठी १० हजार कोटींची आवश्यकता असल्याने आकस्मिकता निधी अग्रिम घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

नगरपरिषद संचालनालय

नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे आकृतीबंध सुधारित करून बळकटीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला. यानुसार संचालनालयाच्या २७४ पदांच्या प्रचलित आकृतीबंधातील १३८ पदे निरसित करून ५५० पदांच्या सुधारित आकृतीबंधास मान्यता देण्यात आली. यानुसार १०८ पदे मुख्यालय स्तरावर, ११७ पदे विभागीय स्तरावर आणि ३२५ पदे जिल्हास्तरावर असतील. सहआयुक्त व उपायुक्त या वरिष्ठ पदावर संचालनालय व मुख्याधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यात येईल.

फेब्रुवारी २०२० मधील महत्त्वाच्या घडामोडींचा आढावा..

'म्हाडा'तर्फे पाच लाख घरांची निर्मिती

येत्या तीन वर्षात म्हाडातर्फे पाच लाख घरांची निर्मिती करण्यात येणार आहे. त्यापैकी ५० हजार घरे पोलीस कर्मचाऱ्यांना व ५० हजार घरे चतुर्थश्रेणी शासकीय कर्मचाऱ्यांना उपलब्ध होतील, अशी माहिती गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी दिली.

ठाणे महानगरपालिका हद्दीमध्ये म्हाडा, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व राज्यशासनाच्या जमिनीबाबत आढावा तसेच ठाणे येथील शासकीय जमिनीवर महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणामार्फत सर्वसमावेशक प्रकल्प राबवण्यासंदर्भात झालेल्या बैठकीत मंत्री श्री.आव्हाड यांनी ही माहिती दिली.

शासनाकडे सध्या दहा हजार गृहसाठा उपलब्ध झालेला आहे. त्यापैकी दहा टक्के घरे पोलीस कर्मचाऱ्यांना व दहा टक्के घरे चतुर्थश्रेणी शासकीय कर्मचाऱ्यांना देण्याचा निर्णय झाला आहे. पुढच्या दोन महिन्यांमध्ये लॉटरी निघून एकूण १० हजार घरांपैकी एक हजार घरे पोलीस कर्मचाऱ्यांना तर एक हजार घरे चतुर्थश्रेणी शासकीय कर्मचाऱ्यांना उपलब्ध होणार आहेत. तसेच गरिबांसाठी परवडणारी घरे ही सरकारसाठी वेगळी आणि विकासकासाठी वेगळी अशी न बांधता एकत्रितच घरे बांधण्यात येतील व त्यांची एकत्रित लॉटरी काढण्यात येईल.

ठाण्यातील वर्तक नगर भागात 'म्हाडा'च्या दर्शनी भागातील इमारतींचाच पुनर्विकास झाला. समान न्याय या तत्त्वानुसार म्हाडाच्या इमारतींचा पुनर्विकास करताना संपूर्ण लेआऊटचा एकत्रित पुनर्विकास करण्यात येईल. याच तत्त्वानुसार कन्नमवार नगर, टागोर नगरांचा विकास करण्यात येईल. कळवा येथे ७२ एकर, उत्तर शिव व मोघरपाडा येथे सुमारे १०० एकर जागेवर नवीन गृह प्रकल्प उभारण्यात येणार असल्याची माहिती श्री.आव्हाड यांनी दिली.

नवीन ऊर्जा धोरण

राज्यातील कृषी वीज ग्राहकांच्या थकबाकीसंदर्भात व उद्योजकता वाढीसाठी नवीन ऊर्जा धोरण तयार करण्यात येईल, अशी माहिती ऊर्जामंत्री डॉ.नितीन राऊत यांनी दिली. शेतकरी वर्ग हा महत्त्वाचा घटक असून त्याच्या हितरक्षणार्थ ऊर्जा विभागाला कार्य करावयाचे आहे. त्याच्याकडे असलेली थकबाकी कमीत कमी होण्यासाठी निश्चित असे धोरण तयार करावे असे निर्देश विभागाला देण्यात आले आहेत.

ग्रामस्तरावर असलेल्या ऊर्जामित्रांमार्फत विजेची देयके थेट शेतकऱ्यांच्या हाती देण्यात येतील. त्याच्याकडे असलेल्या थकबाकीबाबत व त्यास मिळणाऱ्या सवलती संदर्भात ऊर्जा मित्र शेतकऱ्यांशी चर्चा करेल. अशा प्रकारचे मुद्दे या धोरणात असतील. राज्यातील उद्योजकांना मिळणारी वीज व त्यावरील दर यासंदर्भात

मेट्रो – ३ च्या भुयारीकरणाचा २५वा टप्पा पूर्ण

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो मार्ग ३ च्या भुयारीकरणाचा २५वा टप्पा वरळी येथे पर्यटन आणि पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. एकूण सात पॅकेज असलेल्या या मार्गातील पॅकेज-३ चा हा भुयारीकरणाचा पहिलाच टप्पा होता. मेट्रो -३ मार्गिकेतील पॅकेज-३ हे सर्वात लांब पॅकेज असून या अंतर्गत मुंबई सेंट्रल, महालक्ष्मी, सायन्स म्युझियम, आचार्य अत्रे चौक व वरळी या स्थानकांचा समावेश आहे.

पॅकेज-३ चे टनेल बोअरिंग मशीन 'तानसा-१' सायन्स म्युझियमच्या उत्तर दिशेपासून २७ सप्टेंबर २०१८ रोजी कार्यान्वित झाले. अनेक भौगोलिक आव्हानांना सामोरे जाऊन अप लाईन बोगद्याचे २ हजार ७३ मीटर भुयारीकरण पूर्ण केले आहे. या भुयारीकरणासाठी १ हजार ३८१ सेगमेंट रिंगसचा वापर करण्यात आला आहे. एकूण १७ टीबीएम सध्या ३३.५ किमी लांब मार्गिकेवर कार्यरत आहेत. वाहतुकीच्या दृष्टीने कुलाबा-वांद्रे-सीप्झ हा मेट्रो मार्ग ३ महत्त्वाचा प्रकल्प आहे. यामुळे मुंबईकरांच्या रोजच्या प्रवासाच्या समस्या सुटतील. प्रकल्पाचे आतापर्यंत जवळपास ७८ टक्के भुयारीकरण व ५० टक्क्यांहून अधिक बांधकाम पूर्ण झाले आहे.

महाराष्ट्राचा जीएसटी परतावा

वस्तू व सेवाकर (जीएसटी) परतावा महाराष्ट्राला जलदगतीने मिळावा तसेच पीक विमा योजनेचा लाभ राज्यातील सर्वच शेतकऱ्यांना मिळावा, अशी विनंती मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना केली.

मुख्यमंत्री पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर प्रथमच मुख्यमंत्री ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ७, लोककल्याण मार्ग या निवासस्थानी भेट घेतली. या भेटीनंतर त्यांनी खासदार संजय राऊत यांच्या १५, सफदरजंग लेन या निवासस्थानी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या वेळी पर्यावरण तथा राजशिष्टाचार मंत्री आदित्य ठाकरे, खासदार संजय राऊत आणि खासदार हेमंत पाटील उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. ठाकरे म्हणाले, जीएसटीचा राज्याच्या वाट्याचा परतावा मिळावा यासाठी प्रधानमंत्र्यांना याआधी पत्र लिहिले होते. त्यानंतर राज्याला हा परतावा मिळाला. मात्र, हा परतावा गतीने मिळावा अशी विनंती पंतप्रधान श्री.मोदी यांना केली आहे. याबाबत केंद्र पूर्ण सहाकार्य करेल अशी ग्वाही पंतप्रधान श्री.मोदी यांनी यावेळी दिली.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ राज्यातील सर्वच शेतकऱ्यांना मिळावा यावरही चर्चा झाली. सध्या राज्यातील १० जिल्ह्यांमध्ये प्रधानमंत्री पीक विमा उतरवण्यासाठी कंपन्या आल्या नसल्यामुळे शेतकऱ्यांसमोर अडचणी निर्माण होत असल्याचे चित्रही पंतप्रधान यांच्या निदर्शनास आणून दिल्याचे त्यांनी सांगितले. या भेटीत केंद्र आणि राज्य सरकार यांच्यामधील उत्तम समन्वयाबाबत पंतप्रधान श्री.मोदी यांच्याशी सकारात्मक चर्चा झाली.

पुनर्विचार करण्यात येईल. राज्यात उद्योजक यावेत, उद्योग वाढावा यासाठी उद्योजकपूरक असे नवीन ऊर्जा धोरण तयार करण्यात येईल, असे डॉ. राऊत यांनी या वेळी सांगितले.

ग्रामपंचायतींची नियुक्ती

वीज देयक वसुलीसंदर्भात ज्याप्रमाणे विविध खासगी कंपन्यांची नियुक्ती केली जाते. त्या धर्तीवर राज्याच्या सहा विभागातील प्रत्येकी एका ग्रामपंचायतीला प्रायोगिक तत्त्वावर वीज देयक वसुलीसाठी नियुक्त करावे.

कर्णबधिरांसाठी स्वतंत्र माहिती कक्ष

कर्णबधिरांसाठी अडीअडचणी सोडवण्यासाठी तसेच शासनाने त्यांच्यासाठी घेतलेल्या निर्णयांची माहिती देण्यासाठी सांकेतिक भाषा तज्ज्ञांसह मंत्रालयात स्वतंत्र माहिती कक्ष स्थापन करणार असल्याची माहिती सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री धनंजय मुंडे यांनी दिली.

कर्णबधिर असोसिएशन संघटनेच्या मागण्यांबाबत मंत्रालयात आयोजित बैठकीत श्री. मुंडे यांनी ही माहिती दिली. कर्णबधिर विद्यार्थ्यांसाठी तसेच उच्च शिक्षण घेण्यासाठी सांकेतिक भाषातज्ज्ञांची नियुक्ती करण्याबाबत निर्णय घेतला जाणार आहे. या विद्यार्थ्यांच्या शाळांचा दर्जा वाढवणार, विद्यार्थ्यांकरिता आयटीआयच्या धर्तीवर प्रशिक्षण देण्यासाठी तंत्रशिक्षण विभागाशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल. सांकेतिक भाषेचा पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याबाबतही शासन सकारात्मक असून दिव्यांगाच्या संबंधित निर्गमित करण्यात येणाऱ्या शासन निर्णयांच्याप्रती कर्णबधिर शाळा व कर्णबधिरांसाठी काम करणाऱ्या संस्थांना पाठवण्यात येतील. कर्णबधिरांच्या शाळेत प्रशिक्षित शिक्षकाची नेमणूक करण्यात येणार असून कर्णबधिरांसाठी भौतिक सुविधासह शैक्षणिक सुविधा पुरवण्यात येतील.

बहुजन कल्याण विभागातर्फे नवीन १६ शुल्काचे अनुदान

विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासप्रवर्ग व विशेष मागासप्रवर्ग विद्यार्थ्यांना आता १६ इतर शुल्कांचा परतावा मिळणार आहे. त्याचे अनुदान अनुदानित व विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित महाविद्यालयांतील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सुद्धा मिळणार असल्याची माहिती बहुजन कल्याण विभागाचे मंत्री विजय वडेट्टीवार यांनी दिली. २००५-०६ पासूनच्या कालावधीमध्ये महाविद्यालयामार्फत राबवण्यात येत असलेल्या वैविध्यपूर्ण उपक्रमांमुळे इतर शुल्कांच्या बाबींमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. आजपर्यंत हा लाभ फक्त अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयामध्ये कला, विज्ञान आणि वाणिज्य या शाखांमध्ये शिक्षण घेत असलेल्या अभ्यासक्रमांना विजाभज, इमाव व विमाप्र

विद्यार्थ्यांना मिळत होता. परंतु हा लाभ अनुदानित व विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित महाविद्यालयांतील व्यावसायिक अभ्यासक्रमांना मिळत नव्हता. यामध्ये प्रवेश फी, विविध गुणदर्शन उपक्रम शुल्क, विद्यापीठ विकास निधी, विद्यापीठ विद्यार्थी साहाय्य निधी/ कल्याण निधी, प्रयोगशाळा शुल्क, कॉलेज मॅगेजीन शुल्क, विद्यापीठ क्रीडा निधी, विद्यापीठ विद्यार्थी विमा निधी, ग्रंथालय शुल्क, संगणक प्रशिक्षण शुल्क, विद्यापीठ अश्वमेध निधी, युथ फेस्टिवल शुल्क, जिमखाना शुल्क, नोंदणी शुल्क, विद्यापीठ वैद्यकीय मदत निधी, विद्यार्थी ओळखपत्र शुल्क अशा १६ शुल्कांचा समावेश करण्यात आला आहे.

स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण योजना

युपीएससीमार्फत निवड होणाऱ्या केंद्रीय प्रशासकीय सेवांमध्ये अल्पसंख्याक समाजाचे प्रतिनिधित्व वाढावे यासाठी अल्पसंख्याक आयोगामार्फत सध्या पाच जिल्ह्यांमध्ये राबवण्यात येत असलेली स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण योजना आता राज्यातील इतर जिल्ह्यांमध्येही राबवण्यासाठी योजना तयार करण्याबाबत अल्पसंख्याक विकास विभागाला सूचना देण्यात आल्या आहेत. याशिवाय सध्या या प्रशिक्षण योजनेतून शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचे मासिक विद्यावेतन दोन हजार रुपयांवरून चार हजार रुपये करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच संबंधित प्रशिक्षण संस्थांना दिल्या जात असलेल्या निधीची रक्कमही ५० हजार रुपयांपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती अल्पसंख्याक विकास मंत्री नवाब मलिक यांनी दिली.

अल्पसंख्याक समाजाचे शासकीय नोकऱ्यांमधील प्रतिनिधित्व वाढावे यासाठी अल्पसंख्याक आयोगामार्फत केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण योजना राबवली जाते. राज्य प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेच्या मुंबई, कोल्हापूर, नागपूर आणि औरंगाबाद येथील केंद्रे तसेच पुण्यातील यशदामधील केंद्रामध्ये निवडक होतकरू अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना या योजनेतून प्रशिक्षण दिले जाते. प्रत्येक केंद्रामध्ये प्रत्येकी दहा विद्यार्थ्यांची निवड केली जाते. आता या योजनेची व्याप्ती राज्यातील इतर जिल्ह्यांमध्येही वाढवण्याच्या अनुषंगाने योजना तयारी करण्यात येणार आहे.

शिवभोजन योजना : थाळींची संख्या दुप्पट

शिवभोजन योजनेला भरघोस प्रतिसाद मिळत असल्याने या योजनेचा विस्तार करण्याच्या सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अन्न व नागरी पुरवठा विभागाला दिल्या होत्या त्यानुसार आता या योजनेतील थाळीच्या संख्येत दुप्पट वाढ करण्यात आली असून ही संख्या १८ हजारांवरून ३६ हजार थाळी इतकी झाली आहे. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने यासंबंधीचा शासन निर्णय निर्गमित केला आहे. यानुसार सध्या प्रत्येक शिवभोजन केंद्रासाठी असलेले किमान ७५ व कमाल १५० थाळींचे उद्दिष्ट मागणीनुसार

'कृषी मंत्री एक दिवस शेतावर'

शेतकऱ्यांचे प्रश्न समजून घेण्यासाठी 'कृषी मंत्री एक दिवस शेतावर' हा उपक्रम राबवण्याचे कृषी मंत्री दादाजी भुसे यांनी ७ फेब्रुवारी रोजी नागपूर येथे झालेल्या कार्यक्रमात जाहीर केले होते. त्याची अंमलबजावणी आठवडाभराच्या आतच त्यांनी केली. श्री. भुसे यांनी मालेगाव तालुक्यातील वळवाडे, अजंग-वडेल, झोडगे आणि माळमाथा भागातील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. गावात कृषी अधिकारी, कृषी साहाय्यक येतात का, अशी विचारणाही या वेळी कृषीमंत्र्यांनी शेतकऱ्यांना केली.

शेतकऱ्यांना कृषी उत्पादनवाढीसाठी प्रोत्साहन देतानाच त्यांच्या समस्या जाणून घेण्याकरिता एक दिवस शेतावर हा उपक्रम कृषीमंत्री श्री.भुसे यांनी सुरू केला असून कृषी सचिव, आयुक्त यांनी १५ दिवसातून एकदा तर जिल्हा कृषी अधिकाऱ्यांनी दर आठवड्याला शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्याशी संवाद साधावा, अशा सूचना केल्या आहेत. या भेटीत पीक नियोजन, उत्पादन क्षमता याबाबत चर्चा करतानाच उपलब्ध बाजारपेठ आणि विविध कृषी योजनांविषयी शेतकऱ्यांना माहिती द्यावी, अशा सूचना कृषिमंत्री श्री. भुसे यांनी विभागाला दिल्या आहेत.

मालेगाव तालुक्यातील वळवाडे येथील शांताराम गवळी या शेतकऱ्याच्या शेतावर जाऊन त्यांनी त्यांच्याशी संवाद साधला. त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. पीक विमा योजना, कांदा उत्पादन याबाबत त्यांनी शेतकऱ्यांशी चर्चा केली.

पुणे मेट्रो : सामंजस्य करार

पुणे मेट्रो प्रकल्पासाठी युरोपियन इन्व्हेस्टमेंट बँक ६०० दशलक्ष युरोचा (सुमारे ४८०० कोटी रु.) वित्त पुरवठा करणार असून त्याच्या पहिला हप्ता २०० दशलक्ष युरो (सुमारे १६०० कोटी रु.) देण्यासंदर्भातील सामंजस्य करार पुणे मेट्रो आणि युरोपियन इन्व्हेस्टमेंट बँक यांच्यात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत झाला. युरोपियन इन्व्हेस्टमेंट बँकेच्या सहकार्यामुळे पुणे मेट्रो प्रकल्पाला चालना मिळणार आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमात पुणे मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित व बँकेचे उपाध्यक्ष अँड्र्यू मॅकडोवेल यांनी करारावर स्वाक्षरी केली.

युरोपियन इन्व्हेस्टमेंट बँकेने केलेल्या या सहकार्यामुळे पुणे मेट्रो प्रकल्पाला चालना मिळणार असून तो लवकर कार्यान्वित होण्यास मदत होईल. या प्रकल्पामुळे पुणे व आसपासच्या परिसरातील वाहतुकीत प्रभावीपणे सुधारणा होईल व पुण्याच्या विकासास हातभार लागेल. पुणे मेट्रोची भौतिक प्रगती सध्या ३७% तर आर्थिक प्रगती

पुणे मेट्रो प्रकल्पासाठी युरोपियन इन्व्हेस्टमेंट बँकेसोबत सामंजस्य करार करण्यात आला. त्याप्रसंगी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) एकनाथ शिंदे, पुणे मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित व बँकेचे उपाध्यक्ष अँड्र्यू मॅकडोवेल

२९.५३% झाली आहे. बँकेने दिलेल्या निधीचा वापर मेट्रोच्या भुयारी मार्ग, डेपो कामांसह इतर कामांसाठी केला जाईल. युरोपियन इन्व्हेस्टमेंट बँकेची महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील गुंतवणूक विकास आशादायक आहे. पुणे मेट्रोबरोबरच नाशिक मेट्रोसाठी व पर्यावरण संवर्धनाच्या प्रकल्पांसाठी अर्थसहाय्य करण्यासाठी विनंतीही मुख्यमंत्र्यांनी या वेळी केली.

पुणे मेट्रो संक्षिप्त : ● पुणे मेट्रो रेल प्रकल्प हा महत्त्वाकांक्षी नागरी वाहतूक सुविधा प्रकल्प. ● महामेट्रोमार्फत ५०:५० टक्के केंद्र शासन व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त भागीदारीमध्ये प्रकल्प राबवण्यात येत आहे. ● २३ जानेवारी, २०१७ रोजी प्रकल्पाचे काम सुरू. ● हा प्रकल्प हा ३२.५ कि.मी. मार्गिकेचा असून त्यामध्ये ३० स्टेशन आहेत. ● प्रकल्पाचा एकूण खर्च रू. ११,४२० कोटी इतका अपेक्षित आहे. ● केंद्र व राज्य शासन यांच्या सहाय्याने ए.एफ.डी. फ्रान्स व युरोपियन इन्व्हेस्टमेंट बँकेमार्फत प्रकल्पास आर्थिक कर्ज पुरवठा.

वाढवून किमान ७५ आणि कमाल २०० थाळी इतके वाढवण्यात येणार आहे.

योजनेला भरघोस प्रतिसाद : प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून शिवभोजन योजनेची अंमलबजावणी सुरू करण्यात आली होती. पहिल्या दिवसापासूनच योजनेला राज्यातील नागरिकांनी उदंड प्रतिसाद दिला.

केंद्राची निवड पूर्वीच्याच पद्धतीने : अन्न व नागरी पुरवठा विभागाने १ जानेवारी २०२० च्या शासन निर्णयान्वये केंद्राची निवड करण्याची पद्धत निश्चित करून दिली आहे. याच पद्धतीने पुढेही केंद्राची निवड करण्याची सूचना या शासननिर्णयान्वये देण्यात आली असून केंद्राची प्रतिदिन थाळींची संख्या आता आवश्यकतेनुसार २०० च्या मर्यादेत वाढवता येईल.

शिवभोजन केंद्रांना भेट : अन्न, नागरी पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांव्यतिरिक्त तहसीलदार, गट विकास अधिकारी तथा समकक्ष अधिकाऱ्यांमार्फत शिवभोजन केंद्राची भेट व तपासणी आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या भेटीदरम्यान त्यांनी शिवभोजन केंद्रावरील स्वच्छता, नीटनेटकेपणा, अन्नाची गुणवत्ता या बाबींकडे लक्ष द्यावयाचे आहे.

पहिल्या टप्प्यात केवळ शासकीय कार्यालये, रुग्णालये बस आणि रेल्वे स्थानके, बाजारपेठा यासारख्या सार्वजनिक ठिकाणीच योजना राबविली जात असली तरी भविष्यात योजनेचा आणखी विस्तार करण्याचे नियोजित आहे.

दिशा कायद्याची माहिती

महिलांवरील अत्याचारांना पायबंद घालण्याच्या दृष्टिकोनातून कठोर कायदा आणण्यासाठी राज्यशासन प्रयत्नशील आहे. त्याचाच प्रयत्नांचा एक भाग म्हणून आंध्र प्रदेश सरकारने केलेल्या 'दिशा' कायद्याची माहिती घेण्यासाठी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी आंध्र प्रदेशला भेट दिली. भेटीदरम्यान त्यांनी मुख्यमंत्री वाय.एस. जगन मोहन रेड्डी आणि गृहमंत्री श्रीमती मेखाथोटी सुचरिता आणि तेथील पोलीस

महासंचालकांशी चर्चा करून 'दिशा' कायद्याची माहिती घेतली. महिलांवरील अत्याचाराचे खटले गतीने चालवून निकाली काढण्यासाठी आंध्र प्रदेश सरकारने 'दिशा' कायदा केला आहे. लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यासाठी वेगाने खटला चालवणे, २१ दिवसात निकाल देणे आणि गुन्हेगारास फाशीची शिक्षा देण्याची तरतूद या कायद्यात आहे. यामुळे अशा प्रकारच्या गुन्ह्यांना मोठा पायबंद बसण्याची शक्यता आहे.

महिन्याच्या पहिल्या सोमवारी शिक्षणदिन

शाळा न्यायाधिकरणाच्या अधिकार क्षेत्रात न येणाऱ्या तक्रारींवर कार्यवाही करण्यासाठी सद्य:स्थितीत औपचारिक व्यवस्था नसल्यामुळे तक्रारींचे निराकरण तातडीने व्हावे, या उद्देशाने राज्य सरकारने शाळा, जिल्हा आणि विभागीय स्तरावर तक्रार निवारण समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रत्येक शाळांमध्ये तक्रार पेटी बसवण्यात येणार असून या तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यासाठी लोकशाही दिनाच्या धर्तीवर दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी शिक्षणदिनाचे आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी दिली. सध्या शाळेतील असुविधांपासून ते विविध प्रशासकीय कामांबाबत तक्रार निवारणासाठी कोणतीच यंत्रणा अस्तित्वात नाही. यामुळे अनेकदा ग्रामीण भागांतील शाळांना शहरात येऊन तक्रारी कराव्या लागतात. याचबरोबर अनेकदा या तक्रारींचा निपटाराही होत नसल्यामुळे अनेक समस्या वेळेत सोडवल्या जात नव्हत्या. या तक्रारी भविष्यात वेळेवर सोडवल्या जाव्यात, यासाठी तक्रारी पेटीची योजना आखण्यात आली आहे. शाळास्तरावर मुख्याध्यापक आणि शिक्षकांचा समावेश असलेली तक्रार निवारण समिती असेल.

जिल्हास्तरावर तक्रार निवारण समिती असून यात जिल्हा शिक्षण अधिकारी/ शिक्षण निरीक्षक, गटशिक्षणाधिकारी कार्यरत असतील. तसेच विभागीयस्तरावर उपसंचालकांच्या अध्यक्षतेखाली तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात येणार आहे. विद्यार्थी, पालक, शाळा व संस्था यांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी विभागीय शिक्षण मंडळांचे अध्यक्ष, विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपनिरीक्षक यांची एक समिती असणार आहे. या समित्यांच्या माध्यमातून विद्यार्थी व पालकांनी केलेल्या गणवेश न मिळणे, कोणत्याही प्रकारचे शोषण, शिक्षण हक्क कायद्याचे उल्लंघन अशा कोणत्याही प्रकारच्या तक्रारींचे तातडीने निवारण करण्यात येईल. इतकेच नव्हे तर संस्थाचालकही यात संस्थात्मक वादाबाबतच्या तक्रारी करू शकणार आहेत. गुणपत्रिकेतील गुणांच्या तक्रारी तसेच इतर वाद या माध्यमातून सोडवले जाणार आहेत. तक्रारी करण्यासाठी दरवेळेस शिक्षण अधिकारी कार्यालयात न जाता त्या स्थानिक पातळीवर सोडवण्यासाठी ही यंत्रणा उभी करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचा 'स्टेट ऑफ द इयर' पुरस्काराने सन्मान

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या हस्ते व मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र राज्याला 'स्टेट ऑफ द इयर' पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी स्वीकारला.

सीएनबीसी टीव्ही १८ इंडिया ने आयोजित केलेल्या इंडियन बिजनेस लिडर ॲवॉर्ड कार्यक्रमात हा पुरस्कार देण्यात आला. या कार्यक्रमास पर्यटन, पर्यावरण तथा राजशिष्टाचार मंत्री आदित्य ठाकरे, उद्योगपती मुकेश अंबानी आदी उपस्थित होते.

माणगाव परिषदेचा शताब्दी महोत्सव

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या उपस्थितीत व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली माणगाव (ता.हातकणंगले) येथे २१ आणि २२ मार्च १९२० रोजी पहिली ऐतिहासिक परिषद भरली होती. याचा शताब्दी महोत्सव समारंभ २१ मार्च, २०२० रोजी माणगाव (ता.हातकणंगले) येथे आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाचे मंत्री धनंजय मुंडे यांनी दिली. माणगाव परिषदेचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग व बार्टीमार्फत माणगाव परिषदेच्या शताब्दी महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. यासाठी माणगाव परिषद शताब्दी समितीमार्फत विविध कार्यक्रम व उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांचा नाशिक विभागातील दौरा स्मरणीय आणि सुखद अनुभव देणारा ठरला. त्यांच्यारूपाने आपल्या माणसाच्या समाधानात आनंद शोधणाऱ्या कुटुंबप्रमुखांचे दर्शन नागरिकांना घडले. एक शांत, संयमी आणि तेवढ्याच संवेदनशील व्यक्तिमत्त्वाला जवळून अनुभवता आले.

नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयात विभागातील जिल्ह्यांचा आढावा घेताना मुख्यमंत्री.

कुटुंबप्रमुखाचे सुखद दर्शन!

डॉ. किरण मोघे

नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयात विभागातील प्रत्येक जिल्ह्याची आढावा बैठक स्वतंत्रपणे घेण्यात आली. या बैठकीस जिल्ह्यातील विधानसभा सदस्यांना आमंत्रित करण्यात आले होते. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत त्यांच्या मतदारसंघातील समस्या जाणून घेतल्या आणि त्याच ठिकाणी त्या सोडवण्यासाठी तत्काळ निर्णय घेतला. 'आमचे म्हणणे शांतपणे ऐकून त्वरित निर्णय घेण्याची ही पहिलीच वेळ आहे, त्याबद्दल आपल्याला मनापासून धन्यवाद द्यायला हवे', मुख्यमंत्र्यांना उद्देशून असलेली ही प्रतिक्रिया जणू बैठकांची फलश्रुती मांडणारी आहे.

एकापाठोपाठ एक समस्या मांडल्या जात होत्या....प्रत्येक विधानसभा सदस्याला बोलण्याची संधी.... प्रश्न मांडताच ' यावर आपल्याला काय करता येईल' 'हे निश्चित करू या' असे अधिकाऱ्यांना प्रश्न....प्रशासनातील सचिवस्तरीय अधिकारी उपस्थित असल्याने चटकन निर्णय...आणि समारोप करताना दोन ते तीन मिनिटाच्या भाषणात घेतलेल्या निर्णयांची माहिती... सोबत 'हा संवाद असाच पुढे सुरू राहील, तुमच्या सूचना अवश्य देत जा' असे आवाहनदेखील..... बैठकीतून निघताना लोकप्रतिनिधींच्या चेहऱ्यावरचे समाधान स्पष्टपणे दिसत होते.

मुंबई-पुणे-नाशिक सुवर्ण त्रिकोण

नाशिक जिल्ह्याच्या बैठकीत मुंबई-पुणे-नाशिक सुवर्ण त्रिकोणाबाबत कार्यवाही करण्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. सोबत मालेगावच्या विकासावर भर, कृषिपंपांना वीजपुरवठा, प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुलांसाठी वाळू पुरवठा, पर्यटन विकास, निफाड येथील ड्रायपोर्ट, नदी जोड प्रकल्प, मनमाडचा पाणी प्रश्न याबाबत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

निळवंडे धरणाची कामे दोन वर्षात

अहमदनगर जिल्ह्याच्या बैठकीत निळवंडे धरणाची कामे दोन वर्षात पूर्ण करण्यात येतील आणि त्यासाठी अकराशे कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात येतील असे श्री.ठाकरे यांनी सांगितले. पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात आणणे, अहमदनगर एमआयडीसीचा विस्तार, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अहमदनगर आणि नाशिक येथील उपकेंद्र, शिर्डी विमानतळ विकास, श्रीरामपूर येथील विद्युत उपकेंद्र सुरू करणे, कोपरगाव येथील न्यायालयाची इमारत आदींबाबतही निर्णय या वेळी घेण्यात आला.

कृषिपंपांना दिवसा वीज पुरवठा

कृषिपंपांना दिवसा वीज पुरवठा करण्याची जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांची मागणी असल्याचे तेथील लोप्रतिनिधींनी सांगितल्यावर त्याला तत्काळ प्रतिसाद देत मुख्यमंत्र्यांनी ऊर्जा विभागाला त्याबाबतचे नियोजन करण्याच्या सूचना दिल्या. जिल्ह्यातील अपुरे सिंचनप्रकल्प पूर्ण करण्यास प्राधान्य देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा क्रीडा संकुलाच्या कामासाठी निधी देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. चाळीसगाव-मालेगाव रस्त्यांची दुरुस्ती, चाळीसगाव येथील प्रशासकीय इमारत, अमळनेर येथील रुग्णालयाची दर्जोन्नती, धानोरा येथे सबस्टेशन उभारणे आदी विषयांबाबत निर्णय घेण्यात आले.

धुळ्यातील मालेगाव रोडवर उड्डाणपूल

धुळ्यातील वाहतुकीची समस्या सोडवण्यासाठी मालेगाव रोडवर उड्डाणपूल तयार करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना मुख्यमंत्री श्री.ठाकरे यांनी अधिकाऱ्यांना केल्या. जलयुक्त शिवार योजनेतील सुरू असलेली कामे पूर्ण करण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले. शिरपूर येथील आरोग्य केंद्राची समस्या सोडवण्याचे निर्देशही त्यांनी दिले. आदिवासी आश्रमशाळा व वसतिगृह बांधकाम, जिल्हा रुग्णालयात १०० खाटांची सोय, आरोग्य विभागातील रिक्त पदे, ग्रामीण रुग्णालय याबाबतही मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक निर्णय घेतले.

नंदुरबार सौंदर्याने नटलेला जिल्हा

नंदुरबार नैसर्गिक सौंदर्याने नटलेला जिल्हा असून आपल्याला या परिसराचे आकर्षण असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. या भागात येण्यासाठी कार्यबाहुल्यामुळे वेळ मिळत नसला तरी दुर्गम भागातील समस्या सोडवणारच अशी ग्वाही त्यांनी दिली. सुसरी प्रकल्पासाठी १.७५ कोटी व धनपूर प्रकल्पासाठी १.५ कोटी रुपये देण्याची घोषणा जनतेला सुखावून गेली. दुर्गम भागात मोबाइल नेटवर्कसाठी केंद्राकडे पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

न्यायमूर्ती घडवणारे पहिले विद्यापीठ

महाराष्ट्र व गोवा वकील परिषदेतर्फे आयोजित 'वकील परिषद २०२०' ला मुख्यमंत्री उपस्थित राहिले. त्यांच्या उपस्थितीत जिल्हा न्यायालयाच्या नूतन इमारतीचे कोनशीला समारंभ संपन्न झाला. या वेळी त्यांनी जिल्हा न्यालयालयातील हेरिटेज गॅलरीलाही भेट दिली.

परिषदेत 'जलद व आधुनिक न्यायाच्या दिशेने' या विषयावरील चर्चासत्रात बोलताना बदलत्या काळानुसार समाजाच्या गरजा लक्षात घेऊन ब्रिटिशकालीन कायदे बदलण्याची गरज आहे. न्यायमूर्ती घडवणारे पहिले विद्यापीठ महाराष्ट्रात उभे करण्यासाठी सर्व सहकार्य करण्यात येईल. जनतेला कमी वेळात न्याय मिळण्यासाठी चांगल्या न्यायमूर्तींच्या परंपरा पुढे नेणारे न्यायमूर्ती तयार व्हावेत आणि रामशास्त्री प्रभुणे यांच्यासारख्या न्यायाधीश विद्यापीठातून घडावा, अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी या वेळी व्यक्त केली.

शेतकरी हाच महाराष्ट्राचा केंद्रबिंदू

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या जळगाव जिल्हा दौऱ्यात जैन इरिगेशन लि. तर्फे देण्यात येणारा पद्मश्री डॉ. अप्पासाहेब पवार आधुनिक कृषी उच्च-तंत्र पुरस्काराचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाला माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार, कामगार कल्याण मंत्री दिलीप वळसे-पाटील, कृषिमंत्री दादाजी भुसे, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील उपस्थित होते.

राज्यातील शेतकरी हाच महाराष्ट्राचा केंद्रबिंदू आहे. शेतकऱ्याला कर्जमुक्तीच्या विळख्यातून सोडवण्यासाठी महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना ही प्रथमोपचार असून शेतकऱ्यांना वीज, पाणी आणि त्यांच्या शेतमालाला हमी भाव मिळवून देण्यासाठी राज्य शासन वचनबद्ध असल्याचे मुख्यमंत्र्यांनी या वेळी सांगितले. श्री.ठाकरे यांच्या हस्ते जैन हिल्स येथील कृषी जैव तंत्रज्ञान संशोधन व विकास केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.

मुख्यमंत्रिपदाची मोठी जबाबदारी

मुक्ताईनगर येथे मुख्यमंत्र्यांच्या उपिस्थतीत झालेल्या शेतकरी मेळाव्याला शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला. आपल्याला जनतेच्या आशीर्वादाने मुख्यमंत्रिपदाची मोठी जबाबदारी मिळाली असून ही जबाबदारी पेलताना शेतकरी, बेरोजगार तरुण, महिला यांच्यासाठी काम करण्यास राज्य सरकारने सुरुवात केली असल्याचे त्यांनी सांगितले.

प्र.उपसंचालक (माहिती), नाशिक

समाधानी आहात का!

मुख्यमंत्र्यांनी वडाळा नाका परिसरातील द्वारकामाई बचतगटाने चालवलेल्या शिव भोजन केंद्रास भेट दिली आणि लाभार्थ्यांशी संवाद साधला. शिवभोजन थाळीबाबत समाधानी आहात का, या त्यांच्या प्रश्नाने तुकाराम नाडे या लाभार्थ्यांच्या डोळ्यात पाणी आले. मुख्यमंत्र्यांनी आस्थेने विचारणा करणे हा त्यांच्यासह इतरांसाठी सुखद अनुभव होता. 'शांततेत जेवा, जेवण चांगलं आहे ना,' असा कौटुंबिक जिव्हाळ्याचा संवाद लाभार्थ्यांसाठी जेवणापेक्षा अधिक गोडी देणारा ठरला.

निसर्गरम्य गणपतीपुळे

'आकडा सांगण्यापेक्षा कृतीला महत्त्व देणारे आपले सरकार आहे. कोकणच्या विकासासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही. गणपतीपुळेच नव्हे तर कोकणसह नवा महाराष्ट्र घडवायचे काम आपण सर्वजण मिळून करू,' असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कोकण दौऱ्याच्या वेळी सांगितले.

कोकणासह नवा महाराष्ट्र घडवू या

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विविध विषयांबाबत सविस्तर आढावा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी घेतला. तिलारी प्रकल्प क्षेत्रात पर्यटन विकासासाठी वन संवर्धन राखीव करून पर्यटनाच्या सुविधा उभारण्याबाबत एकत्रित प्रस्ताव तयार करावा. एलईडी मासेमारीविरोधात राज्याचा कडक कायदा निर्माण केला जाईल. जिल्ह्यातील सर्व रिक्त पदांचा आढावा संबंधित विभागांनी घेऊन पदे भरण्याविषयीची कार्यवाही तातडीने सुरू करावी, असे मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी या वेळी सांगितले.

कबुलायतदार गावकार प्रकरणी जिल्ह्यात महाराष्ट्र शासनाच्या नावे असलेल्या ६५८ हेक्टर जमिनीबाबत एकत्रित बैठक घेऊन निर्णय घेतला जाईल. जिल्ह्यात बांधण्यात येणारे धूप प्रतिबंधक बंधारे हे दगडी बांधण्यासाठी संबंधित विभागाने प्रस्ताव करावा. सागरी महामार्गाच्या काँक्रिटीकरणाऐवजी कमी खर्चात टिकाऊ रस्ते निर्मितीसाठी बॅच मिक्सचा वापर करावा. रेडी व आरोंदा बंदर पुन्हा शासनाकडे घेण्याबाबत विचार करण्यात येईल, पाणबुडी प्रकल्पाविषयी सकारात्मक विचार करू, जिल्ह्यात अद्ययावत असे क्रीडासंकुल उभारण्यात येईल. कवी मंगेश पाडगावकर यांच्यासह अन्य महनीय व्यक्तींच्या स्मारकांच्या उभारणीबाबत प्रस्ताव द्यावेत. त्यामध्ये त्या व्यक्तीविशेषांचा समावेश राहील याची काळजी घ्यावी. महिनाभरात पर्यटन विकास महामंडळाने जिल्ह्याचा परिपूर्ण पर्यटन आराखडा सादर करावा अशा विविध सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या वेळी दिल्या.

मच्छीमारांसाठी कर्जमाफीचा विचार

राज्यात शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी जाहीर करण्यात आली आहे. त्याच धर्तीवर मच्छीमारांना कर्जमाफी देण्याबाबत राज्यशासन विचाराधीन आहे. अशा मच्छीमारांबाबत सर्वेक्षण करून त्यांची वर्गवारी तयार करावी. मच्छीमारांचे कर्ज कशा प्रकारचे आहे व किती आहे, कोणत्या गटातील मच्छीमार यासाठी पात्र ठरू शकतात, याची सविस्तर माहिती सादर करावी. याचा अभ्यास करून मच्छीमारांच्या कर्जमाफी संदर्भात विचार करण्यात येईल.

कणकवली ट्रॉमा केअर

कणकवली येथील प्रस्तावित ट्रॉमा केअर सेंटर लवकरच सुरू होईल. तसेच व्हायरॉलॉजी लॅब एप्रिलपर्यंत सुरू होईल. माकडतापाची नवी लस मिळण्याबाबत केंद्राकडे प्रस्ताव पाठवावा. वेंगुर्ला येथील उप जिल्हा रुग्णालयाचे काम पूर्ण झाले आहे. एप्रिलमध्ये हे रुग्णालय सुरू होईल. कुडाळ येथील महिला व बाल रुग्णालयासाठी लागणारा निधी देण्याची व्यवस्था तातडीने करावी. जिल्ह्याची आरोग्य यंत्रणा सक्षम राहण्यासाठी आरोग्य विभागाने योग्य ती दक्षता घ्यावी, अशा सूचनाही मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी या वेळी दिल्या.

अपूर्ण व रखडलेले प्रस्ताव मार्गी

जिल्ह्यातील अरुणा, नरडवे, सी-वर्ल्ड सारखे रखडलेले प्रकल्प लवकरच मार्गी लावू. सी-वर्ल्ड सारख्या प्रकल्पांसाठी

खासगी गुंतवणूकदार पुढे आल्यास त्यासाठी भांडवली अनुदान देऊन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. रखडलेले सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी असलेल्या अडचणी सोडवून प्रकल्प मार्गी लावले जातील. तसेच २२ कोटी १२ लाख खर्चाच्या मसुरे (आंगणेवाडी) लघुपाटबंधारे योजनेला प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून तसे पत्र मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पालकमंत्री उदय सामंत यांच्याकडे सुपुर्द केले. या योजनेच्या कोनशिलेचे अनावरणही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले.

सिंधुदुर्ग किल्ल्याची केली पाहणी

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सिंधुदुर्ग किल्ल्याला भेट देऊन किल्ल्याची पाहणी केली. यावेळी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सिंधुदुर्ग किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिरात जाऊन शिवछत्रपतींचे दर्शन घेतले. किल्ल्यावरील भवानी मातेच्या मंदिरातील भवानी मातेचेही त्यांनी दर्शन घेतले.

नवउद्योजकांना मंजुरीपत्रांचे वाटप

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पाच नव उद्योजकांना उद्योग मंत्री सुभाष देसाई यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते मंजुरी पत्रांचे वाटप करण्यात आले. सूक्ष्म व लघू उद्योगांच्या उभारणीस प्रोत्साहन मिळावे व त्यातून रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात या उद्देशाने मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम राबवण्यात येत आहे. याअंतर्गत जिल्ह्यातील १०२ प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली.

देवस्थान समितींच्या जमिनी

राज्यात असणाऱ्या देवस्थान समितीच्या जमिनीचे हस्तांतरण सुलभरीत्या व्हावे, यासाठी महिन्याभरात धोरणात्मक निर्णय घेतला जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. रत्नागिरी जिल्ह्यातील विविध विषयांबाबत सविस्तर आढावा मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी घेतला.

> “मुंबईतही समुद्र आहे आणि कोकणातही. पण कोकणातला समुद्र छायाचित्रणाच्या दृष्टीने स्वच्छ व नितळ आहे. हे मी दुर्गांचे छायाचित्रण करताना बघितले आहे. इथल्या मातीतील माणसेही अशीच निर्मळ आहेत. अशा कोकणचा विकास करताना निधी कधीच कमी पडू देणार नाही.”
>
> **- श्री. उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री**

पूर तटबंदीस मान्यता

यंदाच्या पावसाळ्यात राजापूर शहरात पुराचे पाणी शिरले व दोन मजली इमारती बुडाल्या त्याचप्रमाणे चिपळूणमध्येही दहा फूट उंचीपर्यंत मुख्य बाजारपेठेत पाणी शिरले होते. या दोन्ही ठिकाणी पूर अडवण्यासाठी नदी लगत संरक्षण भिंत उभारण्यास मुख्यमंत्र्यांनी या वेळी मान्यता दिली.

पदभरतीची चक्राकार पद्धत

रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या दोन्ही जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर रिक्त पदांची समस्या आहे. यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात आला असून सर्व पदे भरण्यात येतील. पद भरतीच्या चक्राकार पद्धतीत या दोन जिल्ह्यांना प्राधान्यक्रम असेल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

रत्नागिरी जिल्ह्याला रायगडशी जोडणारा पूल मेरी टाइम बोर्डाच्यावतीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निधीतून पूर्ण करण्यात येईल. याखेरीज रत्नागिरी जवळील निवळी घाट तसेच इतर रस्त्यांच्या कामाला प्राधान्य देण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

टीम लोकराज्य

गणपतीपुळे विकास आराखडा

गणपतीपुळे येथील १०२ कोटींच्या विकास आराखड्याचे भूमिपूजन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले.

असा आहे आराखडा.. टप्पा क्र. १ : ■ श्रीक्षेत्र गणपतीपुळे गणपती मंदिराचे तसेच परिसर संबंधित आराखड्यातील कामे ■ श्रीक्षेत्र गणपतीपुळे येथे येणाऱ्या भाविकांना मूलभूत सुविधा पुरवणे ■ पाणीपुरवठा योजना व स्वच्छता संदर्भातील कामे ■ अधिक क्षमतेचे सार्वजनिक स्नानगृह व शौचालय बांधणे ■ पर्यटक व भाविकांना समुद्र स्नानाकरिता सुरक्षेसाठी समुद्र किनाऱ्यावर जागा आरक्षित करणे.
टप्पा क्र.२ : ■ सांडपाणी प्रक्रिया व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन ■ वाहनतळ, सौर ऊर्जा कामे. **टप्पा क्र.३ :** ■ श्रीक्षेत्र गणपतीपुळे गावातील व परिसरातील रस्ते, हा आराखडा ३१ मार्च २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

महाराष्ट्राचा अभिमानबिंदू रायगड

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा साक्षीदार असलेला रायगड महाराष्ट्राच्या देदीप्यमान इतिहासाची साक्ष देत आहे. रायगड केवळ गड नाही तर तो महाराष्ट्राच्या अस्मितेचा आणि अभिमानाचा मानबिंदू आहे. येथील हिरकणी बुरूज महाराष्ट्रातील धैर्यवान महिलांच्या शौर्याची गाथा सांगत उभा आहे. शिवकाळातील अनेक चढउतार अनुभवलेला, बांधकामाचा उत्कृष्ट नमुना असलेला हा गड शिवप्रेमी, दुर्गप्रेमींसाठी तीर्थस्थळच आहे.

सारंग खानापूरकर

भारतभूमीवर राज्य करत असलेल्या पाच शाह्यांच्या नाकावर टिच्चून हिंदवी साम्राज्य निर्माण करणारे छत्रपती शिवाजी महाराज ज्या ठिकाणी सिंहासनाधीश्वर झाले, तो हा रायगड. स्वराज्याची दुसरी राजधानी. राजगडावरून २५ वर्षे कारभार केल्यानंतर महाराजांनी सुरक्षेच्या दृष्टीने राजधानी रायगडला हलवली. समुद्रालाही जवळ असणाऱ्या आणि अत्यंत दुर्गम असणारा रायरीचा डोंगर शिवरायांनी १६५६ मध्ये जावळीच्या मोऱ्यांकडून ताब्यात घेतला. त्याचा आकार आणि जागा पाहूनच त्यांनी 'तख्तास जागा' हाच गड करावा,' असे उद्‌गार काढले. विजापूराकडे निघालेल्या कल्याणच्या सुभेदाराचा खजिना लुटून त्या पैशातून रायगड बांधून काढला. या गडावर सरोवरे, विहिरी, कारखाने, वाडे, मंदिरे यांची बांधणी करत तो अत्यंत देखणा केला. एकाच उंच कातळावर असलेला, शत्रूला अजिंक्य वाटणारा हा गड पाहणाऱ्याला थक्क करतो. हिरकणीने मात्र या गडालाच एकदा थक्क केले होते. (शिवरायांचा राज्याभिषेक हा सर्वोच्च आनंदाचा क्षण अनुभवणाऱ्या या गडाच्या नशिबी त्यांचे महानिर्वाण पाहणेही होते. शिवकाळातील अनेक चढउतार अनुभवलेला, बांधकामाचा उत्कृष्ट नमुना असलेला हा गड शिवप्रेमी, दुर्गप्रेमींसाठी तीर्थस्थळच आहे.)

भौगोलिक स्थान

गिरिदुर्ग प्रकारातील रायगडाची उंची

समुद्रसपाटीपासून २८५१ फूट आहे. या गडाच्या पूर्वेला लिंगाणा, दक्षिणेला मकरंदगड, प्रतापगड आणि वासोटा आहे. उत्तरेला कोकणदिवा, तर आग्नेय दिशेला राजगड आणि तोरणा आहेत. रायगड जिल्ह्यात महाडपासून २५ किलोमीटर अंतरावर हा गड आहे.

गडावर पाहण्यासारखी ठिकाणे

पाचाड येथील जिजाबाईंचा वाडा : रायगडावर स्वराज्याची राजधानी गेली त्या वेळेपर्यंत राजमाता जिजाऊसाहेब या उतार वयाकडे झुकल्या होत्या. गडावरील वारे, पाणी त्यांना फारसे मानवत नसल्याने शिवरायांनी त्यांच्यासाठी रायगडाच्या पायथ्यालाच असलेल्या पाचाड या गावी एक वाडा बांधून दिला. जिजाबाई बराच काळ येथेच राहत असत. या वाड्यामध्ये पायऱ्यांची विहीर आहे. जिजाबाईंना बसण्यासाठी केलेले दगडी आसनही येथे बघायला मिळते. या विहिरीला तक्क्याची विहीर' म्हणतात.

खुबलढा बुरूज : पायऱ्या चढून गडाच्या जवळ येताच सुरुवातीला एक बुरूज दिसतो. खुबलढा असे या बुरुजाचे नाव आहे. बुरुजाशेजारी एकेकाळी असलेला चित दरवाजा आता पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे.

नाना दरवाजा : नाना उर्फ नाणे दरवाजा म्हणजे लहान दरवाजा. दोन कमानी असलेल्या या दरवाजाच्या आतील बाजूस दोन खोल्या आहेत. पहारेकऱ्यांच्या या खोल्यांना देवड्या म्हणतात.

मशीदमोर्चा : चित दरवाजाच्या मार्गाने पुढे गेल्यावर एक सपाट जागा लागते. या सपाट जागेच्या एका बाजूला मदनशहा नावाच्या साधूचे थडगे आहे. बाजूला दोन इमारतीही आहेत. यापैकी एक धान्याचे कोठार असून दुसरी इमारत पहारेकऱ्यांसाठी होती. येथेच तोफेचीही जागा आहे. थोडे पुढे गेल्यावर खडकात कोरलेल्या तीन गुहाही दिसतात.

पालखी दरवाजा

महादरवाजा : रायगडाच्या महादरवाजाला दोन मोठे बुरूज आहेत. यातील एकाची उंची ७५ फूट तर, दुसऱ्याची उंची ६५ फूट आहे. दरवाजावर दोन्ही बाजूंस कमळाकृती कोरलेल्या आपल्याला दिसतात. या कमळाकृती म्हणजे लक्ष्मी आणि सरस्वतीचे प्रतीक मानल्या जातात. दरवाजाला लागून असलेल्या तटबंदीला जंग्या, म्हणजेच शत्रूवर मारा करण्यासाठी ठेवलेली भोके आहेत. ही तटबंदी उजवीकडे टकमक टोकापर्यंत, तर डावीकडे हिरकणी कड्यापर्यंत आहे. महादरवाजातून आत गेल्यावर देवड्या दिसतात. महादरवाजापासून टकमक टोकाकडे तटबंदीवरून चालत गेल्यास तटबंदी संपण्याच्या थोडे अंतर आधी बुरुजात चोरदिंडी आहे. चोरदिंडीतून दरवाजापर्यंत येण्याचा मार्ग आहे.

हत्ती तलाव, गंगासागर तलाव : महादरवाजातून थोडे आत आलात की समोरच हत्ती तलाव दिसतो. रायगडावर गजशाळा होती. या गजशाळेतील हत्तींना आंघोळीसाठी आणि पिण्यासाठी या तलावातील पाण्याचा वापर होत असे. हत्ती तलावापासून थोडे पुढे गेल्यावर गंगासागर तलाव दिसतो. गंगासागर तलावाच्या दक्षिण बाजूला दोन उंच मनोरे आहेत, त्यांना स्तंभ म्हणतात.

पालखी दरवाजा : वरील दोन्ही स्तंभांच्या पश्चिमेस एक भिंत असलेली बाजू आहे. तेथील पायऱ्या चढून गेल्यावर पालखी दरवाजा लागतो. पालखी

गडाचा इतिहास

रायरी हे रायगडाचे जुने नाव. या गडाला नंदादीप, जंबुद्वीप, रायगिरी, शिवलंका, भिवगड, इस्लामगड अशीही इतर नावे होती. या गडाचा बेलागपणा पाहून पाश्चिमात्य लोकांनी याला 'पूर्वेकडील जिब्राल्टर' असेही नाव दिले आहे. पाचव्या शतकापासून शिर्के घराण्याकडे या गडाचा ताबा होता. त्याला किल्ल्याचे असे स्वरूप नव्हते. निजामशाहीत कैद्यांना ठेवण्यासाठी या गडाचा वापर होत असे. नंतर शिवरायांनी एप्रिल १६५६ मध्ये गडाला वेढा घालत तो आपल्या ताब्यात घेतला. या गडावर छत्रपती शिवाजी राजांचा ६ जून १६७४ रोजी राज्याभिषेक झाला. राज्याभिषेकापूर्वी राजांनी देवीला तीन मण सोन्याचे छत्र केले होते. स्वराज्यासाठी अतोनात धावपळ करत रक्त आटवलेल्या शिवरायांनी याच गडावर देह ठेवला. १६८९ मध्ये छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत किल्लेदार सूर्याजी पिसाळ याने फितुरी केल्याने हा स्वराज्याचा मुकुटमणी मोगलांच्या हाती पडला. त्यानंतर जवळपास ४४ वर्षांनंतर शाहू महाराजांच्या राजवटीत १७३३ मध्ये मराठ्यांनी हा गड पुन्हा ताब्यात घेतला.

छत्रपती शिवाजी महाराज समाधी, रायगड

गंगासागर तलाव

दरवाजातून वर गेल्यावर चढउतार असलेला एक मार्ग आहे. या मार्गावर पुढे मेणा दरवाजा आहे. मेणा दरवाजाच्या उजव्या हाताला राण्यांचे महाल होते. त्याचे अवशेष आता दिसतात. मेणा दरवाजातून बालेकिल्ल्यात जाता येते.

राजभवन : राण्यांच्या महालासमोर सेवकांच्या खोल्या होत्या. त्याचेही अवशेष दिसतात. या अवशेषांच्या मागे एक समांतर जाणारी भिंत आहे. या भिंतीच्या मध्यभागी असलेल्या दरवाजातून बालेकिल्ल्यात गेल्यास समोरच प्रशस्त चौथरा लागतो. हे महाराजांचे राजभवन आहे. हा चौथरा ८६ फूट लांब आणि ३३ फूट रुंद आहे. राजभवनाच्या पूर्वेकडे मोकळ्या जागेत एक तळघर आहे. हा जवाहीरखाना आहे. या ठिकाणी बहुमोल रत्ने, दागिने ठेवली जात असावीत.

राजसभा : २२० फूट लांब आणि १२४ फूट रुंद असा विस्तार असलेली ही राजसभा आहे. पाच ते सहा हजार व्यक्ती येथे बसू शकतात. पूर्वेकडे तोंड करून असलेल्या या राजसभेतच शिवरायांचा राज्याभिषेक झाला होता. या वेळी बत्तीस मण सोन्याचे सिंहासन तयार केले होते, असे सभासद बखरीत म्हटले आहे. या ठिकाणी आता शिवरायांचा पुतळा आहे. सिंहासनाच्या ठिकाणाहून केलेली कुजबुजही सर्वत्र ऐकू येते, हे ध्वनितंत्र आश्चर्यचकित करणारे आहे.

रायगडावर कसे जाल?

रायगड हा पुणे, मुंबई आणि साताऱ्याहून साधारण सारख्याच अंतरावर आहे. रायगडला तिन्ही ठिकाणांहून दुचाकी, चारचाकी किंवा बसने जाता येते.

मुंबईहून : मुंबई - गोवा महामार्गावरील महाड येथून २४ कि. मी. अंतरावर रायगड आहे.

पुण्याकडून : ताम्हिणी घाटातून उतरल्यावर एक रस्ता कोलाड गावाकडे जातो. मात्र, सरळ न जाता घाट संपताच डावीकडे निजापूरला जाणाऱ्या रस्त्याने सुमारे २५ किलोमीटर गेल्यास पाचाडमार्गे रायगड लागतो.

रायगडवर जाण्यासाठी दोन प्रमुख मार्ग आहेत.

१) **रोप वे** : रायगडाच्या पायथ्यालाच आता रोप-वेची व्यवस्था आहे. या मार्गाने केवळ चार मिनिटांमध्ये गडावर पोहोचता येते. गड पायी चढून जाणे शक्य नसल्यास पायथ्याशी रोप-वेसाठी तिकीट काढून गडावर जाता येते.

२) **पायी चढण** : पाचाड खिंडीतून रायगडावर जाण्यासाठी रस्ता आहे. साधारण चौदाशे पायऱ्या चढून गेल्यावर आपण गडावर पोहोचतो. गडावर पोहोचण्यासाठी साधारण दोन तास लागतात. मात्र गड नीट बघायचा असल्यास किमान एक रात्र तरी गडावर मुक्काम करावा. गडावर राहण्याची सोय आहे.

महादरवाजा

नगारखाना : सिंहासनासमोरच तुम्हाला भव्य प्रवेशद्वार दिसते. हाच तो नगारखाना. हे बालेकिल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार आहे.

बाजारपेठ : नगारखान्यातून बाहेर येत डावीकडे आले की होळीचा माळ लागतो. येथेही शिवरायांचा पुतळा आहे. या पुतळ्या समोरच दगडी चौथऱ्यांच्या दोन रांगा दिसतात. दोन रांगांमध्ये चाळीस फुटी रस्ता आहे. ही शिवकालिन बाजारपेठ होती असा काहींचा दावा असला तरी येथे प्रतिष्ठित पाहुणे, सरदार यांना उतरण्यासाठीची सोय केलेली असावी, असे अभ्यासकांचे म्हणणे आहे.

शिरकाई देऊळ : शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या उजव्या बाजूला शिरकाई देवीचे छोटे देऊळ आहे. अनेक शतकांपासून शिर्के यांच्याकडे हा गड असल्याने त्यांची कुलस्वामिनी असलेल्या या देवीचे मंदिर येथे आहे. सध्याचे मंदिर हे मूळ नाही. मात्र, आतील मूर्ती प्राचीन आहे. मूळ मंदिर होळीच्या माळावर होते. तेथे देवळाचा चबुतराही दिसतो.

जगदीश्वर मंदिर : बाजारपेठेच्या खालील बाजूस पूर्वेकडील उतारावर ब्राह्मणवस्ती, ब्राह्मण तळे मागे टाकल्यावर समोर जे भव्य मंदिर दिसते, ते जगदीश्वराचे आहे. येथे नंदीची अत्यंत सुबक आणि भव्य मूर्ती होती. सध्या ती भग्नावस्थेत आहे. मंदिराला सभामंडप आहे. गाभाऱ्याच्या भिंतीवर हनुमंताची भव्य मूर्ती कोरलेली आहे. मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या पायऱ्यांच्या खाली एक शिलालेख आहे. यावर सेवेचे ठायी तत्पर, हिरोजी इंदुलकर' असे कोरलेले आहे. हिरोजी हे रायगडाचे स्थापत्य विशारद होते, असे यावरून दिसते.

महाराजांची समाधी : मंदिराच्या पूर्व दरवाजापासून थोड्या अंतरावरच असलेला अष्टकोनी चौथरा म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी आहे. हिंदवी साम्राज्याच्या प्रतापसूर्याच्या या समाधिस्थळी आपण आपोआप नतमस्तक होतो.

वाघ दरवाजा : होळीच्या माळाच्या उजव्या दिशेला असलेल्या कुशावर्त तलावाच्या जवळून जाणाऱ्या घळीने खाली उतरत वाघ दरवाजाकडे जाता येते. संकटकालीन परिस्थितीत वापरण्याच्या मार्गांपैकी हा एक आहे.

टकमक टोक : बाजारपेठेसमोरून असलेल्या रस्त्याने टकमक टोकाकडे जाता येते. पुढे जात असताना रस्ता निमुळता होतो. या टोकावरून गुन्हेगारांचा कडेलोट केला जाई. अडीच हजार फुटांहून अधिक उंच असलेल्या या कड्यावरून खाली पडल्यावर अवशेष शोधायचेही काम फारसे बाकी राहत नाही.

हिरकणी टोक : गंगासागर तलावाच्या उजव्या बाजूने जाणारी वाट हिरकणी टोकाकडे घेऊन जाते. येथे तोफा आहेत. या तोफांच्या टप्प्यात बराच प्रदेश येत असल्याने शिवकाळात हा भाग अत्यंत महत्त्वाचा होता.

याशिवाय, पाचाडमार्गे वर जाताना डाव्या बाजूच्या डोंगरावर वाघांच्या डोळ्यांसारखी दिसणारी नाचणटेपाची गुहा आहे. ही गुहा अश्मयुगापासून असावी, असा अंदाज आहे. येथून दिसणारा राजगड, अंगावर येणारा भन्नाट वारा येथे येण्याचे सार्थक करतो.

लेखक दै. सकाळमध्ये पत्रकार आहेत.

'साहेब, कर्जमुक्तीची रक्कम जमा होणार असल्याने आता मुलीच्या लग्नाची चिंता नाही...तुम्हीही लग्नाला या.. असे आपुलकीचे आमंत्रण परभणी जिल्ह्यातील विठ्ठलराव गरूड यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दिले. तर पहिल्यांदाच कर्जमुक्तीसाठी हेलपाटे मारावे लागले नाहीत,' अशी भावना अहमदनगर जिल्ह्यातल्या पोपट मुकटे या शेतकऱ्याने मुख्यमंत्र्यांजवळ व्यक्त केली. या दोन्ही प्रातिनिधीक प्रतिक्रिया महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीचे यश अधोरेखित करणाऱ्या ठरल्या.

कर्ज फिटलं साहेब, आता लेकीच्या लग्नाला या..!

अजय जाधव

महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजनेचा लाभ देण्याचा शुभारंभ मुख्यमंत्री श्री. ठाकरे व उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या हस्ते झाला. त्यानिमित्त परभणी, अहमदनगर आणि अमरावती जिल्ह्यातील लाभार्थी शेतकऱ्यांशी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधला. या वेळी पात्र शेतकऱ्यांची पहिली यादी प्रसिद्ध करण्यात आली.

महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजनेचा लाभ देण्याचा शुभारंभ मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकार मंत्री बाळासाहेब पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, कृषी मंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते करण्यात आला.

हेलपाटे मारावे लागले का?

या योजनेचा लाभ घेताना काही त्रास झाला का...किती हेलपाटे मारावे लागले, किती कर्ज होते, कुठल्या पीकाला कर्ज घेतले होते. आधीच्या आणि आताच्या कर्जमुक्ती योजनेमध्ये काय फरक जाणवला असे प्रश्न मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी लाभार्थ्यांना विचारले. त्यावर योजनेबाबत शंभर टक्के समाधानी असल्याची भावना अहमदनगर जिल्ह्यातील पोपट मुकटे यांनी व्यक्त करताना 'मागील वेळेस पाच ते सहा वेळा चकरा माराव्या लागल्या आता केवळ एका थम्बवरच काम झाले' असे त्यांनी सांगितले.

लेकीला आणि जावयाला लग्नाच्या शुभेच्छा

परभणीच्या पिंगळी येथील विठ्ठलराव गरूड यांनी कर्जमुक्तीची रक्कम मिळणार असल्याने चिंता मिटल्याची भावना व्यक्त केली आणि 'मुलीच लग्न जमलयं' अशी आनंदाची बातमी त्यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना दिली. त्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुलीला कुठं दिलं अशी आपुलकीची विचारपूस करतानाच लेकीला आणि जावयाला लग्नाच्या शुभेच्छा दिल्या. हा संवाद ऐकताना हरखून गेलेल्या विठ्ठलराव यांनी लगोलग मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना मुलीच्या लग्नाचे आमंत्रण दिले.

योजनेच्या यशाचे श्रेय यंत्रणेला

राज्यातील बळीराजांना कर्जामुक्तीतून चिंतामुक्त करणाऱ्या या मोठ्या योजनेची अंमलबजावणी केवळ ६० दिवसात झाली. याचे श्रेय यंत्रणेला आहे. ही योजना राबवताना आपण शेतकऱ्यांवर काही उपकार करीत आहोत अशी भावना ठेवू नका. शेतकऱ्यांचे आशीर्वाद आपण या माध्यमातून घेत आहोत त्यामुळे आपण लाभार्थी आहोत. काही ठिकाणी अंमलबजावणी करताना उणीवा जाणवल्या तर शेतकऱ्यांनी नाराज होवू नये. यंत्रणेत काम पाहणाऱ्या सर्वांनी शेतकऱ्यांचे प्रश्न समजून घेताना संयम ढळू देऊ नका, बळीराजाला दुखवू नका, अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी केली.

कर्जमुक्तीसाठी योजना

बळीराजा कर्जमुक्त व्हावा, यासाठी आमचा प्रयत्न आहे. त्याच भावनेतून ही योजना सुरू केली. कर्जमुक्त होऊन शेतकऱ्याला पुन्हा काळ्या आईची सेवा करता यावी. शेतीतून चांगले उत्पादन घेता यावे, यासाठी शासनाने ही योजना आणली आहे. शेतकरी आनंदात राहावा त्याच्या मुलांचे शिक्षण चांगल्या पद्धतीने व्हावे, अशी आमची भूमिका आहे, असे उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी सांगितले.

३५ दिवसांमध्ये ३५ लाख कर्ज खात्यांची माहिती गोळा

या वेळी अमरावती येथील सुरेश कोटेकर, सरीता गाढवे, बाबाराव दामोदर यांच्याशी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी संवाद साधला. योजनेंतर्गत ३४ लाख ८३ हजार ९०८ शेतकरी खात्यांची माहिती प्राप्त झाली आहे. १५ हजार ३५८ शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. योजनेंतर्गत ३५ दिवसांमध्ये ३५ लाख कर्ज खात्यांची माहिती गोळा करण्यात आली आहे. तसेच १५ दिवसांच्या आत या माहितीचे लेखापरीक्षण झाले आहे. ही योजनेची सर्व अंमलबजावणी संगणकीय पद्धतीने होत आहे. शेतकऱ्यांच्या मान्यतेनंतरच कर्जमुक्तीची रक्कम खात्यात जमा होणार आहे. आधार प्रमाणिकरणानंतर शेतकऱ्याला नोंद पावती दिली जात आहे.

विभागीय संपर्क अधिकारी

महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४०००० दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा - २०२०

क्रमांक :एडीव्ही ३११६/सीआर-६९/२०१९/तीन **जाहिरात क्रमांक : ०५/२०२०**

महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांतर्गत खालील संवर्गातील एकूण ८०६ पदांच्या भरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा – २०२०, **रविवार, दिनांक ३ मे, २०२० रोजी महाराष्ट्रातील एकूण ३७ जिल्हा केंद्रांवर घेण्यात येईल** :-

प्रवर्ग	अ.जा.	अ.ज.	वि.जा. (अ)	भ.ज. (ब)	भ.ज. (क)	भ.ज. (ड)	इ.मा.व.	वि.मा.प्र.	सा. व शै. मागासवर्ग	आ.दु.घ.	एकूण मागासवर्गीय	खुला	एकूण पदे
१.१ सामान्य प्रशासन विभाग :-													
सहायक कक्ष अधिकारी, गट-ब (अराजपत्रित) (एकूण ६७ पदे)													
पदसंख्या	११	५	--	२	१	२	१२	३	९	७	५२	१५	६७
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
सर्वसाधारण	७	४	--	१	१	१	७	२	६	५	३४	१०	४४
महिला	३	१	--	१	--	१	४	१	३	२	१६	४	२०
खेळाडू	१	--	--	--	--	--	१	--	--	--	२	१	३
दिव्यांग	एकूण पदे ३ - (१) चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू-२ (२) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी-१												
१.२ वित्त विभाग :-													
राज्य कर निरीक्षक, गट-ब (अराजपत्रित) (एकूण ८९ पदे)													
पदसंख्या	१३	६	१	१	६	१	१६	--	११	९	६४	२५	८९
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
सर्वसाधारण	८	४	१	१	४	१	१०	--	७	६	४२	१५	५७
महिला	४	२	--	--	२	--	५	--	३	३	१९	८	२७
खेळाडू	१	--	--	--	--	--	१	--	१	--	३	१	४
अनाथ	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	१	१
दिव्यांग	एकूण पदे ४ - (१) चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू-२ (२) श्रवण शक्तीतील दोष-१ (३) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी-१												
१.३ गृह विभाग :-													
पोलीस उप निरीक्षक, गट-ब (अराजपत्रित) (एकूण ६५० पदे)													
पदसंख्या	८५	२४	२०+९*	१६+१४*	२	--	१२४+१८*	१३	८५	६५	४७५	१७५	६५०
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
सर्वसाधारण	५६	१६	१९	१९	१	--	९२	८	५६	४३	३१०	१०७	४१७
महिला	२५	७	९	९	१	--	४३	४	२५	१९	१४२	५३	१९५
खेळाडू	४	१	१	२	--	--	७	१	४	३	२३	९	३२
अनाथ	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	६	६
*** अनुशेषाची पदे**													

२. जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पुर्तता करणा-या उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

३. प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in तसेच https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे व सविस्तर जाहिरातीचे कृपया अवलोकन करावे.

४. ऑनलाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाद्वारे **दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० ते १९ मार्च, २०२०** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

ठिकाण : मुंबई
दिनांक : २८ फेब्रुवारी, २०२०

उप सचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
सहकार विभाग

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना

२०१९

● जाहीर आवाहन ●

कर्जमुक्ती योजनेंतर्गत शेतकऱ्यांच्या याद्या जाहीर करण्यात येत आहेत. ज्या शेतकऱ्यांचे नाव या यादीत आहे, त्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी आधार प्रमाणीकरण करून घ्यावे. योजनेचा लाभ फक्त गरजू शेतकऱ्यांना मिळणे अपेक्षित आहे. म्हणून खालील निकषानुसार लाभ अनुज्ञेय नसलेल्या व्यक्तींची नावे जाहीर करण्यात आलेल्या यादीत समाविष्ट असल्यास त्यांनी या योजनेचा लाभ घेऊ नये, असे जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

खालील व्यक्तींना योजनेचा लाभ अनुज्ञेय नाही :

- महाराष्ट्र राज्यातील आजी/माजी मंत्री/ राज्यमंत्री, आजी/ माजी लोकसभा/ राज्यसभा सदस्य, आजी/माजी विधानसभा / विधान परिषद सदस्य,
- केंद्र व राज्य शासनाचे सर्व अधिकारी / कर्मचारी (एकत्रित मासिक वेतन रुपये २५,००० पेक्षा जास्त असणारे मात्र, चतुर्थ श्रेणी कर्मचारी वगळून)
- राज्य सार्वजनिक उपक्रम (उदा. महावितरण, एस टी महामंडळ इ.) व अनुदानित संस्था यांचे अधिकारी व कर्मचारी (एकत्रित मासिक वेतन रुपये २५,००० पेक्षा जास्त असणारे)
- शेतीबाह्य उत्पन्नातून आयकर भरणाऱ्या व्यक्ती.
- निवृत्तिवेतनधारक व्यक्ती ज्यांचे मासिक निवृत्तिवेतन रुपये २५००० पेक्षा जास्त आहे. (माजी सैनिक वगळून)
- कृषी उत्पन्न बाजार समिती, सहकारी साखर कारखाना, सहकारी सूतगिरणी, नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व सहकारी दूध संघ यांचे अधिकारी (एकत्रित मासिक वेतन रुपये २५,००० पेक्षा जास्त असणारे) व पदाधिकारी (अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालक मंडळ)

श्री. उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री

Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

If undelivered, please return to:

प्रेषक / From

अनिल आलूरकर
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. मुद्रण प्रिंट एन पॅक प्रा.लि., ए-१८०/४, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७०३ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: डॉ. दिलीप पांढरपट्टे